सुखाच्या शोधात

— पोतदार

सुखाच्या शोधात

— पोतदार

मूल्य ३ रुपये

: प्रकाशक :

सुमति पोतदार

३१ हमिदिया रोड

भोपाल (मध्यप्रदेश)

मळ पुस्तक इंग्रेजी " इन सर्च ऑफ हॅपिनेस' '

: लेखक :

एम्. जा. पोतदार

अनुवादक

चि. जयंत पोतदार

अनुवाद दिनांक २–१०–६४

प्रकाशन दिनांक १८–१२–१९६४

प्रथमावृत्ति : १९६४

: मुद्रक :

रा. कृ. कुलकर्णी

मृत्युंजय मुद्रणालय

४४६ शनिवार, पुणें २

माझे प्रभुंचे चरणीं

अनुक्रमाणिका

अध्याय	विषय – सूची	पृष्ठ
	प्रस्तावना	
१	पुस्तकाची पार्श्वभूमी	५
२	माझे सद्‌गुरु	९
३	सुखाची व्याख्या	११
४	परमात्म्याचे आदेश	२२
५	सुखाचे साधन-मार्ग	३२
६	मार्गदर्शक सद्‌गुरु	६९
७	सुख मिळविले	८४
	उपसंहार	१००

प्रस्तावना

सुख अत्यंत व्याकुळ करणारें, कधींहि स्पष्टपणें समजण्यांत न येणारे आणि नेहमीं दक्षतेनें स्वतःचा बचाव करीत राहणारे असते. बाल्यावस्थेपासूनच याच्या शोधास प्रारंभ होतो. बहुत करून हा शोध आयुष्यभर, निरंतर, संतोषकारक परिणामाविना चालत असतो. ही गोष्ट प्रत्येक मनुष्याच्या जीवनांत त्याच्या सर्व अवस्थेस लागू होते. बाल्यावस्था असो, तारुण्य असो किंवा म्हातारपण, सुखी बनण्यासाठीं संघर्ष करतांना लोक दिसतील. त्यांच्या या धावपळींत उत्साह व हिरीरी पण दिसेल. परंतु जर का त्यांना विचारलें की– 'तुम्हीं सुखी आहांत काय ?' तर नेहमी एकच उत्तर एकाच तऱ्हेच्या आशयाचें देतील कीं, 'प्रयत्न तर केले जात आहेत. परंतु सुख फारच दूर आहे.' राव आणि रंक, रोगी आणि निरोगी, वृद्ध आणि तरुण, विवाहित आणि अविवाहित, सुशिक्षित आणि अशिक्षित नोकर व्यापारी आणि व्यवसायी–सर्व लोकांकडून केवळ याच तऱ्हेचे उत्तर मिळाल्यावर एक न्यायी विचारवंत देखील गोंधळून जातो. तर असें कां आहे, की सुखी होण्याकरितां सतत शोध चालो आणि नेहमींच निष्फलता पदरीं पडो ! खरोखरीच ही विचित्र गोष्ट आहे. प्रत्येक प्राणी मानव मात्र कोणत्याही वयाचा कोणत्याही सामाजिक स्थितीतला व्यवसायी, कोणीहि असो, सुखाच्या शोधार्थ सतत प्रयत्न करीत आहे. पण नेहमीच अपयशी होत आहे. संपूर्ण आयुष्य याप्रमाणें निघून जातें आणि सुख तर मृगजलाप्रमाणें नेहमींच दूर, अधिकच दूर असते. बऱ्याच लोकांना तर सुखाचे ओझरते दर्शन देखील होत नाहीं. कांहींना तसे दर्शन घडलें तरी त्याहून अधिक कांहीं कळत नाहीं. फारच कमी लोक थोडे पुढें गेले, तरी ते सुखाच्या जवळ पोहचू शकत नाहींत. कांहीं विरळेच, कदाचित् लाखांत एक, पूर्ण–

रुपेण सुख प्राप्त करतात आणि त्यापासून मिळालेल्या आनंदाचा उपभोग घेतात.

तेव्हां सुखाचा शोध इतका कां करावा लागतो, तरीसुद्धां सुख प्राप्त कां होत नाहीं ? अनायासेंच हा प्रश्न उद्‌भवतो. पण यांचें उत्तर फार कठीण नाहीं. उत्तर हेंच कीं सुखाच्या अर्थाचा पत्ता नाहीं. आणि जर अर्थंच माहीत नाहीं, तर त्याची अनुभूति अशक्यच आहे. ज्यास तुम्हीं जाणतच नाहीं त्यास प्राप्त कसे करूं शकाल ?

वास्तविक अर्थाचा पत्ता नसल्यानें चुकीचे अर्थ प्रचलित आहेत. हेंच तुम्हांला अपयश देण्यास कारणीभूत आहेत. आयुष्यांतील निर-निराळ्या मार्गांत, नानाविध लोकांच्या सुखासंबंधी कल्पना वेग-वेगळ्या असतात. प्रत्येक गरीब माणूस श्रीमंतासच सुखी समजतो. पुष्कळ वर्षांच्या प्रयत्नांमुळें जेव्हां एखादा गरीब माणूस श्रीमंत होतो तेव्हां त्यास कळते कीं तो सुखी नाहीं. द्रव्याशिवाय आणखीहि अनेक स्थितींच्या प्राप्ती नंतरच तो सुखी होऊं शकेल. एका अविवाहित तरुणाच्या दृष्टीनें त्याचा विवाहित मित्र त्यास सुखी वाटतो. परंतु जेव्हां तो स्वत: लग्न करतो तेव्हां त्यास समजतें, कीं सुखी होण्यास विवाहाव्यतिरिक्त आणखीही अनेक वस्तूंची आवश्यकता आहे. कचे-रीत काम करणारा कारकून आपल्या ऑफिसरांस सुखी समजतो. सतत अविश्रांत परिश्रमांमुळें एक कारकून जेव्हां स्वत: ऑफीसर बनतो तेव्हां सुखाचा अनुभव त्याला मिळत नाहीं. याचा अर्थ हाच कीं गरीब माणूस श्रीमंत झाल्यावर, अविवाहिताचा विवाह झाल्या-वर किंवा कारकूनाचा ऑफीसर बनल्यावर, हे तिघेहि आपल्या या नव्या उन्नत दशेंत स्वत:स सुखी झालेले दिसत नाहींत. यापूर्वीची जी यांची स्थिति होती. ती तर सुखी नव्हतीच, यास्तव ते पुन्हां गरीब किंवा अविवाहित किंवा कारकून बनण्यास तयार होत नाहींत. या प्रमाणें लोक वरच्या पायऱ्या चढत चढत जातात; खालच्या पायऱ्यां-वर उतरण्याची ते इच्छा करीत नाहींत आणि ते धूर्त सुख तर दूरचे दूरच असतें. ही एक अंतहीन अशी कथा आहे. अशा प्रकारचे दर-

रोजचे अनेकानेक दृष्टांत दिले जाऊं शकतील. वाचक स्वत: त्यावर विचार करून ते जाणू शकतात.

वर सांगितलेले दृष्टांत त्यांचे आहेत जे थोडेसे उन्नत व्हावयाची इच्छा करतात व तेव्हांच सुखी होऊं. परंतु तसें झाल्यावर देखील त्यांना किंचित मात्र सुखाचा अनुभव येत नाहीं. असें ही दृष्टांत आहेत जेथें दुनियेतील सर्व भौतिक सुखसामग्री एकत्रित असते. अनेक असें लोक आहेत कीं ज्यांच्या मालकीचे वाडे, मोटारी, कुटुंब, संतती, दाग-दागिने, नगदी रुपये, बागबगीचे अर्थात अपेक्षित सर्व कांहीं असतें. तरीहि ते सुखी आहेत काय? हा प्रश्न त्यांना तेव्हांच विचारतां येईल जेव्हां त्यांची एक वा अधिक कारणांची दुःखाची गाथा ऐकावयास तुम्हीं तयार असाल. तुम्हांस हे फारच आश्चर्यकारक वाटेल. तुमच्या हिशोबाप्रमाणें तर या पृथ्वीवर एका मर्त्य मनुष्याच्या ज्या ज्या इच्छा असतात त्या सगळ्या वस्तू त्यांच्या जवळ आहेत ज्यांना तुम्हीं प्रश्न विचारतां. तरी पण तुम्हांला हे ऐकावयाचे असतें कीं या माणसास या किंवा त्या किंवा अनेक कारणांमुळें दुःख आहे, कष्ट आहे. हीं कारणें जर नसती तर तो सुखी झाला असता.

याप्रमाणें सुखाचा अर्थ माहितच नसतो आणि म्हणूनच त्या अर्थाविषयीं गैरसमज पसरलेला आहे. सुखाचा विरोधी शब्द जो दुःख, त्याचा अर्थ सर्वच समजतात आणि सहजपणें दुसऱ्यास तेव्हांच समजावून पण देतात. फार विचित्र गोष्ट आहे ही !

माझे प्रभू, श्रीसद्गुरूंच्या कृपेनें या लहानशा पुस्तकाच्या माध्यमानें सुखाचा अवघड अर्थ सजावण्यास मी सुकरता आणीत आहे. इतकेंच नव्हे तर सुख प्राप्तीस आवश्यक असें निश्चित व निर्विवाद उपाय पण विस्तारपूर्वक सर्व-साधारण जनतेच्या हितार्थ लिहून देत आहे.

व्यक्तिगत रूपाने मी हेंच समजतों कीं सुखाचा वास्तविक अर्थ जाणून घेतल्यावर त्याची प्राप्ति जड व्हावयास नको. यासाठीं सुख प्राप्तीचे जे साधन-मार्ग मी सांगितले आहेत त्यांवर वाचकांनीं विचार

करावा आणि त्यांना पण जर हे साधन–मार्ग उपयुक्त वाटले तर त्यांनीं हे किंवा यापैकीं कोणत्याही एकाचा अंगीकार करून आचरणांत आणावा. तसें नसल्यास वाचकांना कोणतीहि इतर साधनें योग्य वाटत असतील, त्यांचा ते उपयोग करूं शकतील. अट हीच कीं, तीं साधनें वाचकांस त्या सुखाकडें अग्रेसर करूं शकणारी असली पाहिजेत. ज्या सुखाचा वास्तविक अर्थ मी या पुस्तकांत विषद केला आहे.

हें पुस्तक एखादी साहित्यिक रचना नसून केवळ स्पष्ट–भाषी आहे. जितके शक्य झाले तेवढे सरळ शब्द उपयोगांत आणण्याचे प्रयत्न केले आहेत. दृष्टिकोण हाच कीं जे कोणी या भाषेशीं फक्त परिचितच असोत व या विषयावरील इतर पुस्तके वाचलेले नसोत, ते देखील या पुस्तकास वाचूं शकोत आणि विषयास समजूं शकोत. या प्रकारें मी प्रयत्न केला आहे कीं जास्तींत जास्त लोक या पुस्तकाचे वाचक बनोत.

हमीदिया रोड,
भोपाळ
१ आक्टोबर १९५९

एम. जी. पोतदार

अध्याय १

पुस्तकाची पार्श्वभूमी

मी कधींही कोणत्याही विषयावर कोणत्याही पुस्तकाचा लेखक नव्हतो. तथापि या पुस्तकाच्या थोडेच अगोदर मी कांहीं लहान पुस्तिका हिंदीत लिहिल्या आहेत. मागच्या कांहींच महिन्यांत एका कवितेचे हिंदीत भाषांतर केलें व एक अन्य हिंदी कवितेची स्वतःच रचना केली. एकाएकीं मी लेखक, कवि, अनुवादक, संकलक इत्यादि बनणें माझ्या परिचितांस एक आश्चर्याचा विषय होऊन बसला. मुख्यत्वें यामुळें हें की सारें लेखनकार्य धर्म-विषयक होतें व धर्मात तर यापूर्वी मला मुळींच गोडी नव्हती. तरीपण कोणा सिद्धहस्त लेखकासारखे जेव्हां वरील लेखनकार्यात स्वाभाविकपणें साहित्य, व्याकरण, छंद इत्यादिंच्या दृष्टीनें कोणतीच त्रुटि नसल्यानें मला देखील आश्चर्य वाटलें. म्हणून मित्रांना, परिचितांना व संबंधितजनांना आश्चर्याचा धक्का बसणें स्वाभाविकच होतें. हे सर्व लोक माझ्याविषयीं जे कांहीं जाणत होते तें हेंच की मीं पूर्णरूपानें आधुनिकतेच्या रंगांत रंगलेला, सांसारिक उपभोगांसाठी धांवपळीत व्यस्त असतो. श्रीमंत असा दिसतो सामाजिक आणि व्यावसायिक दृष्टीनें उन्नत अवस्थेंत परमात्मा आणि

धर्म–विषयक चर्चा विचारणा टाळीत असतो. धार्मिक स्थान अथवा आचार विचारांपासून वेगळाच असतो. यामुळें त्यांना माझ्या पुस्तकाचे आश्चर्य नव्हे तर, एक चमत्कारागारचे वाटले. विशेष करून जेव्हां त्यांना समजलें कि धार्मिक विद्वानांनी देखील या पुस्तकांची प्रशंसा केली आहे.

मी वर लिहिलेंच आहे की मला स्वतःला देखील आश्चर्य झाले होतें. परंतु माझें सर्व आश्चर्य क्षणिकच होतें कां की मला माहितच होतें की हे सर्व कांहीं माझे प्रभू, श्री सद्‌गुरुंच्याच कृपेनें झाले आहे. ज्यांच्यावर त्यांची कृपा होते त्यांना कांहीहि असंभवनीय नसतें आणि कधींही कांही देखील असंभवनीय होऊं शकत नाहीं.

आश्चर्याबद्दल पुष्कळसे लिहिल्यामुळें वाचक चुकीची धारणा न करून घेवो की मी कोणी साधु किंवा महात्मा आहे, किंवा संसाराचा त्याग केलेला आहे, नाहीं; असे कांहीहि नाहीं. मी या संसारातच आहे व त्याचा असाच एक अंश आहे जसे कि तुम्हीं सर्व. मी देखील यथोचित रुचीनें व्यवसाय करीत असतो. मला पण माझा परिवार आणि मुलांची दैनंदिन जबाबदारी पूर्णपणें पार पाडावयाची असते. माझे स्नेही आणि संबंधित लोकांच्या समुदायांत मला पण त्यांच्यासारखा व्यवहार करावा लागतो. हे सर्व कांही असून देखील, जी कांही भिन्नता व विशेषता माझ्यांत आहे, ती म्हणजे माझ्या सद्‌गुरुंची मज वर झालेली कृपा त्या प्राप्तीचा निःसंशय मला अतिशय स्वाभिमान आहे.

इ. सन १९५९ च्या मे महिन्याच्या पहिल्या तारखेस रात्रौ भोपाळला आपल्या राहत्या घराच्या खुल्या व्हरांड्यांत मी झोपलों होतों. तेव्हां मी असे अनुभवले की (स्वप्नांत नव्हे) माझे प्रभू श्री सद्‌गुरु यांस साक्षात् पाहिले. (अक्कलकोट हे भोपाळहून सातशे मैल दूर व जेथे त्यांचा निवास आहे.) ते त्या वेळीं प्रसन्न चित्त होते. माझ्याबरोबर गच्चीवर फेऱ्या घालीत असतां ते माझ्याशीं कांही बोलत होते. आतां मला असें वाटतें की ते बोलणें आणखी कांही

नसून, स्पष्ट आज्ञाच होत्या. त्यांचे वचन होते की, " कितीहि द्रव्य खर्च करून जें प्राप्त होऊ शकत नाहीं व कितीहि प्रयत्न करून जे साध्य होऊं शकत नाहीं, या विषयावर तुम्हांस लिहावयाचे आहे. या विषयावर लिहिलेले असे कांहीं लेख आम्हीं पाहिले आहेत. परंतु ते लेख यथातथाच आहेत. कारण लेखकगण अज्ञ असूनही विषयावर लिहित असतात म्हणून ते लिखाण पोकळ वाटतें. तुम्हीं या विषयाचा भरीव विकास करा."

त्यांचे वचन हें होते. गच्चीवर फेऱ्या घालीत असतां त्यांनी एवढेच सांगितले, मी लागलीच या विषयावर विचार करण्यास सुरुवात केली आणि त्याच क्षणीं मला असें सुचलें की हा विषय तर आहे सुख, आनंदमय सुख. हीच एकमात्र अशी वस्तु आहे की जी वाटेल तेवढया पैश्यांनीं विकत घेतां येत नाहीं व वाटेल तेवढया प्रयत्नांनी साध्य करितां येत नाहीं. मी एका कागदावर विषयाचें शीर्षक लिहिलें —" सुखाच्या शोधांत " हे ज्ञान व हे शीर्षक मिळाल्यावर मला आनंद झाला व हेंच सांगावयास मी त्वरित सद्गुरूंजवळ जाण्यास निघालो. ज्या ठिकाणी कांही वेळां पूर्वीच माझ्याबरोबर फिरत होते तेथे ते तर व्हरांड्यांत नव्हतेच. अशा प्रकारें श्री सद्गुरु अदृश्य झाल्याने माझी थोडीशी निराशाच झाली. मी या विषयावर त्यांची अनुमति घेऊ शकलो नाहीं, त्यामुळें हा विषय तेथेंच थांबवावा लागला.

पुढें कांही दिवसांनीं मे महिन्याच्या अखेरीस मी सद्गुरुंना भेटलो आणि 'सुखाच्या शोधांत' या विषयाबद्दल त्यांना सांगितलें. त्यांनी त्यास अनुमति दिली. मला आनंद झाला की भोपाळला त्यांनीं मला जे कांही सांगितले होतें त्याचा वास्तविक अर्थ मी समजू शकलो. त्यांच्या अनुमतिमुळें मला हें समाधान लाभलें की मी त्यांच्या शब्दांचा अर्थ समजून स्वयंप्रेरणेनें योग्य शीर्षक देखील दे ऊ शकलो.

पुन्हां त्यांची जुलैच्या तिसऱ्या आठवड्यांत भेट झाली मी तेव्हां महत्त्वाच्या उत्सवाला अक्कलकोटीं गेलो होतो. यावेळीं त्यांनी

मला विचारलें की सुखाच्या विषयावर लिहिण्यास केव्हा सुरुवात करीत आहात ? त्यांच्या या प्रश्नास उत्तर देण्यास माझी कोणत्याही प्रकारची सिद्धता नव्हती. या विषयावर त्यांच्या अनुमतिनंतर मी हेंच समजत होतो की हा एक आदर्श मला दाखविला आहे ज्यास मी आत्मसात् करावें. त्याबरोबरच मला हेंही सांगितलें गेलें आहे की त्याची प्राप्ति कठीण आहे कारण द्रव्यानी तर त्यास विकत घेऊं शकत नाहीं व प्रयत्नांनी त्याच्याजवळ पोहोचूं शकत नाहीं. माझ्या व्यक्तिगत प्रगतिकरितां वेळोवेळीं मला जे आदेश, उपदेश किंवा सूचना मिळत होत्या त्या पैकींच आचरणांत आणण्यास योग्य ही पण एक महत्वपूर्ण सूचना आहे, इतकाच निर्णय मी घेऊं शकलो होतो. लिखाणाचा विचार अल्पसाही मनास शिवला नव्हता की या विषयावर मला पुस्तक लिहावे लागेल म्हणून.

परंतु त्यांचा हा प्रश्न " **तुम्ही लिहिण्यास केव्हां सुरुवात करणार आहांत या विषयावर** " हा लिहिण्याचा मला स्पष्ट आदेशच होता.बरोबरच याही गोष्टी सूचक होत्या कि या विषयावर संपूर्ण ज्ञान मला आधींच दिले गेलें आहे. इतके समजल्यावर मी लिहिण्याचा संकल्प केला व गुरुवार दिनांक २३ जुलै १९५९ रोजीं लिहिणें सुरू केलें. जे कांहीं विचार मनांत येऊ लागले, त्यांस लिपिबद्ध केलें आणि त्यांचेच विकसित स्वरूप प्रस्तुत पुस्तक आहे.

यामुळें हें पुस्तक अशी कोणती साहित्यिक कृति नव्हे कीं जी कपाटांत अन्य अनेक पुस्तकांच्या ओळींत शोभित होवो. कदापि नाहीं. प्रभू कृपेनें प्राप्त झालेले आवश्यक ज्ञान व अनुभवांच्या आधारावर हें लिहिलें गेलें आहे. याचा उत्तम उपयोग तर याच्या वाचनानें, वारंवार वाचनानें, आणि वेळोवेळीं याचे चिंतन केल्यानें होईल.

हें पुस्तक लिहिण्याचा मूळ हेतु हाच आहे.

अध्याय २

माझे सद्‌गुरु

प्रस्तुत पुस्तकाच्या विषय-प्रवेशापूर्वी मी आपले प्रभू श्री सद्‌गुरुंच्या चरणीं नतमस्तक आहे. हात जोडून त्यांना मी साष्टांग नवस्कार घालीत आहे आणि त्याबरोबरच मनःपूर्वक प्रार्थना करतो की त्यांनी मला सर्व ज्ञान द्यावे की जें 'सुख' या कठीण विषयाची उकल करण्यास आवश्यक आहे. एक असा विषय कीं जो समजण्यासाठीं अज्ञजनांस कोणता मार्गच सूचत नाहीं तथापि लोक सुख प्राप्तीकरितां वेडे होतात आणि निरंतर कार्यरत असतात. मला नुसतें ज्ञान नको तर त्या ज्ञानास कोणीहीं समजूं शकेल असें सोपे शब्द देखील हवे आहेत. हे सगळे मी इच्छितों. तथापि सद्‌गुरु तर कांहीच बोलत नाहींत, तरी पण मला मूक उत्तर मिळत आहे की त्यांना माझी प्रार्थना मान्य आहे व या विषयाबाबत जे कांही काठिण्य उद्भवेल ते माझ्याकरिता सोपें केले जात आहे त्यामुळें मी संतुष्ट आहे व लिखाणास चालना देत आहे. मी हें जाणत आहे आणि मला हा अनुभव आहे की ते प्रत्येक इच्छित वस्तुचें दाता आहेत. ते सर्वशक्तिमान् आहेत. कृपाळ, दयाळू व करुणामय आहेत. मी पूर्णतया त्यांचाच तर

आहे व ते माझा मार्ग सुगम करणारे आहेत. याबद्दल मला आनंद आहे.

माझ्या प्रभुंचा सदेह निवास भारताच्या मुंबई (आता महा-राष्ट्र) राज्यांतर्गत सोलापूर जिल्ह्यांत अक्कलकोटी आहे. परम सद्गुरु श्री गजानन महाराज या नांवाने ते लोकांत ओळखले जातात. माझे तर ते प्रभू, सद्गुरु, सर्वज्ञ, सर्वव्यापक, सर्वशक्तिमान, असे आहेत. मानव देही त्यांचे वास्तव्य एक चमत्कार आहे. त्यांच्या सान्निध्यांत असणें तथा त्यांचे आदेश पालन करण्यास तत्पर असणेंही शाश्वत् आनंदाची अनुभूति आहे.

अंतरांतून उद्भूत माझ्या निष्ठा व श्रद्धेचे आराध्य माझे सद्-गुरु आहेत. माझ्या अस्तित्वासाठीं मी त्यांचा ऋणी आहे. आणि यामुळेंच माझे अस्तित्व त्यांनाच समर्पित केले आहे. इच्छित वा अपेक्षित प्रमाणापेक्षां किती तरी अधिक मात्रेंत त्यांनी मला सर्व कांहीं प्रदान केलेले आहे. प्रकाश, ज्ञान व आनंदमय सुखाचे ते दाता आहेत.

अशा माझ्या प्रभूच्यासमोर मी पुन्हां नतमस्तक होत आहे त्यांना पुन्हां प्रार्थना **करीत** आहे आणि त्यांच्या कृपेनें मार्गदर्शन होऊन विषय–प्रवेश सुरूं करीत आहे.

• • •

अध्याय ३

सुखाची व्याख्या

या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें, मी सुखाचा अर्थ समजावण्यास वचनबद्ध आहे. परंतु या अध्यायाला सुरूवात करतांना मला असें वाटते की, सुख या शब्दापूर्वी एक विशेषण लावणें आवश्यक आहे आणि तो शब्द आहे '**शाश्वत**'. फक्त स्थायी आणि शाश्वत सुखच, सुख आहे. एक किंवा अधिक कारणांमुळें प्राप्त व आजन्म स्मरणांत राहण्यासारख्या आनंदानें प्राप्त असें क्षणिक सुख केवळ कांही काळ (सेकंद, मिनिट, तास किंवा दिवस) पर्यंतच टिकूं शकणारें असल्यानें सुख तर नाहींच नाहीं. कारण की हे अस्थायी सुख तुम्हांस पुन्हां अंधःकारमय दुःखाच्या खोल दरींत ढकलून देते. ज्यानें सुखाला ओळखले, अनुभवले किंवा पाहिलेच नाहीं, तो मनुष्य अशा कोणाहीपेक्षा तर उत्तमच आहे कीं ज्याने क्षणिक सुखाचा अनुभव घेतला असेल. क्षणिक सुखानंतर पुन्हां दुःखांत परतणें हे सहनशक्तीच्या पलीकडे आहे. त्यामुळे दुःखाच्या आघाताने हृदय पिळवटून निघेल.

एक दोन उदाहरणें पाहूं या. समजा की एक गरीब माणूस सुखी होण्यासाठीं धनवान बनणें हे आपले लक्ष्य ठेवून चालतो. तो धनवान होण्यासाठी प्रयत्न व परिश्रम करतो, तरी देखील दरिद्रीच राहतो. एक दुसरा मनुष्य देखील असेच ध्येय ठेवून आपल्या प्रयत्नाने व परिश्रमाने धनवान तर होतो परंतु आपली सर्व मिळकत सट्टा इत्यादींत गमावून पुन्हां दारिद्र्यांत परततो. या दुसऱ्या गरीब माणसाची पहिल्या गरीब माणसापेक्षां फार केविलवाणी स्थिति होते. या प्रकारेंच संततिसाठी आतुर असूनसुद्धां संतति-प्राप्ती न होणें, त्यापेक्षा तर चांगलेच आहे कीं संतति प्राप्त होवो, त्याचा आनंद होवो, आणि कांही काळानंतर आपल्या डोळ्यांनी त्यांचा मृत्यु पण पाहावयास मिळो.

म्हणून सुख, स्थायी व शाश्वत असलें पाहिजे व हेच प्रत्येक माणसाचे ध्येय असलें पाहिजे. यापुढे ज्या ज्या ठिकाणी सुख शब्दाचा प्रयोग केला गेला आहे त्या त्या ठिकाणी त्याला शाश्वत सुख याच अर्थानें संबोधावे.

या माझ्या सांगण्यानेंच वाचकांना पहिला धक्का बसू शकतो की भौतिक संपत्ति मिळविणें अथवा तींत वाढ करणें हें तर सुख नाहींच नाहीं एवढेच नव्हे तर सुखाचा एक अंश देखील नाहीं. विवाह, संतति कीर्ति, राजनैतिक किंवा सामाजिक यश—हे सुद्धा सुख नाही, ना सुखाचा अंश मात्र. मग, तुमच्या जीवनांत तुमच्या साऱ्या सांसारिक महत्वाकांक्षा पूर्ण झालेल्या असोत, वा तुमच्या सगळ्या वांछित अभिलाषा तृप्त झालेल्या असोत तरीही वृद्धापकाळीं तुम्हीं स्वतःला सुखी आहोत असे अनुभवणार नाही. जे तुम्हांला रोज पाहतात किंवा ज्यांच्याकडे तुमचा संबंध असतो त्यांस तुम्हीं वरपांगी सुखी दिसू शकाल. ते लोक तुम्हांस आपला अनुकरणीय आदर्श ही समजतील. पण आपल्या अंतरंगांत शोध केल्यावर तुम्हांस कळतें की अजून ही आपणास कांही ना कांही वस्तूंची उणीव आहे. ही उणीव व याची पूर्तता न झाल्याने हे तुमच्या दुःखाचे कारण

बनतें. तुम्हीं अशी खात्री करूं लागतां कीं हीच एक शेवटची उणीव आहे, व इच्या पूर्णतेनंतर तुम्ही सुखी व्हाल. परंतु दुर्भाग्याने या सांसारिक जीवनांत 'अंतिम' नांवाची कोणती वस्तूच नसते. मनुष्य देह असेपर्यंत आपल्या इच्छा, महत्वाकांक्षा, उणीवा व गरजांचा दास बनलेला असतो. या त्यास कधींच मुक्त करीत नाहीं. भले, ही, या निरनिराळ्या लोकात वेगवेगळ्या स्वरूपाच्या असोत, अल्प असोत वा अधिक असोत, इच्छा–पूर्तिचे प्रयत्न किंवा परिश्रम कधींही थांबत नसलात. आणि कधींही यांचा अंत नसतो. सामान्यतः हेंच आढळत असतें. अपवाद फारच अल्प किंवा क्वचितच आहे.

हेंच कारण आहे की भौतिक ऐश्वर्य हें सुख किंवा सुखाचा अंश देखील होऊं शकत नाहीं, आणि होणार नाहीं. तरीही भौतिक वस्तू निश्चित सुखाच्या प्राप्तीची साधनें आहेत. केवळ साधनेंच, सुख नाहीं. जेव्हां तुम्हीं यांना सुखाचे साधन मात्रच मानूं लागाल, तर तुम्हीं खात्रीनेंच यथार्थ सुखाच्या शोधांत एक पाऊल पुढे गेलांत. हे असे आंतरिक सुख आहे, ज्यास तुमच्या शिवाय आणखी कोणी पाहू शकत नाहीं, समजूं शकत नाहीं व यापासून आनंदित होऊं शकत नाहीं आणि याबद्दल कांही बोलूही शकत नाही. म्हणून भौतिक संपन्नतेच्या पाठीमागें लागणें हे कांही योग्य तर नाहींच, कारण ते सुखाचे केवळ साधन आहे. तरीसुद्धा तुम्ही मानव आहात हीच सुखी होण्याकरितां संपूर्ण योग्यता आहे.

सर्वशक्तिमान् परमात्म्याकडून सृष्टि–निर्माण–कार्याचे वेळीं ज्या निरनिराळ्या पदार्थांची (जड अथवा चेतन) उत्पत्ति झाली त्या सर्वात मनुष्य नामक जीवाच्या निर्मितीचा त्यास (परमात्म्यास) स्वाभिमान आहे. अन्य पदार्थ यथाः पर्वत आणि दरी, वृक्ष आणि झुडपें, पृथ्वी आणि आकाश, धातु आणि खनिज सर्व निर्जीव दिसतात. किडे, पक्षी आणि पशु यांत जीवन तर आहे परंतु बुद्धि नाहीं. मनुष्यच एक पूर्ण कृति आहे जी स्वयंपूर्ण आहे. मनुष्य, इतर पदार्थ व जीवांचा उपभोग घेऊ शकतो आणि त्यांवर शासन करूं शकतो. पण हे जीव

व पदार्थ मनुष्यांस आपल्या उपयोगांत आणूं शकत नाहींत आणि मनुष्यावर शासनही करूं शकत नाहींत. मनुष्य व इतर प्राणी व पदार्थ यामध्यें हीच भिन्नता आहे. परमात्म्याने स्वत: संसारांतील इतर सर्व वस्तूंपेक्षां मनुष्यास सर्वश्रेष्ठ नियुक्त केले आहे. म्हणूनच संपूर्ण विश्वांत मानव जातीची संख्या अत्यंत अल्प आहे. तिच्या अनुमानानें इतर प्राणी व पदार्थ अनेकपटीनें अधिक आहेत. म्हणूनच मी सांगतो की मानव-देहच एक अशी निर्मिति आहे की जी स्वयंपूर्ण आहे, अभावरहित आहे. मानवशरीरास हरतऱ्हेने संपूर्ण बनविण्यांत परमात्म्याने जे जे कांहीं करता येईल ते सर्व कांहीं केले.

सृष्टि निर्माता व सृष्टीचा पालनकर्ता हा एकच परमात्मा आहे. सृष्टि-निर्माण करण्याचे कामात ज्या प्रमाणे त्याने आपल्या स्वाभिमानपूर्ण उत्पत्ति, अर्थात, मानवदेहावर विशेष लक्ष दिले, त्या प्रमाणेच सृष्टि-पालन-कार्यात देखील तो मानवाकडे विशेष लक्ष देतो. म्हणूनच तर इतर सर्व जीव व पदार्थांपेक्षां अधिक मानव प्राण्यालाच परमात्म्याने आपले संरक्षण, प्रेम व ममत्व दिलेले आहे. येथे पण मानवाची इतर सर्वांवर श्रेष्ठता दिसून येते. मानवदेहाला निर्माण करते वेळेस, त्या देहास जरूरी अशा सर्वच वस्तू तथा त्या देहाचे आयुष्यभराचे नियोजन त्या महान शक्तीने पूर्ण रूपानें केलेलें आहे.

परमात्म्यासंबंधीं इतकेंच ज्ञान झाल्याने तुम्हांस स्वत:बद्दल अथवा स्वत:शी संबंधित कोणत्याहीं बाबतींत चिंता करण्याचें कोणते ही कारण राहता कामा नये. परमात्म्याची स्वाभिमानपूर्ण रचना अर्थात मानवशरीर प्राप्त होताच त्यांच्या (परमात्म्या) कडून तुम्हास हे आश्वासन आहे की तो तुमची काळजी तुमच्या आयुष्यभर पूर्णरूपानें घेत राहील. यांसच म्हणतात योजना. हीं इतकी सत्य व श्रेष्ठ योजना आहे की जिच्यांत संशय किंवा फेरबदल किंवा विफल होस मुळींच वाव नाहीं. ग्वाही दिल्यासारखें हें जें आश्वासन

परमात्मा देत आहे, म्हणूनच तर त्यास दयाळू, कृपाळू व मायाळू म्हटलें जातें.

या जन्मापासून आमरण परमात्म्या कडून तुम्हांला विशेषता प्राप्त होते. तो तुम्हांस सर्व जीव व पदार्थांहून जास्त श्रेष्ठता देतो. जास्त प्रेम, ममता व संरक्षण देतो व तुम्हांबद्दल दयाळू, कृपाळू व स्नेहमय असतो. काय तुम्हीं हे समजता की तो हे सगळे फुकटच करतो? किंवा तो तुमच्याकडून कांही अत्यंत मोठी अपेक्षा ठेवतो काय? नाहीं, या दोन्ही पैकी कांहीही नाहीं. जी कांही अपेक्षा तुमच्याजवळ केली जाते, ती हीच की परमात्मा कोण आहे हे जाणण्याचे प्रयत्न करा, त्यास जाणा, त्याचे स्मरण करा, त्याच्याकडे आदर्श पुत्राप्रमाणे कर्त्तव्य–रत असा, आपल्या आयुष्यक्रमांत प्रत्येक परिस्थितीत दर क्षण यंत्र, तंत्र सर्वत्र त्याची उपस्थिती असतेच असते अशी खात्री ठेवा, एका क्षणास देखील त्यास विसरूं नका, त्याच्या उत्कृष्ट योजनांचे गुणगान करा, या दृष्य सृष्टि व अशाच अनेक सृष्टींचे संचालन तो कसे करतो या बाबत आश्चर्य करा. सारांश हेंच कीं तुम्हीं त्याच्या विषयीं विचार करा आणि त्याचें स्मरण ठेवा. एवढ्यानेंच तो संतुष्ट आहे की तुम्ही त्याच्याशी प्रति कर्तव्यतत्पर आहांत.

आपल्या स्वाभिमानपूर्ण उत्पत्ति (मनुष्या) कडून परमात्म्यास जे कांही अपेक्षित आहे ते अगदींच अल्प आहे. परंतु दुर्घटना ही आहे की परमात्म्याची ही स्वाभिमानपूर्ण कृति (मनुष्य) जन्मास आल्यानंतर लगेच त्यास (परमात्म्यास) विसरून जाते, आणि विस्मृतीतच ठेवते. अन्य जीव व पदार्थांचा व्यवहार यापेक्षां तर बराच वेगळा आहे.

मनुष्य स्वत:बाबत अतिशय विचारमग्न राहातो. वयोवृद्धि बरोबरच त्याच्या अहंमन्यतेंत देखील वृद्धि होत असते. परमात्म्यास तो विसरतो. कांही लोक तर परमात्म्याच्या अस्तित्वांवरच विश्वास ठेवीत नाहींत. कांहीं त्याचे अस्तित्व तर मान्य करतात परंतु त्याचे स्मरण तेव्हांच करतात जेव्हां त्यांची तशी इच्छा होते किंवा ते संक-

ष्टग्रस्त असतात. कांही अन्य लोक त्यास एक दुकानदार समजतात जो पुष्कळ दुकानांचा स्वामी असावा. या पैकीं कोणत्याही दुकानांत कोणती तरी विशिष्ट वस्तु देऊन मोबदल्यांत इच्छित वस्तु मागितली जाते. परमात्म्या संबधी अशा निरनिराळ्या चुकीच्या कल्पना मुळें नुसतें दुःख पसरतें. आणि मग प्रत्येक मनुष्य आपल्या इच्छा व आवडीनुसार सुखाची व्याख्या बनवून, सुखाचा शोध सुरू करतो. सुख तर अज्ञात, अदृष्य आणि अलभ्य एका कोपऱ्यांत अंग चोरून लपलेलें असतें.

परमात्म्याच्या अस्तित्वास विसरून स्वार्थानें आपल्या स्वार्थ सिद्धिसाठीं त्याच्या नांवाचा व कृपेचा उल्लेख करून, तुम्हीं सुखाच्या एकमेव दात्यासच निराश करीत आहांत. यास्तव त्याच्या या स्वाभिमानपूर्ण उत्पत्तिस (मनुष्यास) ज्याचा व्यवहार नावडत्या मुलाप्रमाणे आहे, सुखा खेरीज सर्व कांही दिले जात असतें. कोणीहि पिता हे इच्छीत नाहीं की आपला पुत्र भुकेला अथवा निराश्रित राहो पण जेव्हां संपत्तीच्या वांटणीचा प्रसंग येतो तेव्हां नावडत्यास कांहीही दिले जात नाहीं. संपत्ति तर आवडत्यासच मिळत असते.

हेच सुखा संबंधी आहे. तुम्हीं भलेही परमात्म्याची आठवण नका करूं. तुम्हीं त्याच्या अस्तित्वाचे देखील खंडन करूं शकतां. तरीही अन्न व आश्रयापासून तुम्हास दूर ठेवले जाणार नाहीं. अशांना तर अधिक धन, अधिक संपत्तीत व अधिक त्रासांत गुंतवून, सुखापासून दूर, बरेच दूर ढकलून दिले जात असतें.

आतां आम्हांस कळतें कीं सुखाची, शाश्वत सुखाची किल्ली कोणा जवळ आहे. इतकें जाणतांच आम्हांस तत्काळ आपल्या सुखप्राप्तीच्या अधिकाराचें आश्वासन मिळतें, कारण की सुखाचा दाता तो परमात्मा पक्षपाती किंवा भेदभावापासून अलिप्त आहे. त्याचे कडून प्रत्येक माणसाला सुखी होण्यास समान अधिकार प्राप्त होतो. याप्रमाणें, परमात्म्याची स्वाभिमानपूर्ण उत्पत्ति जो मानवदेह, तो ाप्त होणेंच सुखप्राप्तीकरतां पात्र बनणें आहे.

हे मानवशरीर, भूक, दरिद्रता, रोग, निराश्रयता अथवा आपल्या जीवन भराच्या इतर सर्व अभावांची ग्वाही आहे. खात्री ठेवा की या शरीराचा सांभाळ परमात्मा स्वयं करीत असतो. त्यामुळें जितकें कांही अन्न, आश्रय व इतर सर्व आवश्यक सामग्री, विलास किंवा ऐश्वर्य सामग्री तो तुम्हांस देत जातो त्या सर्वांना सुख प्राप्तीचे साधनच समजावें. तुम्हीं मनुष्य आहांत म्हणूनच तुम्हांला सुखी होण्याचा जन्म-सिद्ध अधिकार आहे. सुखी होणें हेंच काम तुम्हाला करावयाचें आहे. परंतु सुख काय आहे किंवा सुखाचा अर्थ काय आहे हे माहीत नसल्याने, तुम्हीं काळोखांतच भटकत चाचपडत राहतां व याच कारणास्तव विफल होता.

सुख एक आंतरिक भावना आहे, शाश्वत आनंद आहे. सुखाच्या स्थितीत आनंद, अति-आनंद, परम् आनंद इतका जास्त आहे की त्यास आपल्या अतरांत दाबून ठेवता येत नाहीं. जगांतील सर्व आनंदांचे समूह, सुख आहे. सुखांतील आनंदांत कमतरता होत नाहीं, त्यास कोणतीही मर्यादा नाहीं आणि अंतही नाहीं. सुख ऐश्वर्याने परिपूर्ण व दरिद्रतारहित आहे. सुखांत साऱ्या जगांतील धन संपत्तिवर स्वामित्व आहे. चिन्ता, व्याकुळता, रोग, विपत्ति, भूक, अपंगता, अस्वास्थ्य, संकट, त्रास इत्यादि दु:खजनक प्रत्येक कारणांवर विजयच नव्हे, पूर्ण विजय प्राप्त करणें सुखानेंच होतें. इतरांकडून आपलें कार्य करवून घेण्याची आंतरिक क्षमता सुखांत प्राप्त होते. निसर्गास व आजूबाजूच्या वातावरणास इच्छेनुसार आपल्याला अनुकूल करण्याचें पूर्ण प्रभुत्व, सुखाची स्थिती आहे. बरी किंवा वाईट बातमी, जन्म व मृत्यु, अवनती व उन्नति, लाभ व हानि, जय व पराजय, रोग व आरोग्य इत्यादि द्वन्द्वांच्या आवेगावर नियंत्रण, सुखाची स्थिती आहे. कोणत्याही तऱ्हेच्या आघात व आश्चर्यापासून अविचलित असणें सुख आहे. आपल्या स्वत:च्या शरीरावर, त्याच्या अवयवांवर इन्द्रियांवर, भावना व आवेगांवर पूर्ण स्वामित्व, सुख आहे. परमात्म्याशी निर्बाह्य संपर्क

स्थापित करून घेणें, तथा त्या सारखें पूर्णत्वास पोहोंचणें, हेंच सुख आहे.

ही झाली सुखाची व्याख्या. तें तर याहूनही कांही अधिकच आहे. मनुष्य–निर्मित शब्दकोषांत उपयुक्त शब्दांच्या अभावी, सुखाचें सर्वांगपूर्ण स्पष्टीकरण शब्दांच्या सहाय्यानें करताच येत नाहीं. सुखाचा अर्थ आहे की ज्ञानप्राप्तीच्या प्रयत्नांचा अंत झाला. लोभ, लालसा, निराशा आणि त्रास पूर्णरूपाने नाहींसे होतात. मिळकत करण्या योग्य किंवा प्राप्त करण्यायोग्य कांहीही शिल्लक उरत नाहीं. त्यामुळें उरलेलें आयुष्य सुखांत परिपूर्ण जातें. हेंच तें सुख आहे. ज्याचा शोध केला जातो आणि केलाच पाहिजे. प्रत्येक माणसास सुखाला शोधण्याचा हक्क आहे, मग तो पुरुष, स्त्री वा बालक असो; श्रीमंत, मध्यमवर्गीय किंवा गरीब असो; कोणत्याही देश, समुदाय अथवा स्थानाचा असो; कोणत्याही मत, पंथ किंवा संप्रदायांतील असो; धंदा, व्यवसाय किंवा नोकरींत असो. कोणत्याहीं, एकाही अपवादाविना, प्रत्येक मनुष्य सुखाचा प्रार्थी आहे. वयाची मर्यादा किंवा प्रतिबंध नाहीं. उपाधि किंवा प्रमाणपत्राचें काम नाहीं. किती तरी चमत्कारिक आणि श्रेष्ठ मार्ग आहे. परमात्म्याचे अभिप्राय नेहमीं असेच अद्भुत व भव्य होत असतात.

मी हा प्रयत्न केला आहे की,तुम्हास स्पष्ट शब्दांत सांगावे की सुख काय आहे ? आणि त्याचा अर्थ काय आहे ? व त्या बरोबरच हे देखील सांगावें की प्रत्येक मनुष्यास जन्मापासूनच सुख मिळविण्याचा अधिकार आहे. आतां प्रश्न उद्भवतो की सुखाचा शोध कां म्हणून करावा लागतो ? ठीक आहे, हा प्रश्न आपण सोडवूं या.

आपला जन्म व जीवन विषयीं ज्याप्रमाणें इतर जीव व पदार्थापेक्षा परमात्म्याकडून तुम्हांस विशेष मिळालेल्या आहेत. त्याचप्रमाणें इतर जीव व पदार्थापेक्षा एक आणखीही विशेषता तुम्हांस प्राप्त आहे आणि ती सुखी होण्याचा तुमचा अधिकार. वृक्ष पर्वत, पशु किंवा किडे यांस सुखी अथवा दुःखी असें संबोधन केलें जात नाहीं हें विशेषण तर फक्त मनुष्यांसच लावतात.

स्मरण असूं द्या, कीं मानवास सुखी होण्याचा अधिकार मात्र मिळालेला आहे. प्रत्यक्ष सुख नाहीं. म्हणून ही कल्पना कीं तुम्हांस सुखी होण्याचा हक्क आहे, जन्मापासूनच तुमच्या रक्तांत हे भिनलेले असते. हेंच कारण आहे की प्रत्येक मनुष्य आपल्या आयुष्यभर सुखाचा शोध करीत असतों. तुम्हांला असें म्हणणारा कोणी भेटणार नाहीं कीं तो सुखी आहे आणि आतां दुःखाच्या शोधांत आहे. अशक्य. जर मानव कोणताही शोध करीत असतो तर तो केवळ सुखाचाच शोध असतो. सुखाखेरीज कांहींही शोधलें जात नसतें. मानव जीवनाच्या नित्यक्रमांतील प्रत्येक कृति, केवळ सुखाच्या शोधाकरितांच असते मग त्या कृतीचे परिणाम कांहींपण असोत. मला आशा आहे कीं एवढी गोष्ट तर स्पष्ट समजून घेतली असेल.

माझें म्हणणे आहे कीं कोणताही अपवाद नसून प्रत्येक माणसास सुखी होण्याचा अधिकार आहे. हा अधिकार स्वतः परमात्म्यानें त्यास (मानवास) दिलेला आहे. यावरून हे सिद्ध होते कीं जेव्हां कधींहि या अधिकाराचा उपयोग केला जाईल तेव्हां सुखाची प्राप्ति झालीच पाहिजे. नुसता आपल्या स्वाधिकाराचा प्रयोगच तेवढा आवश्यक आहे. जर असें आहे तर मग सुखाचा शोध कां म्हणून ? प्रश्न वास्तववादी आहे आणि सरळ देखील.

मी त्यास आणखीहि सोपे करूं इच्छितो. जर का तुम्ही आपल्या अधिकाराचा प्रयोग कराल, तर सुख अशी कोणतीच वस्तु नाहीं जी परमात्मा आणून आपल्या हाती सोपवेल. नाहीं जेव्हां तुम्ही आपल्या अधिकाराचा प्रयोग कराल, तेव्हां तुम्हांस सुख प्राप्त होईल व तुम्हीं सुखी व्हाल. इतकेंच सांगायचें आहे. याचा अर्थ हा आहे कीं सुख तर पूर्वी पासूनच तुम्हांस दिलें गेलें आहे. ते तुमच्याजवळ आहे, तुमच्यांत आहे व तुमच्या सभोंवती आहे. म्हणून ज्या क्षणीं तुम्हीं आपल्या अधिकाराचा उपयोग कराल, सुख अत्यंत सुगमतेनें आपणांस मिळेल. ते बाहेरून कोठूनहि येणारे नाहीं आणि परमात्मा तुमच्या समोर येऊन तुम्हांस ते देणार नाहीं. त्यानें तर तुम्हांस पूर्वीच

सुख दिलेलें आहे आणि त्याच्या प्राप्तीचा अधिकार देखील दिलेलाच आहे. परंतु या दोहों (सुख व अधिकार) मध्यें एक बाधा आहे. ही बाधा तुमच्या पात्रतेनुसार सुगम किंवा जड होऊं शकते. या बाधेमुळें तुम्हीं आपल्या अधिकाराचा सरळपणें प्रयोग करूं पावत नाहीं. ही ही बाधा किंवा आवरण किंवा पडदा 'अज्ञान' आहे, अर्थात ज्ञानाची उणीव. तुम्हांस पत्ताच नाहीं कीं सुखाच्या आपल्या अधिकाराचा प्रयोग कशा प्रकारें केला जावा, यामुळें तुम्हांस सुख प्राप्त होत नाहीं. जर तुम्ही आपल्या स्वतःच्या अधिकाराचा प्रयोगच करूं शकत नाही, तर सुख कसें प्राप्त व्हावे ? ही स्पष्ट व सरळ गोष्ट आहे.

तुमच्या सुखप्राप्तीच्या अधिकाराच्या आणि प्रत्यक्ष सुखाच्या-मध्यें अज्ञान बाधाच नाहीं, तर तुमचा वैरी पण आहे. या अज्ञाना-मुळेंच तुम्हीं आपल्या मनानें सुखाची एक वेगळीच व्याख्या बन-विण्यास सुरुवात करतां आणि सुखप्राप्तीची आपली मूळे धारणा किंवा कल्पना करून घेता, त्यांचें फळ हेंच कीं अज्ञानजनक दुःखच तुमच्या पदरी पडतें. मिथ्या सुखाचा शोध आणि त्याच्या प्रयत्नांची शिकस्त सतत व निरंतर तुम्ही आयुष्यभर चालूच ठेवतां.

म्हणून सर्वप्रथम या बाधारुपी अज्ञानावर विजय मिळविला पाहिजे. तुमच्याजवळ सुखाचा अधिकार असूनही हे अज्ञान निरंतर तुमची दिशाभूल करीत असते. असें शक्य आहे किंबहुना निश्चित आहे की तुम्ही सुखाच्या शोधांत व त्याच्या प्रयत्नांत अतिशय व्यग्र असाल आणि तशांतच तुम्हांला हें वाचण्याची संधि आली तर चम-कून तुम्ही स्वतःसच विचाराल की हे अज्ञान काय आहे, कोणच्या गोष्टीचे अज्ञान, कुणांबद्दल अज्ञान ?

उत्तर सोपें आहे. परमात्म्याबद्दल अज्ञान; त्याच्या सर्वसमर्थतेचें अज्ञान; त्याच्या अलौकिक सामर्थ्याचें अज्ञान, त्याच्या आदेशांचें अज्ञान; त्याच्या सृजन, पालन, संहार इत्यादि लीलांचें अज्ञान; त्याच्या निष्पक्ष न्याय नीतिचें अज्ञान; हे दृष्य जगत् व अशा अनेक जगतांवर त्यांच्या प्रभुत्वाचें अज्ञान आणि त्याच्याशी संबंधित अनेकानेक गोष्टींचे

अज्ञान हें अज्ञान आहे आणि जोंपर्यंत परमात्मा व त्या विषयक अज्ञान तुमच्यांत आहे, तोंपर्यंत तुम्ही सुखी नाही होणार; होऊंच शकत नाही. या अज्ञानास नष्ट करावयाचें एकमेव अस्त्र आहे 'ज्ञान' परमात्म्याविषयी संपूर्ण ज्ञान. हें सगळें ज्ञान त्यानें स्वतःच आपल्या आदेशांद्वारा तुम्हांला दिलेलें आहे. या आदेशाचें जर तुम्ही पालन कराल तर अज्ञानास नष्ट करून देणारें ज्ञान तुम्हांस मिळेल व तुम्ही सुखी व्हाल.

● ● ●

अध्याय ४

परमात्म्याचे आदेश

परमात्मा काय आहे ? परमात्मा कोण आहे ? त्याचें अस्तित्व खरोखरीच आहे काय ? त्याचें वास्तव्य कोठें आहे ? त्यास पाहतां येतें काय ? या तऱ्हेचे आणखी असंख्य प्रश्नांची उत्तरें देणें सोपे नाहीं. परमात्म्याचें वर्णन करतांच येत नाही. प्रामाणिक शब्दकोषकार देखील त्यास सृष्टीचा कर्ता व पालक म्हणतात. हें तर त्यांच्या कार्याचे एक अंशमात्रच स्वरूप आहे. हे त्यांचे वर्णन नव्हे, आणि परमात्मा शब्दाचा अर्थही नव्हे. तो अव्यक्त आहे. रुप किंवा आकार त्यास देतां येत नाही. त्याच्या अस्तित्वाबद्दल व अधिष्ठानाबद्दलचा प्रत्यय कोणीहि कोठेही नेहमी घेऊं शकतो. कांहीं कृपा-पात्र व्यक्ति योग-साधनेनें अथवा सद्गुरु--दर्शित मार्गामुळें त्यास प्रत्यक्ष पाहूं शकतात, त्याचा साक्षात्कार करूं शकतात आणि संपर्क ठेवूं शकतात. परंतु हेही लोक परमात्म्याचें वर्णन गूढ भाषेतच करूं शकतात. ते स्पष्ट भाषेत फक्त यामुळेंच करूं शकत नाहीं कीं त्यास पात्र शब्द कोणत्याहि भाषेच्या शब्दकोषांत नाहीत. परमात्मा या दृष्य सृष्टि व या सारख्याच पण मानवास अनभिज्ञ अशा अनेक सृष्टिंचा निर्माता

आहे. मंगळ, चंद्र व इतर ग्रहांवर जीवन आहे तसेंच जीवांचें वास्तव्य आहे हें तर तुम्हांस माहीत आहेच. तर, प्रत्येक ग्रह तिथल्या रहिवाश्यांचे आपले आपले विश्व आहे. अगणित विश्व एकत्र करून ब्रह्मांड बनतें आणि हें असे ब्रह्मांड देखील असंख्य आहेत. हें परमात्म निर्मितच आहे. त्याच्या शक्तीचें हें प्रमाण केवढें प्रचण्ड आहे.

जेव्हां त्यानें सृष्टि निर्माण केली तेव्हां साहजिकच हे इच्छिले की प्रत्येक विश्व व त्यांत राहणारे सजीव व निर्जीव पदार्थांनीं एका नियमित तऱ्हेचें आचरण करावें, ज्यामुळें त्याच्यातर्फे निर्धारित नियमांनुसार, खंड किंवा अवरोध न पडतां, जगत्–कार्य अबाधित रुपानें सदैव चालत राहो. त्याला आपल्या स्वाभिमानपूर्ण उत्पत्तिस (मनुष्यास) आवश्यक ज्ञान द्यावयाचे होते. मनुष्याजवळ बुद्धि असल्यानें तो ज्ञान संपादन करून घेण्यास समर्थ ठरला. म्हणून जगत्-कार्याच्या संचालनाचे नियम अथवा जगताचे विधान शब्दानें व्यक्त करणे आवश्यक झाले. तेव्हांच तर मानव--बुद्धि या ज्ञानास ग्रहण करूं शकली. हे सर्व शब्द जे परमात्म्यात्यानें सृष्टि निर्माण होतांच उच्चारित केले. आणि जे माणसानें ऐकिले तेच परमात्म्याचे आदेश आहेत; तेच वेद किंवा श्रुति आहेत.

आपल्या किंवा जगता संबंधी मानवास ज्ञान प्रदान करण्यास परमात्म्यातर्फे संस्कृत भाषेचा उपयोग केला गेला. म्हणून, संस्कृतला कोणत्याही विश्व, देश, समुदाय, जाति किंवा पंथ वैशिष्ट्याची भाषा म्हणतां येत नाही. ती तर एक सर्वमान्य भाषा आहे जिचा प्रथम उपयोग सृष्टि निर्माणानंतर लगेच, विश्व--विधान सांगण्यास, मानवाला ज्ञान देण्यास व परमात्म--वर्णन करण्यासाठीं केला गेला होता. संस्कृतचे हे परमात्म्याद्वारा उच्चारित शब्द वेद आहेत. परमात्म्याच्या सृष्टीच्या प्रत्येक विश्वांत हे वेद प्रकाशित केले होते. जेव्हां ही परमात्म्याकडून सृष्टि रचना होते, वेदच पहिले शब्द आहेत जे मनुष्य परमात्म्यापासून श्रवण करतो, ज्याच्यामुळें परमात्म्याबद्दल ज्ञान मिळतें आणि जगत् कार्य चालू

राहण्याच्या नियमांचे आकलन होतें असेंच होत असतें. म्हणून वेद संपूर्ण विश्वाची संपत्ती आहे. विश्वांतील कोणासही व्यक्ति नव्हे तर प्रत्येक मनुष्यास त्यानें वेदांचे अध्ययन करावे असा हक्क आहे. व ज्ञानप्राप्तीचा लाभ घेण्यास त्यांचा सदुपयोग करावा.

या वर्णनानें वेदांची रचना कोणी केली या संबंधी प्रचलित वादविवादांचा अंत झाला पाहिजे. ते मानवाची रचना नाहींच. कोणीही मनुष्य वेद रचयिता होण्याचा दावा करूं शकत नाही. सृष्टि-निर्माणाबरोबरच वेदांची रचना होत असते. आणि यामुळेंच वेदसुद्धां सृष्टि सदृश्य पुरातन व वयोमानरहित आहेत. ते प्रथम शब्द आहेत, जे सृष्टि निर्माण होतांच परमात्म्याद्वारा उच्चारले जातांत. मूळ रुपांत ते, चार भागांत नाहीत, व ग्रंथाकार ही नाहीत. ते फक्त उच्चारित शब्द आहेत ज्यांच्या योगें परमात्म्याने आपले आदेश ऐकविले व मनुष्याने ऐकले आणि भविष्य काळांत मार्ग–दर्शन होवो म्हणून स्मरण ठेवले. नंतर, माणसाकडून ते परिणीत केले गेले, हे लिहून ठेवले गेले, चार भागांत वांटणी केली गेली आणि यांना ग्रंथांचे रूप देऊन यांचे नामकरण वेद किंवा श्रुति, हें दिले गेले.

आपण नेहमी पाहतो की जेव्हां कोणी मनुष्य किंवा मनुष्यांचा समूह कोणत्या संघ किंवा समाजाची स्थापना करतो किंवा कोणती संस्था सुरू करतो, तर त्याचवेळीं तिच्या संचालनासाठीं नियम, उप-नियम, कायदा आदि निश्चित केले जातात. जर या नियमांचे पालन होत राहिले तर संस्थापकाचा हेतु सफल होतो. असले संघ, समाज किंवा संस्था व्यवस्थित रीतीने उन्नति करते. परंतु जर या नियमांचे पालन होत नाहीं किंवा विधानाचे उल्लंघन होतें, तर स्वाभाविकच फळ हेंच मिळणार कीं नियोजकाची योजना कोलमडणार.

हाच दृष्टांत येथे पण लागू आहे. परमात्म्याकडून निर्मित विश्व एक संस्था आहे. या संस्थेच्या उत्कर्षासाठीं अत्यंत निर्दोष नियम प्रतिपादित आहेत. याच ठोस नियमांस आम्ही 'वेद' नांवाने जाणतो. जर या नियमांचे श्रद्धापूर्वक पालन केले गेले तर दुष्काळ, वर्षाव,

शेती नष्ट होणे, धरणीकंप, पूर, दुर्घटना, संक्रामक रोग इत्यादीं उत्पातांने सृष्टि–क्रमांत विघ्न उपस्थित होण्याचे कांहीच कारण उरणार नाहीत.

पण जसे कांही मोजके लोकच परमात्म्यास ओळखण्याचा प्रयत्न करतात तसेच कांही लोकच वेदांस जाणण्याचा, वाचण्याचा किंवा समजण्याचा प्रयत्न करतात. हे मूठभर लोक साऱ्या सृष्टीच्या उत्पातांस व संकटास दूर करूं शकत नाहींत.

विश्वातील रहिवाश्यांना ज्यांचे अनुकरण व पालन केले पाहिजे असेच सिद्धांत वेदांमधें आहेत. असे केल्याने हेंच दिसणार आहे की निसर्ग सुनियोजित व ठराविक रीतीनें आपले कार्य करींत आहेत जसें कीं त्याच्याकडून अपेक्षित आहे. विपत्ति व संकटांचे प्रत्येक कारणांचे निवारण झालेलें असणार.

आम्हीं हें वाचलें किंवा ऐकलें आहे कीं पुरातन काळी प्रत्येक वस्तु मिळण्यास अतिशय सुकर असत. युद्ध होत नव्हते, महामारी नव्हती, संकटे नव्हतीं. लोक अतिशय निरोगी, धनवान व सुखी होते. त्यांना अलौकिक सामर्थ्य प्राप्त झालेले असे. यामुळें संकटसमयी जनतेचे दुःख–कष्ट निवारण होत असे. तें कांही जादू किंवा चमत्काराचे युग नव्हतें. ते स्वर्णयुग होतें. फक्त यामुळेंच कीं जनता वेदांचे आदेश मानीत होती व त्या आदेशांचे पालन होत होते. नंतर कालक्रमणेनें बुद्धिमत्ता व ज्ञानाचा पिढी नंतर पिढींत लोप होत गेला. लोकांनी वेदांची उपेक्षा व त्यांचा अनादर करणें सुरू केलें. याप्रमाणें निसर्ग–नियमांत विघ्न पडूं लागलें. फक्त इतकेंच नव्हे तर आम्हांस हेंही सांगणें सुरू झालें कीं वेदांची रचना, या किंवा त्या माणसानी केलेली कृति आहे. कांही लोक तर सिद्ध करतात कीं वेद इतके शतकांत किंवा सहस्राब्दि पूर्वी लिहिले गेले होते. याप्रमाणें अज्ञानाला स्वैर–संचारास स्थान मिळत गेलें. मत, पंथ, संप्रदायांच्या पडद्याखालीं अज्ञानाचाच प्रचार सुरू झाला. परमात्म्याचें अस्तित्व नाहींच नाहीं असे निश्चयाने सिद्ध करण्यास लोक तत्पर झाले. कांही

तर हा प्रचार करूं लागले कीं जें कांही आपण डोळ्यानें पाहतों, तेवढेंच सत्य, बाकी सर्व मिथ्या. याप्रमाणें एक किंवा अनेक कारणांस्तव वेदांशी दुजाभाव होत गेला व अद्याप चालूच आहे. म्हणून कांही आश्चर्य नाहीं की दुर्गति पसरो. दुष्कर्म, दुराचार क्षणोंक्षणीं घडो आणि नैसर्गिक कोपांचा तुमच्यावर पाऊस पडो.

ज्या गत स्वर्ण युगाबद्दल ऐकलें किंवा जाणलें जातें तें भूतकाळांतच होतें असा प्रकार नव्हे. ते युग वर्तमानकाळीं पण संभव आहे. याकरितां आवश्यकता आहे ती परमात्म्या विषयक शुद्ध धारणा कायम ठेवली जावो, त्याच्याबद्दल ज्ञान प्राप्त केलें जावो आणि त्याच्या शब्दांना अर्थात वेद यांना समजलें जावो, ज्यांच्यामुळें परमात्मज्ञान मिळतें. एक वेळ पुन्हां आम्हीं आपल्या आयुष्यातच विपुलता व समृद्धीचा काळ पाहूं शकतो. निसर्गावर प्रभुत्व मिळविलें जाऊं शकतें. नैसर्गिक व्यवहार क्रमानेंच चालतील हें पाहतां येईल. युद्ध टाळतां येईल. दुर्गतीस दूर सारलें जाऊं शकतें. सुख प्राप्त होणें निश्चित होऊं शकते.

जेव्हां कधी वेदांची उपेक्षा केली जाते, आणि त्यांच्या आदेशांचे पालन होत नाही, तेव्हां स्वर्णयुगाची स्थिति ढासळूं लागते आणि विलयास सुरुवात होऊन सकल विश्व अज्ञानांधकारानें आच्छादित होतें. जेव्हां कधींही पुन्हा वेदांच्या संदेशांचे महत्व लोक समजून घेण्यास सुरुवात करतात, वेदांचे आदर करूं लागतात आणि ज्ञान प्राप्तीकरितां त्यांचे अध्ययन करतात, वेदांच्या उपदेशांचे अनुसरण सुरू करतात, तेव्हां पुन्हा युग–परिवर्तन सुरू होऊ लागते आणि स्वणयुग पुन्हां परतून येतें. वेदांनी दिलेल्या ज्ञानांत असेंच सामर्थ्य आणि महत्ता आहे.

परमात्म्याचे शब्द जे वेद, ते सर्वज्ञ आहेत. ज्या कांही ज्ञानाची प्राप्ती तुम्हांस पाहिजे असेल ती वेदांत आहेच. जर का तुम्हांला हें जाणावयाचें असेल कीं काय केलें पाहिजे आणि काय नाहीं, तर वेद तुम्हांस ते सांगतील. तुम्हीं सुशिक्षित होऊं इच्छित असाल तर वेद

तुम्हांस ठराविक पाठ्य–क्रम देतील. तत्वज्ञानाच्या अध्ययना प्रीत्यर्थ वेदांपेक्षा जास्त अधिकारी, निर्दोष व निर्णयात्मक ग्रंथ नाहींच नाहीं.

चमत्कार तर असा आहे कीं सृष्टि–रचनेवेळीं परमात्म्याने जें कांही सांगितले होतें, तें आजतागायत तितकेंच सत्य आहे जितकें वेदांना प्रकाशित करतेवेळीं होतें. हें फक्त यामुळेंच कीं वेद परमात्म्याचे शब्द आहेत. परम् विज्ञानवेत्ता असल्यानें परमात्म्याचा प्रत्येक शब्द जो वेदांत आहे तो संपूर्णतया वैज्ञानिक सिद्धांत तर अटल असतातच. वेदांना आधार मानून रचलेले इतर धार्मिक ग्रंथ आहेत. हे ग्रंथ अप्रचलित किंवा जुन्या पद्धतीचे नाहींत. या ग्रंथांचा प्रत्येक शब्द अद्यापही तितकाच खरा आहे जेवढा हजारों वर्षांपूर्वी यांच्या रचनेच्या काळीं सत्य होता. ग्रंथकार साधु व ऋषि होते किंबहुना परमात्म्यातर्फे या कार्याकरितां निर्देशित होते.

म्हणून वेदांच्या अथवा वेदांवर आधारित ग्रंथांच्या अध्ययनानेंच त्या लोकांना समाधान लाभूं शकतें जे परमात्म्याबद्दल जिज्ञासा ठेवतात, ज्यांना नैसर्गिक–घटनाक्रम जाणायचे आहेत जे सत्यास शोधीत असतात, जे अध्यात्म–ज्ञानाचे इच्छुक असतात आणि जे एकसारखे सुखाच्या शोधांत व्यस्त आहेत.

वरील तऱ्हेच्या माणसांस वेद संपूर्ण समाधान व ज्ञान तर देतातच. बरोबरच मानव जातीस पवित्र राहण्यास उपयुक्त नियमांचासुद्धां आदेश देतात. याच नियमांस दुसऱ्या शब्दांत "**धर्म**" म्हटलें जातें. हा धर्म अनादि असल्यानें '**सनातन**' आहे. आणि परमात्म्याचे शब्द, अर्थात् वेद प्रणीत असल्याने 'सत्य' आहेत. या प्रमाणें या धर्माचें नांव '**सत्य सनातन धर्म**' झाले. जगत्निर्माण दिनींच या धर्माचा उदय झाला व जोंवर सृष्टि स्थित आहे तोंवर हा धर्म प्रचलित असतो. असाच क्रम आहे. सनातन शब्दाचा हाच वास्तविक अर्थ आहे. ज्याचा आदि नाहीं व अंत नाही तो सनातन होय. हें माहीत नसल्यानें कीं सृष्टीची उत्पत्ति केव्हां होते व तिची स्थिति किती काळ असते म्हणून वेद प्रणीत धर्म सनातन म्हणविला जातो.

सनातन किंवा सनातनी शब्दाचा चालू अर्थ तर स्वार्थी जनां-कडून प्रसारित आहे. सनातन शब्दाचा वास्तविक अर्थ तर वर पाहिलाच. आतां सनातनी शब्दाच्या अर्थास मी आणखी सोपें करून देतो. परमात्म्यांत त्याच्या सृष्टींत व त्यांच्या आदेशांच्याप्रमाणे ज्याला श्रद्धा व विश्वास आहे तो सनातनी होय. यांत कोणताही अपवाद किंवा बाधा नाहीं.

त्या प्रमाणेंच धर्म या शब्दास पण बरेंच अर्थ जोडलेले आहेत. किती तरी धर्म प्रचलित आहेत. यांच्याच मुळें पुष्कळसे पंथ, संप्रदाय, सिद्धांत, वादविवाद व भाष्य प्रचलित आहेत. हे सर्वच माणसास भुलवून परमात्म्याहून दूर ढकलतात. या किंवा त्या धर्माच्या आवरण-खालीं स्वार्थी व पाखंडी तत्वांना स्थित राहण्यास उत्तेजन मिळत असतें. ते लोक आपले हेतु अथवा स्वार्थासाठीं वेदांच्या शब्दांचा चुकीचा अर्थ लावून, भोळ्या भाबड्या लोकांची दिशाभूल करीत असतात. त्यांना भ्रमांत गर्क ठेवतात आणि व्याकुल करून सोडतात. अगदीं अनावश्यक व मूर्खताजनक दंगे-धोपे निर्माण केले जातात. मारामाऱ्यांत रक्ताच्या नद्या वाहावल्या जातात. या सर्वात भोळ्या व गरीब माणसांचेच नुकसान होतें. स्वार्थी व पाखंडी लोक जे या सर्व अनर्थाचे कर्तें असतात, आपल्या स्वतःस सुरक्षितच ठेवतात. धर्माच्या पताकांखालीं उघडपणें घडणारा हा अत्याचार अत्यंत दुःखमय आहे.

धर्माचा वास्तविक अर्थ तर आहे प्रत्यक्षिकरण, परमात्म-ज्ञान, परमात्म्याच्या अलौकिकतेची मान्यता, त्याच्या आदेशांचे पालन करण्याची तुमची कर्तव्यशीलता. याच प्रत्यक्षिकरणासाठीं पवित्रतेच्या नियमांचे पालन आवश्यक आहे आणि हे नियम वेदांत आहेत. धर्माचा अर्थ जर प्रत्यक्षिकरण आहे, तर एकापेक्षा अधिक धर्म कसें असू शकतात ? प्रत्यक्षिकरणाचें मुख्य साधन सत्य सनातन धर्म हेंच आहे. इतर सर्व प्रचलित धर्म याच मुख्य साधनाकडे अर्थात सत्य सनातन धर्माकडे ओढून नेणारे किंवा याच धर्मातून उद्भवलेले

संदेश आहेत. हे संदेश देखील मानव जातिस परमात्म्याच्या अवतारां किंवा प्रेषितां (पैगंबरां) पासून मिळालेले आहेत आणि त्यांच्याच पासून यथासमय वेगवेगळ्या देश वा विश्वांत प्रसारित केले गेले. जेव्हां जेव्हां परमात्म्याने इच्छिलें की मानव जातिच्या कल्याणा-साठीं कांही संदेश दिला जावा त्या त्या वेळेस त्यानें स्वतःच आपल्या अवतारांस किंवा प्रेषितांस निमित्त करून हें कल्याणकार्य केलेलें आहे. लक्षांत असू द्या कीं, हे संदेश मानव जातिच्या कल्याणा करितांच आहेत. कोणा एका समुदाय, समाज किंवा देशासाठी नव्हे. यावरून सिद्ध आहे की कोणाही मनुष्यास हक्क आहे कीं त्यानें या मधून कोणत्याही एकास किंवा सर्व संदेशांस आचरणांत आणावे. या पाठोपाठ, प्रत्यक्षिकरणाचे जे मुख्य साधन सत्य सनातन धर्म त्याच्या आचरणाचा हक्क आहेच आहे.

परमात्मा हा कांहीं व्यक्ति किंवा निजी नव्हे. त्याच्या सृष्टिच्या या अथवा इतर सर्व विश्वांत जिथेंही आणि जेवढीही माणसे आहेत त्या सर्वांसाठी परमात्मा हा केवळ एकच आहे. तो कोणतेंही रूप धारण करूं शकतो, म्हणून त्याचे अवतार किंवा संदेश-वाहक कित्येक असूं शकतात. यांना निमित्त करून तो स्वतःच मानव देहानें आपलें कार्य करीत असतो. परंतु परमात्मा केवळ एकच आहे, आणि नेहमीं, कोणत्याही वेळेस, कोणत्याही स्थानीं त्यास हुडकून काढणाऱ्यास तो प्राप्त होत असतो. त्याचे सर्वसमर्थ होण्याचें हें लक्षण आहे. संपूर्ण जगतावर त्याचे पूर्ण स्वामित्व आहे. तो नेहमीं चौकस तथा सावध असतो. माणसानें म्हटलेलें तर काय तो एका मुंगीच्या पदध्वनि देखील ऐकीत असतो. म्हणून प्रत्येक माणसास नेहमी सचेत असलें पाहिजे, कारण कीं परमात्मा सर्वत्र कांही पाहात, ऐकत, आणि जाणत असतो. हे सर्व परमात्म्यासच शक्य आहे, यामूळेंच कीं तो घाबरत नसतो.

स्वार्थी व पाखंडी लोक जे वेदांचा अशुद्ध अर्थ सांगून जनतेची दिशाभूल आणि सांप्रदायिक दंगे-धोपे निर्माण करीत आहेत, यांच्यावर देखील परमात्म्याची दृष्टि आहे. या सर्वांचा सर्वनाश निश्चित आहे.

वाचकानें आतां समजून घेतलें असेल कीं वेद काय आहेत. त्यांची जी कांही मिथ्या धारणा असेल, ती आतां दूर झाली असावी.

वेद, परमात्म्याचे शब्द आहेत. वेद, परमात्म्याचे आदेश आहेत. वेद, परमात्म्या कडून निर्धारीत असे नियम आहेत, ज्यांच्यानें जगत्–कार्याचें संचालन तथा नियंत्रण होवो. वेद, परमात्म–निर्मित कायदे आहेत. ज्यांच्या आचरणानें मनुष्य सर्वच बाबतींत आणि परमात्म्या संबंधी देखील ज्ञान प्राप्त करूं शकतो. वेद, परमात्म्याचे असे शब्द आहेत. ज्यांच्यामुळें वाटेल त्या विषयावर ज्ञान व प्रकाश प्राप्त होतात. या प्रकारें, वेद, परमात्म्या समान सर्वज्ञ आहेत.

मी वाचकांना हा सल्ला दिलेलाच आहे कीं ' ज्यास कुतूहल व जिज्ञासेचे समाधान करावयाचे असले तरी, आणि प्रकाश, ज्ञान व बुद्धिमत्ता प्राप्त करावयाची असली तरी, त्याने सरळ वेदांचा किंवा वेदांवर आधारित ग्रंथांचा आश्रय ग्रहण करावा. अनुभव–शून्य लेखकांची धर्म–विषयक निकृष्ट व पोकळ पुस्तकांच्या अध्ययनांत गंतण्यांत कांहीच अर्थ नाहीं. असलें साहित्य फक्त भ्रम आणि व्याकुळता वाढवतें.

परंतु वेदांचे अध्ययन इतकें सोपें नव्हे, कारण कीं ते संस्कृत भाषेंत आहेत. इतर भाषेंत केलेले वेदांचे भाषांतर तितके अधिकृत नाहीं जितके संस्कृतांत वेद. मूळ संस्कृतात लिखित वेदांच्या अध्ययनानेंच संतोष लाभूं शकतो. जर का हें सुचविलें जाईल कीं अगोदर संस्कृत भाषा शिकावी व मग वेदांचे अध्ययन करावें तर हीं अशी गोष्ट होईल कीं याच्यांत बराच वेळ जाईल आणि आजकाल तर वेळेचा अत्यंत अभाव आहे कारण अधिकांश किंवा जवळ जवळ प्रत्येक माणूस रात्रंदिवस उदरभरणासाठी आवश्यक ते मिळविण्याच्या खटपटींत किंवा आपले व आपल्यावर अवलंबून असलेल्यांचे दायित्व निर्भविण्यांत गुंतलेला असतो.

असें सर्व असूनही सुखाचा शोध करणाऱ्यांना वेदांचे अध्ययन करणें अनिवार्य आहे, वेदच परमात्म संबंधी ज्ञान देऊ शकतात. हें

ज्ञान प्राप्त करणें तर आवश्यक आहे. त्याची सुखांत बाधा टाकणाऱ्या अज्ञानाचे नाश होऊं शकेल.

म्हणून पुढील अध्यायांत मी वेद प्रणीत सत्य सनातन धर्माचें विवरण देत आहे जें प्रत्यक्षिकरण अर्थात परमात्म ज्ञानाचे साधन-मार्ग आहे. याप्रमाणें वेदांचे सार कळेल.

● ● ●

अध्याय ५

सुखाचे साधन मार्ग

या अध्यायांत हे पाहूं की वेदांचे सार जाणून घेण्यानें सुखाची प्राप्ती कशी काय होऊं शकते. हे देखील पाहूं की परमात्म्यानें जो धर्म मानव जातिला आचरण्यास दिलेला आहे, तो सत्य सनातन धर्म काय आहे.

वेदोक्त धर्मोपदेश सरळ भाषेंत हा आहे— "**सत्य सनातन धर्म, यज्ञ, दान, तप, कर्म व स्वाध्याय आहे.**" याचें अनुसरण करा. याचें आचरण करा. हाच सत्य सनातन धर्म वेदोक्त आहे व यासच मी सुखप्राप्तीचे साधे आणि खरे पांच साधन–मार्ग म्हणतो. याहून अधिक कांहींही करणें नाहीं. यापेक्षां कमी करण्याने कार्य होणार नाहीं. फक्त इतकेंच करणे पुरे आहे. आतां धर्म–ज्ञानाकरितां वेदांत तुम्हीं कांहीही शोधूं नका. संस्कृत भाषेची तुमची समस्या या प्रकारें सोडवून दिली आहे. विधि पूर्वक यज्ञ करावा, दान करावें, तपाचें आचरण करावें,कर्म अभ्यासांत आणावें, चिंतन, मननाने स्वाध्याय करावा. यानें तुम्ही परमात्म्याच्या आदेशांचे अनुयायी होता. यानें तुम्ही त्या सुखापर्यंत पोहोंचता ज्याचा तुम्हीं शोध करीत असतां

आतां मी या पांच संस्कृत शब्दांचे स्पष्टीकरण करणार आहे. हे शब्द परमात्म्याचे आदेश आहेत. हे शब्द मानव जातिच्या आणि सकल संसाराच्या कल्याणाकरितां आहेत. हे तुमच्या आणि संसाराकरितां मुक्तिकारक आहेत. पाहूं या ते कशा प्रकारें आहेत ?

यज्ञ

यज्ञ कामधेनु आहे जी वेदांनी मानव जातिकरितां दिलेली आहे. मनुष्यास निसर्गतः कांही इच्छा व महत्वाकांक्षा असतात. तर ठीक आहे. तुम्ही आपल्या सांसारिक समृद्धिच्या सगळ्या इच्छा संतुष्ट करूं शकतां. उपाय आहे यज्ञ. वेगवेगळे यज्ञ वेगवेगळ्या तऱ्हेच्या इच्छा–पूर्तिसाठीं निर्धारित आहेत. अग्निहोत्रापासून अश्वमेधापर्यन्त, नाना तऱ्हेच्या यज्ञ–महायज्ञांचा निर्देश केला गेला आहे, ज्यांनी व्यक्तिपासून विश्वापर्यन्तच्या समस्यांचे समाधान किंवा इच्छापूर्ति करतां येते. प्रमाणानुसार साधनसामुग्री तथा द्रव्याची गरज लागते.

यज्ञाचे सर्वसामान्य रूप अग्निहोत्र आहे. स्वर्णयुगांत घरोघरी अग्निहोत्र होत असे. अग्निहोत्रानें प्रत्येक माणूस आपली लौकिक इच्छा पूर्ण करीत असे. म्हणूनच कोणत्या वस्तूची उणीव भासत नसे. लोक सुखी असत. बराच काळ निघून गेल्यामुळें आता अग्निहोत्र जवळ जवळ नष्ट झाल्यासारखेच आहे. या कारणानेंच तर नैसर्गिक कोप व संकटे, दुष्काळ, अवेळीं वर्षा, अवर्षा, महामारी, रोग आणि व्याधि इत्यादि होत असतात, ज्यांचे फलस्वरुप सर्वत्र दुःखच पसरलेले आहे. अग्निहोत्र आचरणानें व त्याच्या पुनरुज्जीवनानें या सर्व दुःखांची चिकित्सा केली जाऊं शकते. अग्निहोत्राचा या विश्वांत लोप झाल्या कारणाने वातावरण अशुद्ध झालेलें आहे. म्हणनच तर वर वर्णिलेल्या दुःखांस स्थान मिळालें आहे.

...३

यज्ञ आणि महायज्ञाचें कार्य आहे वायुमण्डलास शुद्ध करणें. वेदोक्त आहुति अग्नित दिल्यानें वायुमण्डलावर परिणाम होतो. हा परिणाम शुद्धिकारक आहे. वैज्ञानिकांच्या या परमाणु युगांत, प्रत्येक आहुतिच्या पदार्थांना पडताळून हा पत्ता लावतां येईल कीं ते अग्नित भस्म झाल्यावर वायुमण्डलावर काय परिणाम होत असतो. कोणत्या ही वैज्ञानिक परीक्षेने हें सिद्ध होईल कीं वायुमण्डलाच्या स्थितित फार चांगले परिवर्तन होतें. यज्ञ सुरू होण्यापूर्वीच्या आणि पूर्ण झाल्यानंतरच्या वायुमण्डलाच्या दोन्हीं स्थितिचे परीक्षण करून परिणामांस लिपिबद्ध करतां येईल. मग या परिणामांस विश्व-विख्यात वैज्ञानिक प्रकाशित करूं शकतील. याप्रमाणेंच यज्ञ करतै वेळीं शास्त्रीय पद्धतिनें वेदमंत्रांचे जे उच्चारण केलें जातें त्याचे-सुद्धा परिणाम वैज्ञानिकांद्वारा पडताळले जाऊं शकतात. प्रत्येक मंत्रो-च्चाराचा वायुमण्डलावर परिणाम होतो. यज्ञाहुति व स्वाहाकारानें निश्चितच वायुमण्डलांत पसरलेल्या अशुद्धांचे शुद्धिकरण होत असतें. यज्ञ आणि महायज्ञ वारंवार करीत राहिल्याने सकल विश्वाचे वायु-मण्डल शुद्ध केले जाऊं शकतें. हें झाल्यानें वर्तमान दुःख दुर्दशेचे स्थान सुख समृद्धिस मिळेल. यथाकाल वर्षा होईल, ज्याच्याने उत्तम पीक येईल. निसर्गाचे प्रत्येक अग आपले कार्य ठराविक तऱ्हेने करेल. परिणाम तर आश्चर्यजनक चमत्कार–पूर्ण असे होणार.

या मुळेंच यज्ञास कामधेनु म्हणतात. अर्थात् तुमची आवश्य-कता, इच्छा व महत्वाकांक्षा यांच्या पूर्तिचा दाता यज्ञ आहे. याच हेतुने जर वेदांनी यज्ञ सांगितले आहेत आणि वेद तर परमात्म्याचे आदेश आहेत, तर संशय करण्यास वावच कोठें आहे ? विज्ञानाच्या दृष्टिने उन्नत अशा या काळांत, या सिद्धांताचे परीक्षण कां म्हणून करीत नाहीं ? जर अॅटम बॉम्ब आणि हैड्रोजन बॉम्बसारखे विना-शक तत्वांच्या स्फोटाचें परीक्षण करण्याचा खर्च आणि हानि भोगूं शकता, तर आपल्या विज्ञान–विद्येचा यज्ञांतील आहुति व मंत्र यांचे परीक्षण करण्यांत उपयोग करूं शकतांच. खरोखरीच वातावरणाची

शुद्धि होत असते, हे परिणाम पाहून तुम्हीं स्वतःचे समाधान करून घेऊं शकता.

वर्तमान अव्यवस्थित आणि दुःखी संसाराचा एकमात्र इलाज, अग्निहोत्र आणि यज्ञ आहे. व्यक्तिगत लौकिक समृद्धि तर निश्चित होणारच त्याबरोबरच वायुमण्डलाची अशुद्धता नष्ट झाल्याने नैसर्गिक क्रम ठराविक तऱ्हेनें घटित होईल. वायुमण्डल शुद्ध झाल्याने मानसिक शक्तित चांगले परिवर्तन होईल. लोभ, लालुच, वैमनस्य, दरोडे व चोरी, मारून टाकण्याची व लुटण्याची प्रवृत्ति, दुराचाराकडे आसक्ति, युद्ध वगैरे सर्व कमी होतां होतां बंद पडणार. यांच्या जागी शांति, समृद्धि, सुशासन, सदाचारी प्रजा दिसूं लागणार. विश्वव्यापी अनिष्ट प्रवृत्ति पासून मानव जातिची मुक्तता होईल. हे सर्व स्वप्न वर्णन नव्हे. हे तर स्पष्ट सत्य आहे, जे परीक्षणानंतर स्वीकृत होण्यास तयार आहे. वेद सत्यानेंच परिपूर्ण आहेत. त्यांच्यांत सत्याशिवाय इतर कांहीच नाही. म्हणूनच जे कांही येथे लिहिलें आहे त्यांत संदेहास वाव नाहीं.

प्रत्येक तऱ्हेच्या यज्ञाचा विधि पण वैज्ञानिक आहे. ठराविक वृक्षांच्याच लाकडांचा अग्नि तयार केला जात असतो. हे वृक्ष संपूर्ण विश्वांत वाटेल तेथे उपलब्ध आहेत. हवनकुंडाचा आकार, प्रकार व दिशा ही निश्चित आहे. प्रज्वलित अग्नित टाकल्या जाणाऱ्या आहुतिचे ठोस व तरल पदार्थ ही निश्चित आहेत. आहुतिचा मध्यान्तर देखील निश्चित आहे. विशिष्ट यज्ञाकरितां विशिष्ट वेदमंत्रांचा उच्चार निर्धारित आहे. यज्ञ करणाऱ्याची आणि पुरोहिताची योग्यता काय असावी हे देखील निश्चित आहे. वाटेल तसा प्रकार मांडता येत नाही. प्रत्येक बाब यथाक्रमानुसार सांगितलेली आहे.

मी याही गोष्टीची उकल करू इच्छितो कीं यज्ञाच्या आहुतित कोणत्याही पशु किंवा मानवाचे रक्त किंवा मांसास मुळींच स्थान नाही. कदापिही नाहीं. जर तुमच्या मनावर असा कांही प्रभाव पडलेला असेल तर तो चुकीचा आहे आणि सर्रास असत्य आहे.

व्यक्तिच्याकरितां यज्ञाचे सरळतम रूप अग्निहोत्र हेंच ठीक आहे. याच्या आचरणाकरितां घरांत नेहमी अखंड अग्नि टिकवून ठेवावा लागतो. हा अग्नि तेल किंवा विजेच्या स्टोव्हचा किंवा गॅसचा नसतो. तो गाईच्या शेणाच्या गोवऱ्याचा साधा अग्नि पाहिजे. स्वाभाविक आहे की अग्निहोत्र करणारा ग्रहस्थ गाय पण ठेवेल. एक किंवा अधिक गाई ठेवण्याच्या लाभांच्या वर्णनाची येथें गरज नाहीं कारण ते तर सर्व विदित आहेच. अग्निहोत्राचा विधिही सरळ आहे, जिला घरां-तील माणसेंच कोणाबाहेरील माणसाच्या मदतीशिवाय सहजच संपन्न करूं शकतात. यज्ञाचे हे रूप अग्निहोत्र, भूतकाळीं प्रचलित होतें आणि व्यक्तिगत समृद्धि–दायक होतें. तुमच्या दैनंदिन कार्य-क्रमांचा साक्षी अग्नि असावा हेंच वेदांचे मन्तव्य आहे. गृहस्थ व त्याची पत्नी देखरेख ठेवून हा अग्नि चौवीस तास जीवनभर राख-तात. दोघांपैकी कोणा एकाच्या मृत्युनंतरच अग्निच्या या अखंडतेंत खंड पडतो.

जरी अग्निहोत्र आपापल्या घरीं ठेवतात, तरी पण त्याचा प्रभाव आजूबाजूच्या वातावरणावर देखील होतो आणि त्याच्या शुद्धतेनें इतर रहिवाश्यांची देखील लौकिक समृद्धि होणें निश्चित असते. म्हणून जर का फक्त अग्निहोत्राचेंच अधिकाधिक व्यापक स्वरूपानें आचरण केलें जाईल, तर त्याचा परिणाम संपूर्ण क्षेत्र आणि वसाहती-वर पडून वायुमण्डल शुद्धि आणि साधन–समृद्धि करेल. तरी पण यज्ञाचें तर अग्निहोत्र एक सामान्य रूप आहे. निःसंदेह इतर यज्ञ व महायज्ञ अधिक प्रभावशाली व सर्वदाता आहेच आहेत.

मी वाचकांना सावधान करूं इच्छितो की यज्ञाचा जो अर्थ मी सांगितला आहे आणि या नंतर जे दान, तप, कर्म, स्वाध्याय मला सांगावयाचे आहे, यांवर केलेलीं व्याख्या स्वयंपूर्ण नाहीं, होऊंच शकत नाहीं. वेदांच्या या पांचही शब्दाचे तात्पर्य अत्यंत विशाल आहेत, ज्याला मी शब्दांत व्यक्त करूं शकत नाहीं. फक्त तुम्हांला कल्पना देण्याकरितांच या शब्दांचा अर्थ सांगितला आहे. कृपया स्मरण ठेवा

कीं अर्थाची केवळ कल्पनाच दिली जात आहे, प्रत्यक्ष अर्थ नाहीं. ज्यांना मी सुखाचे साधन–मार्ग म्हणतो त्या पांच शब्दांचा अत्यंत गहन अर्थ, साध्या शब्दांत माण्डणे शक्यच नाहीं.

सुखाचा शोध करणाऱ्यांचा प्रथम साधन–मार्ग यज्ञ होय. याच्यानें आपल्या प्रत्येक सांसारिक इच्छा आकांक्षेच्या पूर्ति विषयीं तो निश्चित होतो, हा झाला लौकिक लाभ. त्याचा व्यक्तिगत लाभ तर आहे विचारांची शुद्धि, जी सुखाच्या शोधांत त्याच्या करितां एक महत्वपूर्ण पाऊल टाकणें आहे.

दान

दानाचा अर्थ आहे विनामूल्य आपली वस्तु दुसऱ्यास देऊन टाकणें. अन्न, वस्त्र, द्रव्य, किंवा पशु दान केले जाऊं शकतात. इमानानें कमाविलेल्या आपल्या संपत्तिची कोणतीही वस्तु दान केली जाऊं शकते. सर्वदाता, यज्ञामुळें प्राप्त झालेल्या कोणतीही वस्तूचें दान केलें जाऊं शकतें.

वेदांनी तुम्हास यज्ञ कामधेनु दिली आहे आणि सांगितले आहे की ज्या कोणत्या वस्तूची गरज असेल ती मागण्यास संकोच करूं नका. तुमची इच्छा पूर्ण केली जाईल. म्हणून तुम्ही लौकिक संपत्तिप्राप्तीची आपली इच्छा किंवा महत्वाकांक्षा पूर्ण करून घेत असतां. आतां वेदांचे म्हणणें आहे कीं जी कांहीं संपत्ति तुम्हीं मिळविली आहे किंवा एकत्रित केली आहे, ती सर्व किंवा तिचा एक भाग दान करा. बरोबरच वेद तुम्हांस ही खात्री देतात कीं जे कांहीही तुम्ही दान कराल ते कित्येक पटीनें तुम्हास परत मिळेल. दृष्टांत दिल्यास, तुम्ही एक सहस्त्र रुपयांचे दान कराल तर तुमच्या जवळ, अनेक सहस्त्र परतून येतील. ही गोष्ट द्रव्यासच नव्हे तर प्रत्येक संपत्तिसही लागू आहे. दानीचें ऐश्वर्य अवश्य वृद्धिगत झाले पाहिजे. हाच दानाचा चमत्कार आहे.

परंतु दान शब्दाचा वेदांचा जो आशय आहे तो प्रथम चांगल्या प्रकारें समजलेला असला पाहिजे, तेव्हांच तर दानाच्या फलाची मागणी केली जाऊं शकते आणि गौरव वर्णित केंले जाऊं शकते.

दान त्याच वस्तूंचे व्हावें ज्यांच्यावर दात्याचें स्वतःचें स्वामित्व असेल. सत्यतेनें व इमानानें प्राप्त किंवा यज्ञामुळें प्राप्त धनसंपत्तिचें दान झालें पाहिजे. हे समजून घेणें सरळच आहे.

दात्यांची ही जबाबदारी आहे कीं दान फक्त सुयोग्य व सत्पात्र व्यक्तिसच दिलें जावो. तेव्हांच तर दान केलें गेल्याचें समाधान मिळूं शकतें.

अन्न देणें असेल, तर तें भुकेल्यास द्या. वस्त्र देणें असेल, तर तें निर्वस्त्रांस द्या. धन द्यावयाचें असेल तर तें त्यांना द्या जे अभागी आणि तुच्छ आहेत. याप्रमाणें सत्पात्र पहा आणि दान करा. पण दानाचे लक्षण इतकेंच आहे असें नका समजू. श्रीमंत आणि संपन्न व्यक्तिसही दान दिले जाऊ शकते, जर तुम्हास माहीत असेल कीं तो धार्मिक आहे. मी मागील अध्यायांत धर्माचा अर्थ समजावला आहेच तो लक्षांत ठेवा. अशी श्रीमंत व्यक्ति, जरी त्यास कोणत्याही लौकिक वस्तूंची उणीव नाहीं तरीही, योग्य आणि पात्र आहे आणि त्यास दान दिले जाऊं शकते. कारण की ज्या वस्तु तुम्ही त्यास दानांत द्याल त्यांचा उपयोग तो धर्मपालन म्हणजेच प्रत्यक्षिकरणा करितांच करेल. अशा प्रकारे योगी, साधुही आदर्श आहेत ज्यांना दान दिलें जाऊं शकतें, जरी त्यांना कोणत्याही वस्तूची गरज नसते. पण त्यांच्या तर्फे तुम्हीं दिलेल्या वस्तूंचा उपयोग परमात्म मार्गांत आणखी छान प्रकारें होईल.

तें दान तर दानच नाहीं जें अशा माणसांस दिलें जातें जे अयोग्य किंवा अपात्र असतात, जे असामाजिक तत्त्वांत लिप्त असतात अथवा जे दुष्कर्म दुराचारांत गुंतलेले असतात. दान मिळाल्यानें त्यांच्या अपराध–वृत्तिस प्रोत्साहन मिळेल आणि यासाठीं दाताच जबाबदार ठरेल.

दान देण्याचे अगोदर तुमच्याकडे कोणी कांहीं वस्तु मागावी व मग तुम्ही मागितलेली वस्तु त्यास द्यावी याची आवश्यकता नाहीं. या सर्वांची आवश्यकता नाहीं. दात्यास दानाबद्दल स्वतःच स्वतंत्र निश्चय केला पाहिजे. हा निश्चय किंवा संकल्प स्वेच्छेने झाला पाहिजे. निश्चय होतांच जो कांही द्रव्य किंवा संपत्तिचा भाग दान करावयाचा आहे, तो आपल्या संग्रहांतून बाजूस सारून ठेवला पाहिजे. मग सत्पात्र किंवा योग्य व्यक्तिचा शोध केला पाहिजे आणि दान केलें पाहिजे.

याप्रमाणें हें समजावून दिलें आहे कीं वेदांच्या अनुसार दान काय आहे. या गोष्टींना ध्यानांत ठेवून जर तुम्ही दान कराल, तर तुमची जी लौकिक स्थिति आज आहे, तींत अनेक पटीनें वृद्धि होईल. तुमची मिळकत व प्राप्ती त्याहून कोठें जास्तच होईल, जितके की तुम्ही दान केलें असेल. या गोष्टीवर दृढ विश्वास ठेवा.

जर का तुम्हांस द्रव्याची किंवा पुष्कळ द्रव्याची आवश्यकता आहे तर त्याच्या प्राप्तिचा सरळ उपाय हाच आहे की तुम्हीं दान करा. आपल्या वर्तमान संपत्तिचे किंवा त्याच्या एका भागाचे दान करा. आपल्या गरजेनुसार हें ठरवा की किती काय दान केलें जावे. वर सांगितल्या प्रमाणें जर दान केलें गेलें तर तुम्हास द्रव्य, किंवा अधिक द्रव्य जें तुम्ही इच्छिलें आहे तें मिळेल. तुमच्या चिंतेस दूर करण्याचा हा दान नामक उपाय उघडपणें, जोरदार आणि सत्यपूर्ण शब्दांत सांगितला जात आहे. याचा उपयोग तुम्हीं बेधडक करूं शकतां. दानाने तुम्ही निरंतर आपल्या खजिन्यांत वृद्धि करूं शकाल. उत्तम तऱ्हेनें केलेले प्रत्येक दान, परमात्म्याच्या कृपेने, तुमच्या धन वैभवांत वृद्धि करते. वेदांच्या या आश्वासनावर निर्भर असा.

अन्न, वस्त्र किंवा पैश्यांचे अव्यवस्थित वितरण करण्यांत, भले ही तुमचा निश्चय दानाचा असो, परोक्षरूपानें भिक्षा-वृत्तिस उत्तेजन मिळतें. भीक मागणें सामाजिक अनिष्ट तर आहेच. त्याबरोबरच तुमच्या दैनिक व्यवहारांत तुम्हास भिकारी किंवा असे लोक भेटत

असतात जे कोणत्या न कोणत्या सबबीने तुमची कांहीं मदत घेऊं पाहतात. तुम्हाला कांही न कांही द्यावेंच लागतें. यास दान नका समजूं. तुम्हास तर त्या भिकाऱ्यास किंवा त्या मदत मागणाऱ्यास निपटावयाचे होते किंवा टाळावयाचे होते म्हणून कांही रुपये पैसे द्यावे लागले, याला तुम्ही मदत करणें म्हणूं शकाल. तसें तर, ही मदत देखील नव्हे.

अशा दानींबद्दल पण आपण ऐकलें आहे जे आपली कोणती ही किंवा सर्वच वस्तु देण्यास तत्पर असत, पण कोणत्याही याचकास त्यानें मागितलेली वस्तु दिल्याविना विन्मुख जाऊं देत नव्हते. अशा दानीचा आंतरिक भाव हा असतो कीं तो परमात्म्यासच या याचकांच्या रूपांत आलेले पाहतो. त्याचा विवेक त्यास हे सांगतो की जे कांही पण त्याचे स्वतःचे आहे किंवा जी कांही धन-संपत्ति पुढील आयुष्यांत त्यास मिळणें आहे ती सर्व परमात्म्याच्या कृपे-मुळेंच. म्हणून ज्याचें आहे त्यालाच अर्थात् परमात्म्यास, तो आपलें सर्व कांही देण्यास तत्परच असतो. साहजिकच अशा दानीस स्वतः करितां कोणत्याही वस्तुची उणीव राहात नाहीं. त्याचा खजिना नेहमींच तुडुम्ब भरलेला असतो.

तेव्हां दानापासून वेदांचा आशय हाच आहे की तुमच्या लौकिक समृद्धित अनेक पटीनें वृद्धि व्हावी, आणि या विषयांत तुम्ही संतुष्ट राहावे. त्याबरोबरच सुखाच्या शोधांत तुम्हीं एक पाऊल आणखी पुढे जाल. ते यामुळेंच कीं दानाचें आचरण करीत राहिल्यानें धन-संपत्तिचे येणें आनंददायक किंवा जाणें दुःखदायक होणार नाहीं. सांसारिक वस्तूंच्या प्राप्ती किंवा अप्राप्तीने उत्पन्न होणाऱ्या भाव-नांवर तुमचे नियंत्रण होईल, म्हणजे तुमची मानसिक भावना विकसित होईल, तुम्ही वाटेल तेव्हां विलासी, आरामदायक ,किंवा आवश्यक वस्तूंचा देखील त्याग करावयास तत्पर राहाल. सुखाच्या शोधांत इतके पुढें जाणें खरोखरींच महत्वपूर्ण आहे.

लोकांत दान देण्याच्या प्रवृत्तिचा प्रसार झाल्यानें आपोआप

भ्रष्टाचाराची कमाई नाही होणार, कठीण व यथार्थ मेहनतीस प्रोत्साहन मिळेल आणि सामाजिक अनिष्टांचे निवारण होईल. लालच व ईर्ष्येचा अंत होईल, ज्याच्यानें अपराध–वृत्ति बळावणार नाहीं. गरीब आणि गरजूंस तर दान मिळाल्याने सहाय्य होतच असते.

अशा प्रकारें दानानें दानीस, दान मिळणाऱ्यास तथा मानव जातीस सर्वांनाच लाभ होत असतो. दान सुखाचा साधन–मार्ग आहे, हें तर सांगितलेच आहे.

तप

सुखाच्या शोधांत तिसरा साधन–मार्ग तप किंवा तपस्या किंवा तपश्चर्या होय.

यज्ञाने वातावरण शुद्धीमुळें सांसारिक उन्नतिच्या तुमच्या इच्छा पूर्ण होतात व तुमच्या विचारांत पवित्रता येते. दान तुम्हांस सांसारिक उन्नतिच्या नव्या नव्या शिखरावर पोहोचविते आणि बरोबरच लौकिक तत्त्वाविषयीं अनासक्त बनून राहणें शिकविते. म्हणून आतां तुम्ही तपाचे आचरण करूं शकता.

तप आपल्या स्वतःवर नियंत्रण किंवा संयम आहे. तपांत स्वेच्छेने शारीरिक आणि मानसिक ताण ओढवून घ्यावयाचा आहे आणि नित्य नियमित आचरणाने त्या ताणास आपल्या सवयीत टाकून घ्यावयाचे आहे.

पण तपाचा वास्तविक अर्थ माहीत नसल्यानें, त्याबद्दल लोकांत भ्रामक कल्पना पसरलेल्या आहेत. तपाच्या नांवानेच लोक घाबरतात. त्यांना याविषयीं जे कांहीं माहीत आहे ते हेंच आहे कीं तपांत अनेक त्रासांना तोंड द्यावे लागतें, त्यासाठीं पुष्कळ पूर्व–तयारी करावी लागते. यामुळें कोणी तर तप करणें अगदीच अशक्य आहे

असेंच मानतात. कांही लोक असे समजतात की तप करण्यास आधी तर संन्यास घेतला पाहिजे, विशिष्ट तऱ्हेचे कपडे घातले पाहिजेत, गांव, शहर आणि माणसांपासून लांब राहिले पाहिजे, रानावनांत कोणती जागा शोधून, तेथें झोपडी करून, शारीरिक यातना सोसल्या पाहिजेत, इत्यादि. अशा तऱ्हेच्या किती तरी भ्रामक कल्पना प्रचलित आहेत. जर कां तप खरोखरीच असें असेल तर, कोणीही, आणि मी पण सहजच तपापासून दूर पळणार, त्याच्याजवळ देखील फिरकणार नाहीं आणि त्यासंबंधी विचारहि करणार नाहीं व वाचरणारही नाहीं.

परंतु वास्तविकता कांही निराळीच आहे. आम्ही तिसऱ्या अध्यायांत हे स्पष्टपणें जाणून घेतले आहे की प्रत्येक माणसास सुखी होण्याचा हक्क आहे. म्हणून हे तर स्वाभाविकच आहे कीं सुखाच्या प्रत्येक साधन—मार्गाच्या आचरणाचा त्यास हक्क आहे आणि कोणताही साधनमार्ग अनावश्यक रीत्या कठीण केलेला नसणार. जर कांहीं निवडक लोकांनाच सुखी होण्याचा हक्क असता, तरच पूर्वतयारीच्या अडचणींत टाकून मार्गास अवघड केले असते. ही गोष्ट की सगळ्या मानव जातीस सुखी होण्याचा हक्क आहे. हे स्वतःच सिद्ध करते कीं सुखाचे साधन-मार्ग सरळच असले पाहिजेत.

आतां मी तप आचरणाची वास्तविकता तुम्हांस सांगतो. मनुष्य-वस्तीहून दूर, रानांत जाण्याची कांहीं जरूर नाहीं. तेथें तुम्हांस हिंस्त्र जनावरें भेटू शकतात, आणि तुमच्याजवळ कोणतेही शस्त्रास्त्र नसल्यानें तुम्हीं भयातुरच होऊन राहणार. तेव्हां तप कसे जमेल ? तसेंच, तुम्हीं तेथें खाणार काय ? अन्न कोठून आणाल ? शिजवेल कोण ? रानांत जावयाचा विचारच कां करतां ? ज्या घरांत तुम्ही राहात आहांत, तेंच घर तप आचरणाकरितां आदर्श असें स्थान आहे.

त्याप्रमाणेंच कोणत्या विशेष प्रकारच्या कपड्यांची गरज नाहीं. जे कपडे घालण्याची तुमची सवय असेल, ते अत्युत्तम आहेत. तपाचा कपड्यांशी कांहीच संबंध नाहीं.

तसेंच संन्यास कां घेतां ? आपल्या बायकांपोरांपासून दूर कां पळतां ? तुम्ही त्यांना त्यागून द्याल तर त्यांचा सांभाळ कोण करेल ? ते तर कधीं कधीं तपाच्या आचरणांत सहाय्यक होऊं शकतात. परंतु कोणत्याही स्थितींत ते तपांत बाधा आणू शकत नाहीत. मग त्यांच्या किंवा ज्या समाजांत तुम्ही आहांत त्याबद्दलच्या तुमच्या कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांपासून दूर कां पळतां? संन्यासाचा कांहीच अर्थ नाहीं जोवर तो पूर्ण नसेल आणि संपूर्ण संन्यास घेणें सहजासहजीं शक्यच नाही. संसारांत संसाराचे बनून रहा. तपानें तर तुम्हीं संसाराचे ,एक महत्वपूर्ण अंग बनू शकतां. याचा अर्थ असा नाहीं कीं मी संन्यासाचा विरोधी आहे. मला जे सांगावयाचे आहे तें इतकेंच की तपाच्या आचरणासाठीं संन्यासाची गरज मुळींच नाहीं.

आपल्या घरांत राहून, आपला परिवार, नातेवाईक आणि मित्रांमध्यें वावरून, आपल्या सर्व सांसारिक जबाबदाऱ्या सांभाळीत असतां, आपले व आपल्या आश्रितांच्या निर्वाह योग्य उपजीविका करीत असतां, जे तप आचरण होईल, तें आदर्श तप असणार आणि म्हणूनच ते अल्प काळांत फार परिणामकारक होईल. तपाचें वास्तविक रुप हेंच आहे. यामुळेंच वाटेल त्या आणि कोणत्याही अपवादाशिवाय प्रत्येक माणूस तत्कालीच तप सुरू करूं शकतो.

तपाच्या आचरणासाठीं स्त्री–पुरुष, संप्रदाय, जाति, वय इत्यादिचा कांहींच प्रतिबंध नव्हे. कोणीही मनुष्य आयुष्यांतील कोणत्याही क्षेत्रांत राहून तप करूं शकतो आणि कोणत्याही क्षणीं त्याची सुरुवात करूं शकतो.

अशा प्रकारें दिसून येतें कीं कोणत्याही प्रकारची पूर्व–तयारी किंवा अटीच्या पूर्णतेची तपाच्या अभ्यासाशीं कांहीच संबंध नव्हे. मला आशा आहे की तपाच्या बाबतींत ज्या कांहीं भ्रांतिपूर्ण कल्पना प्रचलित आहेत, त्यांचे निराकरण करण्यांत मी सफल झालों आहे. आतां पाहावे कीं तप काय आहे आणि ते कां करावें लागतें.

आधीं मी हेंच समजावेन कीं तप कां करावयाचे असते. तेव्हांच आपण समजूं शकूं कीं तप काय आहे.

सुखाची व्याख्या (अध्याय-३ मध्यें) पाहिली आहे कीं सुखांत शरीरावर तथा शरीराच्या सर्व अवयवांवर इंद्रियांवर पूर्ण प्रभुत्व असतें. सुखाचे हे रूप शिकण्यास तप करणें आवश्यक आहे. तपाच्या आचरणानें तुम्हीं शरीर व मनाचे मालक बनाल, आणि तेव्हांच अवयव व इंद्रियांवर नियंत्रण ठेवूं शकाल.

दोन मानव-शरीर बाह्यत: जरी एक सारखे दिसत नाहीं कारण कीं रंग, लांबी, आणि स्थूलतेंत भिन्नता असते. तरी मानव-रचनेंत तर कांहींच भिन्नता नसते. प्रत्येक पूर्ण शरीरांत दोन पाय, दोन हात, पोट, कान, डोळे, नाक, डोकें इत्यादि असलेंच पाहिजे. या रचनेंत तर कोणतीहि कोणत्याहि प्रकारची भिन्नता नसते. शरीरास जिवंत ठेवण्यासाठीं ज्या सामान्य गरजा आहेत त्यांच्यांतही कांही फरक नसतो, जसें खाणें, पिणें, विश्रांति घेणें, काम करणें, झोंप येणें वगैरे. प्रत्येक शरीरास ही कामें नित्यच करावयाची असतात यांत कांहीहि अंतर पडत नसते.

खरे पाहिल्यास व्हावयास हे पाहिजे की तुमचे शरीर व मन तुमच्या आज्ञा मिळवून त्याप्रमाणें वागावयास हवे. परंतु हा फक्त सिद्धांतच, प्रत्यक्षांत तर तुम्हींच आपल्या शरीर व मनाचे चाकर बनून त्यांच्या आज्ञेचे पालन करीत असतां. शरीरास एका विशिष्ट प्रकारानें किंवा एका विशेष तऱ्हेनें राहण्याची संवय पडून जाते. जेव्हां ही या राहण्याच्या प्रकारांत कांही कमतरता येते, तर तें विद्रोह करते आणि तुम्हांस बाध्य करतें की धांवपळ करून त्या उणीवेस भरून काढा. असे ते तुम्हांस दुःखी करीत असते.

तुम्ही हें जाणतां कीं मानव–शरीरास, जसें वाटेल तसें राहण्यास बाध्य केले जाऊं शकते. वातानुकूलित खोलीचें वैभव भोगणारें किंवा उन्हाळ्याचे दिवसांत पंख्याचा आराम घेणारें शरीर त्याच प्रमाणे जगतें जसें कीं उन्हाळ्यांत भर दुपारीं मेहनत मजुरी करणारे

एक अन्य शरीर. या सर्व शरीरांच्या स्वाभाविक रचनेंत किंवा रोजच्या कार्यक्रमांत कांहीही परिवर्तन होत नसतें. एक शरीर विलासी भोजन करीत असते आणि दुसऱ्यास नुसते चटणी-भाकरीचे जेवण मिळत असते. तरी पण या दोन्हीं शरीरांच्या रचनेंत आणि कार्यांत कांही फरक होत नाहीं. एक शरीर राजशाही अवाढव्य वाड्यांत रहात असो किंवा दुसरे शरीर गवताच्या झोपडींत, तरी पण कोणतीही भिन्नता शरीर-रचना व शारीरिक कार्यांत आढळणार नाहीं. या सर्व गोष्टीनें तर हें निश्चित आहे की मानव-शरीरास वाटेल तसें ठेवलें जाऊं शकतें. जर का त्याच्या दररोजच्या गरजा फार वाढवून ठेवलेल्या असतील, तर त्यावर प्रभुत्व पावणें अवघड होईल. तेंच तुमचे मालक बनून तुम्हास आज्ञा देत राहील. जे शरीर परमात्म्याने तुम्हांस या करितां दिलें आहे की त्याचा उपयोग करून तुम्ही सुखाचा शोध करावा आणि सुखी व्हावें, तेंच शरीर तुमचे अनन्य शासक बनतें आणि तुम्हास सुखापासून दूरच ठेवतें.

सूट दिल्यानें तर शरीर आणि मन उन्मत्त होते. त्यांना आटोक्यांत ठेवणें आवश्यक आहे, की ज्यामुळें त्यावर प्रभुत्व मिळवितां येवो. तेव्हांच तर हक्कानें तुम्हीं हें सांगू शकाल की शरीर व मन हे तुमचे स्वतःचे आहेत. या करितांच तप केले जाते. याच्याच करिता तपाचा आदेश दिलेला आहे.

आता आपण पाहूं या की तपाचा खरा अर्थ काय आहे.

यज्ञ आणि दान यांत तुम्हाला तुमच्या स्वतःच्या शिवाय कांही धन, सामुग्री, संपत्ति इत्यादिची गरज असते. आतां उरलेल्या तिन्हीं साधन-मार्गांत, म्हणजे तप, कर्म, स्वाध्यायांत तुमचा संबंध आपल्या शरीर, आपले मन आणि आपल्या बुद्धीशींच राहाणार. यांच्या व्यतिरिक्त आणखी कोणत्याही वस्तूची गरज नाहीं. आता तुमचा आपल्या स्वतःशींच सामना आहे.

मी पूर्वींच सांगितले आहे की तपांत आपल्या स्वतःवर नियंत्रण करावयाचे आहे किंवा प्रतिबंध टाकावयाचें आहेत, ज्याकरितां

शारीरिक आणि मानसिक ताण देणें आवश्यक आहे. परंतु ही सांगितलेले ताण कष्टाऐवजीं आनंद देतात. तपास आत्म–दंड किंवा आत्म–निषेधही म्हटलें जाऊं शकतें. फक्त इतकेंच लक्षांत ठेवा की हा दंड आणि निषेधदेखील आत्म–निमंत्रित (स्वत:च ठरवलेला) असतो. कोणाकडून तुमच्यावर लादलेला किंवा परिस्थितीवशात् नसतो. कोणाच्या आज्ञेने किंवा आणखी कोणत्याही निमित्ताने हा दंड किंवा निषेध नसला पाहिजे. फक्त सुखी होण्याची इच्छाच एकमात्र कारण असावी. तप चालू असतांना त्यास बरोबर निभविण्याचा तुमचा स्वतंत्र, पक्का आणि दृढ निश्चय पाहिजे. तप करण्यांत अभ्यस्त झाल्यावर इतरांशी आपली प्रगति गुप्त ठेवून राखण्याच्या शक्तिची जरूर आहे. हे फक्त यासाठींच की तपानें तुम्हांस पूर्णत: नव्या, अज्ञात व अकल्पित गोष्टींचा खुलासा होतो. यांचा आनंद तुम्हीं तेव्हांच घेऊं शकाल जेव्हा इतरांशी यांना गुप्त ठेवाल. जर तुम्हीं वाचालतेने या गोष्टींना वाटेल त्यास सांगत फिराल तर तुमची प्रगति थांबेल आणि जे कांही तुम्ही तपामुळे मिळविले असेल त्यास पण गमावून बसाल.

म्हणून तपांत कोणतेही प्रदर्शन किंवा लबाडी नको. असंगत किंवा मनमौजी आचरण नको. असाधारणता किंवा अभद्रता नको. असा कोणताही व्यवहार करूं नये. अन्यथा ते तप नसून पाखंड होईल. म्हणून सावधान असा. हे पण समजून घ्या की घृणा, निराशा, किंवा क्रोधवशात् तपाची सुरुवात न होवो, असें तप तर तप नव्हे. कारण की तप तर सावकाशपणें, स्थिर आणि क्रमबद्धतेनें चालू ठेवावयाचें असतें. तपाबद्दल कांही पण अनियमित नको. नाहीं तर, योग्य प्रकारें तप करीत असणें जड जाईल. तपाचें आचरण नित्य व्हावें, नियमित व्हावें. यांत अपवाद आहे, एकादे दिवशी वास्तविक अशक्यतेचाच.

तर तपाच्या आचरणांत ज्या ज्या आवश्यकता आहेत त्या, तुमची स्वत:ची इच्छा व खुषी, दृढनिश्चय, व्यवस्थित प्रयत्न, सावकाश स्थिर आणि क्रमबद्ध गति व नित्यनियमितता या होय. ज्या गोष्टीची कांही गरज नाहीं, त्या आहेत लबाडी, देखावा, प्रदर्शन, बडबड आणि अस्थिर मन. हे चांगल्या प्रकारे ध्यानांत ठेवा.

याप्रमाणें ज्या ज्या वस्तु किंवा संवयीत तुम्ही गुरफटलेले होतां, त्यांच्या प्रति तपाने हळू आणि स्थिर अनासक्ति होऊं लागते. जे जे तुम्हीं करीत होता किंवा क ीत आहांत, त्यास हळूहळू सोडावयाचे आहे. हळूहळू आपल्या स्वतःस आपल्या स्वतःमध्यें केन्द्रीभूत करावयाचें आहे. याचे कांही दृष्टांत देणें सोपें नव्हे. फक्त यासाठीं की, जे एकास तप होऊं शकतें, तें दुसऱ्यास तप नसू शकेल. म्हणूनच तप एक व्यक्तिगत कार्य आहे. तें दर माणसास वेगवेगळ्या प्रकारचें असतें. साधारण तऱ्हेने मी जें कांही समजावून सांगू शकतो तें हेंच की जर तुम्ही वैभवयुक्त, विलासी जीवन जगत असाल, तर हळूहळू त्या विलास सामग्रीचा उपयोग कमी करत जावे ज्याची शरीरास संवय पडलेली आहे आणि मग त्या वस्तूंचा त्याग करावा. जर तुमचे शरीर आरामदायक वस्तूंचे अभ्यस्त झालेले असेल तर, हळूहळू त्यांना कमी करत जावें आणि फक्त जरूरी वस्तूच शरीरास द्याव्यात. आणि जर तुम्हांस फक्त जरूरी वस्तूच प्राप्त आहेत, तर त्यांसही इतके कमी करा की जितके शरीरास जिवंत ठेवण्यास पुरे आहेत. जर कमीत कमी जरूरी वस्तूच शरीरास मिळत आहेत जसे अन्न, वस्त्र व आश्रय, आणखी कांही नाहीं, तरी पण खाण्याच्या जिन्नसांत आणि वस्त्रांच्या जोडांत कमतरता आणा. हेंच कारण आहे की सार्वजनिक दृष्टांत दिले जाऊं शकत नाहींत, कारण की कोणीही दोन मनुष्यें, मग त्यांची मिळकत एकसारखी कां न असो, तरी त्यांची रुचि आणि संवयी एक सारख्या नसतात. हें लक्षांत ठेवा की ही सर्व कमतरता करणें वा सोडणें वा त्यांचा त्याग हळूहळू, एक एक करून करा. हे कायदेशीरपणानेंच व्हावयास पाहिजे. एकदम पुष्कळशा गोष्टी किंवा संवयी नका सोडू. त्यामुळे तुम्ही पूर्णतः विफल व्हाल.

वर सांगितलेल्या वस्तूंचे हे महत्व लक्षांत ठेवा की हे सर्व त्याग किंवा राहणीस साधें करणे किंवा शारीरिक ताण, तुम्ही फक्त आपल्या स्वतःकरितां करीत आहांत. जर तुम्ही विलासी वस्तूंचा त्याग करतां तर त्याचा अर्थ हा नव्हे की तुमच्या परिवारातील सदस्यांनी पण त्या वस्तूंचा त्याग केला पाहिजे, असे नाहीच.

घराचे वातावरण तर जसेचें तसेंच कायम असलेलें पाहिजे की जसें कांहीं तुम्हीं स्वतःदेखील कांहींच त्यागले नसेल. अर्थात् तुम्हांस तर त्याच विलासी वातावरणांत राहावयाचें आहे, पण आपल्या शरीरास विलास भोगू द्यावयाचे नाहीं. याबरोबरच, तुम्हांस आपल्या बायका-मुलांसही हे सांगावयाचें नाहीं की त्यांनी पण तुमच्या या नव्या पद्धतिनें जगावें, नाहीं. तुम्हांस तर अशी अपेक्षा देखील करावयाची नसते. आपली स्वतंत्र इच्छा नसतांना, नुसते तुमच्या आज्ञेमुळें जर तुमची स्त्री–मुलें कांही त्याग करतील, तर ते त्यांजकरिता तप होणार नाहीं. त्याचा अर्थ हाच दिसेल की आतां तुम्ही कंजूस बनत चालले आहांत. सर्व कांहीं जसेच्या तसे टिकलेलें असलें पाहिजे. फक्त तुम्हींच आता पूर्व–जीवन जगत नाहीं. त्या बरोबरच, तुम्हांस हे माहीत आहे की जेव्हां तुम्ही इच्छा कराल, तेव्हा त्या विलास सामग्रीचा उपयोग करूंच शकाल की ज्यांची तुम्हांला पूर्वीं संवय होती. परंतु योग्य काळानंतर तुम्हीं अशी कोण-चीच इच्छा करणार नाहीं, त्याचप्रमाणे की जसे एक दास, दासतेंतून मुक्त झाल्यावर पुन्हां दास बनण्याची इच्छा क ीत नसतो. याच सर्व गोष्टी त्या लोकांनाही लागू आहेत जे आरामदायक किंवा जरूरी वस्तूंचाही त्याग किंवा त्यांत कमतरता करतात. शारीरिक ताणाची प्रत्येक कृति शरीराच्या दासतेंतून मुक्ति होय. जरी सुरुवातीस त्याला ताण म्हणतात, तरी दासतेंतून मुक्ति झाल्यानें त्या ताणाचे आनंदांत रुपांतर होतें. शरीरावर तपामुळें प्राप्त नियंत्रण, परमा-त्म्यास हे दाखवून देतें की जरी तुम्हीं आपल्या शरीरास पुष्कळशा गरजांच्या गुंतवणीत फसवून ठेवलें होतें, तरी पण आता त्यास सुखाचा आनंद उचलावयास मुक्त करून घेतलें आहे. परमात्म्यास जेव्हांही वाटेल, तेव्हां त्याने तुम्हास सुख प्रदान करावें.

वाईट संवयी, दुर्गुण, सामाजिक अनिष्ठ, किंवा अपराधवृत्तिचा त्याग तप नव्हे. परंतु अशा त्यागास तपाचा पाया टाकणें म्हटलें जाऊं शकेल कीं ज्यामुळे नंतर तप सुरूं करतां यावें.

शारीरिक ताणांच्या व्यतिरिक्त, तपात मानसिक ताणही द्यावयाचा असतो. प्रत्येक माणसाचे मन भटकत असतें. ते इकडे, तिकडे आणि सगळी कडेच धांव घेत असते आणि त्याची गति इतर कोणत्याही वस्तुपेक्षा तीव्र असते. मनाचे हे भटकणें धांवणे आयुष्यभर दर सेकंदास, दर मिनिटास, दररोज चालूंच असतें. मनाच्या या संवयीस तर सुधारावयासच हवें आणि हें काम मनावर ताण टाकल्यानेंच होऊं शकतें. योग्य काळानंतर, हाच ताण तुमचा अनमोल खजिना बनेल, ज्याला कोणत्याही मूल्यावर वा कोणत्याही कारणानें सोडावयास तुम्हीं तयार होणार नाहीं.

मानसिक ताण एकाग्रतेने दिला जातो. प्रयत्न करून, आणि प्रयत्नांस चालूच ठेवून, मनास त्याच्या भटकणाऱ्या जागेंतून परत आणून एका विशिष्ट बिन्दु किंवा विशिष्ट विचारांत केन्द्रित होण्यास सांगायचे आहे. हे सोपं नव्हे, मुळींच सोपें नाहीं. परंतु त्या व्यक्तिस तेवढें जडही नाही जो तपाकरितां सिद्ध होतो. त्यास हळू हळू प्रगति दिसू लागेल. मनाच्या संवयीत चांगल्या सुधारणा होतील. पुढें गेल्यावर अधिकच चांगल्या सुधारणा होतील. एका पगारी नोकराप्रमाणें मन तुमच्या आज्ञा शिरोधार्य मानून त्यांचे पालन करील. तेव्हा हे आदर्श तप होईल. ज्याचा अर्थ हाच की जेव्हां तुम्हास सुखप्राप्ति होईल, तेव्हां त्याच्या आनंदाच्या उपभोगासाठीं तुमचे मन योग्य झालें आहे.

मानसिक एकाग्रतेसाठीं कांही ठराविक नियम नाहींत. काय करावयाचे आहे ते तर मी तुम्हांस सांगितलेंच आहे. तुमच्या व्यस्त, अतिशय व्यस्त समयांतून, एक निष्चित वेळ, फक्त कांही मिनिटच, मनाच्या या व्यायामाकरितां काढा. लक्षांत ठेवा की, एक ठराविक वेळ पाहिजे. मग ती वेळ सूर्योदय आणि सूर्यास्ताची असो किंवा मध्यान्ह व मध्यरात्रीची. जो वेळ तुम्हास अनुकूल असेल, ठीक आहे, अट हीच कीं रोजच त्या वेळेला तुम्हीं या अभ्यासाकरिता देऊं

शकाल. कोण्यादिवशी कांही विशेषच कारणामुळें अशक्य झाले, तर इलाज नाहीं. मग त्या वेळेस तुम्हीं उभे राहा किंवा बसा, पण एकच तऱ्हा असली पाहिजे. तुम्हीं डोळे बंद ठेवा किंवा उघडे, पण जसे ठरवाल तसेंच रोज व्हावें. आपल्याच घरांत या अभ्यासाकरिता एक जागा निश्चित करा. ती शुद्ध आणि स्वच्छ पाहिजे. प्रवासांत नसाल तर त्याच जागीं रोज अभ्यास करावा. घरांतील इतर लोकांस बाहेर करून, खोलीची दारें बंद करण्याची गरज नाही. याच्याने एकाग्रतेत कांही विशेष साहाय्य होत नाहीं. सुरुवातीस लोकांचे चालणें बोलणें तुमच्या अभ्यासांत व्यत्यय आणीत असल्याचें भासेल, पण तुम्ही आणि तुमचें मन दोघास या गोष्टीची संवय पडेल आणि या सर्व व्यत्ययास न जुमानतां एकाग्रता होऊ शकेल. नाही तरी तुम्ही तर हे तप सुखाच्या प्राप्तीकरतां करीत आहात, आणि सुखी मनुष्य आपल्या स्वतःस संसाराहून वेगळे करीत नाही. त्यास तर संसारांत राहूनच सुखाचा आनंद लुटायचा आहे.

मानसिक ताण देते वेळीं जर तुम्हीं आपले डोळे उघडे ठेवाल तर समोरच्या भिंतीवर एक बिंदु, चित्र, प्रतिमा किंवा मूर्तिवर दृष्टी रोखून मनास तेथेंच केंद्रित करण्यास सांगा. जर तुम्हीं डोळे बंद ठेवण्याचें ठरवाल तर परमात्म्याबद्दल विचार करण्यांत आपल्या मनास एकाग्र केलें पाहिजे. या गोष्टींचा निर्णय तुम्हीं स्वतःच घेऊं शकता. माझे तर हे फक्त सल्ले आहेत.

इतके तर तुम्ही आतापर्यंत समजलांच असाल कीं तपांत जो आणि जसा मानसिक ताण देणें आहे तो तेव्हांच शक्य आहे जेव्हां तुम्हीं अगदी एकच तऱ्हा ठेवाल, अर्थात एकाच जागेवर, एकाच वेळे-वर एकाच मुद्रेत एकच विचार, एकच प्रकार अगदीं कठोर प्रकारानें या अभ्यासांत एकच तऱ्हेनें चिकटून जावयाचे आहे. कारण कीं तुम्ही स्वतःच या सर्व गोष्टींचा स्वतंत्र निर्णय केलेला असतो. इतरांच्या मतानें किंवा सल्ल्यानें या प्रकारांत कांही बदल करावयाचाच नाहीं. तुम्हांस चांगले परिणाम दिसतील. या बाबतीत सर्वच अडचणींवर

तुम्हांस विजय मिळेल. मी तुम्हांस सांगून ठेवतो कीं हा विजय आश्चर्यानें भरपूर आणि विलक्षण परिणामास प्राप्त करवून देणारा असणार.

परंतु शारीरिक तप किंवा ताणावर लिहितांना जी आगाऊ सूचना मी तुम्हांस दिली होती, ती लक्षांत ठेवा. मानसिक ताणामुळें ज्या परिणामांची प्राप्ति होईल त्याबद्दल बोलू नका. तुम्हीं त्याविषयी मौनी असावें. फक्त स्वतःस त्यांचा आनंद घ्या. वाटल्यास एक खाजगी दैनंदिनी ठेवा आणि तींत विशेष अनुभवांची नोंद करीत जा म्हणजे स्मृति राहील. किंवा आपले सर्व अनुभव विस्तारानें एक अशा व्यक्तीस सांगू शकाल ज्यांच्याबद्दल मी पुढील अध्यायांत लिहीन.

मला खेद वाटतो कीं मी तुम्हांस तपासंबंधी कोणतेही सार्वजनिक उदाहरण देऊं शकलो नाहीं. कारण, फक्त दोन माणसांसही एक सारखें लागू होऊं शकेल असें एक देखील उदाहरण मिळत नाहीं. म्हणून मी जर कांहीं दृष्टांत देण्याचा प्रयत्न करीनच तर ही भीति आहे की, कोणी वाचक चुकीचा मार्ग स्वीकारतील. पण मला खात्री आहे कीं मी यथाशक्ति प्रयत्न करून हे समजावून दिलें आहे की तप काय आहे-आणि मी आशा करतो कीं तुम्हांस ते समजलें आहे. जर असे आहे तर, तुम्हांला फक्त त्याची सुरुवातच करणें आहे. नाहीं तरी ते तितकें अवघड तर नाहींच जितके सर्वसाधारणपणें समजलें जातें. इतरांच्या केवळ कोरड्या गप्पा ऐकूनच किंवा चुकीचा अर्थ प्रचलित असल्यानें तप करणें अवघड मानले जाते. कोणीही माणूस आयुष्याची कोणतीही वाटचाल करीत असतांना, कोणत्याही वयांत तपाचे आचरण सुरू करूं शकतो.

. तपामुळें तुम्हांला त्या सुखाचें ओझरते दर्शन होऊं लागते ज्याच्या शोधांत तुम्ही आहांत व ज्याच्या आनंदाच्या उपभोगासाठीं तुम्ही आपल्या शरीर व मनास मुक्त केलेले असते. मी तर म्हणेन कीं ही एक खरी, उत्तम आणि महत्वपूर्ण प्राप्ती झालेली आहे. आतां वाटेल त्याच्याशी चर्चा करून किंवा विलक्षण व्यवहारानें

किंवा स्वत:स इतरांपेक्षा श्रेष्ठ मानून, किंवा ज्ञानी असल्याचे ढोंग करून, किंवा असे कोणतेही कार्य करून जे परमात्म्यास आवडणार नाही, आपल्या या प्राप्तीस गमावून बसूं नका. मी ही आगाऊ सूचना पुन: पुन: देण्यास अशाने स्वत:ला याकरितांच कर्तव्यबद्ध समजतो की सुखाच्या शोधांत तुमची प्रगति न थांबता माझ्या आगाऊ सूचनेंच्या कारणाविषयीं इतकेंच जाणून घेणें पुरे आहे.

मला वाटते की माझ्या पुन: पुन: दिलेल्या आगाऊ सूचनेच्या कारणांस अधिक स्पष्ट करावें. तपामुळें तुम्ही शरीर आणि मनास इतके योग्य करून घेतां की जेव्हांही सुख मिळेल तेव्हां त्याच्या आनंदाचा उपयोग करतां येवो. म्हणून जसें जसें तपांत तुमची प्रगति होत जाते, तसें तसें परमात्म्याच्या कृपेने कांहीं शक्ति तुम्हांस दिली जाते. किंवा असेही म्हणा कीं कांहीं शक्ति ज्या तुमच्या स्वत:च्याच आहेत, आणि तुमच्यातच आहेत. पण ज्यांच्याविषयीं तुम्ही अज्ञानी होता. त्यांचे आतां तुम्हांस आकलन होते. ही शक्ति चमत्कारिक तऱ्हेची असते. जितक्या तीव्रतेनें तुमचे तप आचरण होईल तितक्याच गतीनें ही शक्ति प्रकट होते. तुमची वचनें, तुमची कृती, किंवा उपस्थितिनें कांही चमत्कार होत असतांना आढळून येतात. यांना पुन्हां पुन्हां पडताळल्यानें तुम्हांस हें कळतें की हें सर्व सामर्थ्य तुमचें स्वत:चेच आहे. हें ज्ञान फारच लोभ उत्पन्न करणारे असतें. लोभ हाच कीं लोकांस हें दाखवून द्यावें की तुमच्यांत कांहीं अकल्पित किंवा चमत्कारिक घटना करून दाखविण्याची शक्ति आहे. जर तुम्ही या लोभास बळी पडलांत तर ही शंका तर नाहींच की तुम्ही इतरांसाठीं चमत्कार करून दाखवू शकाल. याप्रमाणें धन, मान, व पूज्यताही त्या लोकांपासून मिळेल ज्यांच्यावर तुम्हीं उपकार करतां परंतु त्याबरोबरच या मार्गात तुमची प्रगती थांबेल आणि जीवनभरासाठीं सुखाची दारें तुम्हांकरितां बंद होतील. तुमचे सामर्थ्य तुमच्या जवळच राहील. परंतु अज्ञ आणि संकटग्रस्त लोकांत तुमची प्रसिद्धि झाल्यामुळें या सामर्थ्यांस एकसारखे खर्चावें लागेल. त्यामुळें लौकर किंवा उशीरा या शक्ति क्षीण पडून नष्ट होतील. तुम्ही पुन्हां तित-

केच सामान्य माणूस व्हाल जितकें कीं ते लोक ज्यांना तुम्ही आपल्या चमत्कारिक शक्तिनीं लाभ पोहोंचवीत होतां. हे सामर्थ्य आतां पुन्हां तुम्हांस परत मिळवितां येणार नाही. आणि याची क्षति-पूर्तिही नाहींच होऊं शकणार. अशा प्रकारे तुमचें तप भंग झाल्यावर त्यास पुन्हां सुरूं करतां येणार नाही. तप नेहमी वाटेल त्या क्षणी सुरू करतां येतें. आणि त्याचे परिणामही प्राप्त करतां येतात. पण तप दुसऱ्यांदा पुन्हां चालू करतां येत नाहीं.

आपल्या शक्तिच्या प्रदर्शनाच्या लोभास बळी न पडणें उच्च कोटीचे तप आहे आणि याच्यानें परमात्म्याच्या इच्छेप्रमाणें तुम्हांस सुख प्राप्त होईल. सुख प्राप्त झाल्यावर तर लोभावरही नियंत्रण होईलच. सुखी माणसाजवळ शक्तिचा भरपूर कोठा असतो. जरी तो यांचे प्रदर्शन करीत नाहीं तरी पण जर तो याचा उपयोग करण्याचे ठरवील, तर त्याच्या शक्ति कधीही नष्ट होत नसतात. हेहि पुस्तक तुम्हांस सुखाच्या शोधांत नेणार असल्यामुळें माझी ही इच्छा नाही कीं याच अवस्थेत त्या शोधाची समाप्ती होवो, आणि म्हणूनच पुन्हां पुन्हां सावधान केलें आहे. आपलें स्वत:चें ज्ञान गुप्त ठेवा. त्यास पदर्शित करूं नका. हे स्वयं एक कार्य आहे. हे स्वयं एक तप आहे.

तपाच्या आचरणानें तुम्ही आपल्या सांसारिक कर्तव्य व जबाबदाऱ्या निभविण्यास समर्थ व्हाल. तुम्ही स्त्री, मुलें व आश्रितांचे निर्वाह सहजच करू शकाल. आत्तापर्यंत लिहिलेल्या गोष्टींवरून इतकी खात्री तर झालीच पाहिजे. आपल्या स्वत:चे प्रदर्शन न करतां देखील, तुम्ही कित्येक लोकांस उपयोगी होत आहांत. पण ही खात्री झाली पाहिजे कीं तपाकरितां संन्यास घेण्याची मुळींही आवश्यकता नाही. ही गोष्ट वेगळीच आहे की, जीवनापासून निराश किंवा संतुष्ट होऊन तुम्हीं संन्यास घ्याल. पण तपाच्या आचरणासाठीं संन्यास घेण्यांत कांहींच अर्थ नाहीं. संसारांत, संसारीच राहूनच तपाचे आचरण केलें जाऊं शकते आणि तें लौकरच परिणामकारक असतें. असें नसेल तर त्याचे आचरण ब्रह्मांडांतील सर्वच मनुष्यास कसें शक्य

आहे ? सत्य सनातन धर्मांचे जे जे साधनमार्ग आहेत ते विश्वव्यापी आचरणास उपयुक्त असेच पाहिजेत. तेव्हांच तर या नावांची सार्थकता आहे.

कर्म

सुखाचा चौथा साधन-मार्ग. तपाप्रमाणेच कर्मही तुमच्या स्वतः-करितांच आहे. परंतु भिन्नता इतकीच आहे. कीं कर्माविषयीं सर्व कांहीं बोलतां येतें. दुसऱ्यांना सांगितलें जाऊ शकतें कीं त्यांनीं कर्माचे आचरण करावें आणि त्याचा फायदा घ्यावा.

संसारांत मनुष्य, या नात्यानें तुमचा जो दैनंदिन नित्यक्रम आहे त्याच्याशीं कर्माचा संबंध आहे. तुम्हांस काय केलें पाहिजे आणि काय केलें न पाहिजे या सर्वांचे वर्णन कर्मांत आहे. कर्मांच्या नैष्ठिक आचरणानें तुम्हीं परमात्म्यास हें सांगण्याच्या स्थितींत येतां कि तुम्ही त्याच्या आदेशांच्या पालनासाठीं अनन्य शरण आहांत. तुमची आज्ञा-धारकता परमात्मा जाणून घेतो, कोणत्याही परिणामाची पर्वा न करिता, परमात्म्याच्या आदेशांचे पूर्णरुपानें पालन करणें, सुखाकरितां एक महत्वपूर्ण योग्यता आहे.

मी फक्त कांही निवडक कर्मांचे विवरण देत आहे. त्यामुळें तुम्हास या आणि इतर कर्मांच्या महत्वाची कल्पना येईल.

सत्य

सत्य बोला. सत्यतापूर्वक वागा. असत्याजवळ फिरकूही नका. जर तुम्हीं सत्याचे उपासक आहांत तर परमात्म्याच्या आणि सुखाच्या फारच जवळ आहांत. वाटेल त्या क्षेत्रांत तुमचा संचार असो,

फक्त सत्य बोलण्याचीच संवय ठेवा. जर तुम्ही नुसते कधी काळीं किंवा आपला हेतू साधण्याकरितां खोटें बोलत असाल तर तें कमी करीत करीत एकदमच सोडून द्या. जर तुम्हीं प्रतिज्ञा कराल कि प्रत्येक परिस्थितींत, प्रत्येक जागीं, सत्याखेरीज कांहीं नाहीं आणि फक्त सत्यच बोलावयाचे आणि या प्रतिज्ञेप्रमाणें खरें बोलाल तर तुम्हांस हें प्रत्ययास येईल की चमत्कारिक तऱ्हेनें तुमच्या नैतिक सामर्थ्य व चारित्र्य बलांत दररोज, प्रत्येक मिनिटांस वृद्धि होत आहे. कोणतीही गोष्ट तुम्हास भेडसावूं शकणार नाहीं. प्रयत्न न करिता, तुम्हांला लोकांत आदर प्राप्त होईल. सत्य, केवल सत्य हेंच ध्येय असलें पाहिजे. या ध्येयापासून कोणत्याही परिस्थितींत विचलित होऊं नका. याच्यांत कांहीही अपवाद नकोत आणि कांही सबबी पण नकोत. तेव्हांच चमत्कार घडतात. तेव्हांच नैतिक सामर्थ्याचा अनुभव येतो. हें सामर्थ्य तुमच्यांत आहे असें वाटूं लागते. जणूं एक शक्तिमान अस्त्र तुमच्याजवळ आहे, ज्याच्यामुळे सर्व सांसारिक अनिष्ट दूर पळविले जाऊं शकतात. सत्याने आनंद मिळतो. सत्य हें वाचेचें तप आहे.

जर तुम्ही वयस्कर आहांत, प्रौढ आहांत किंवा वृद्ध आहांत. आणि अनेक वर्षांपासून विनाकारण किंवा स्वार्थ साधण्यासाठीं, नेहमी खोटें बोलत असाल तरी सत्याच्या दिव्य प्रासादांत प्रवेश करण्यांत तुमच्यावर कांहींच प्रतिबंध नाहीं. फक्त एका क्षणांत होणारा दृढ निश्चय तुम्हांस सत्याचा अनुयायी बनवून देतो. अनेक वर्षांपासून खोटें बोलत असण्याच्या संवयीमुळे, तुम्ही यदाकदाचित सत्यापासून विचलित व्हाल, पण कांही हरकत नाहीं. लौकरच किंवा उशीरा तुमचा दृढ निश्चय तुम्हांस सत्य आणि त्याने प्राप्त होणाऱ्या आनंदाकडे घेऊन जाईल.

तुमचे वय आणि संवयी यामुळें असत्याच्या तावडींतून सुटका करणें जड भासतें. अनिष्टाची पकड अशीच असते. असत्याचा त्याग करण्यांत आपल्या अडचणींच्या अनुभवापासून कांही बोध घ्या आणि

आपल्या मुलास सत्य, सत्याविना कांही नाहीं. असें बोलण्याचा धडा शिकवा. त्यांच्याविषयीं दयावान रहा, ज्याच्यानें दंड मिळण्याच्या भीतीमुळें ते असत्याचा आश्रय न घेवोत. मुलांस सत्य बोलण्यास शिकविण्याकरितां हें जरूरी आहेच कीं तुम्हीं, माता किंवा पिता जे त्यांच्यासाठी आदर्श आहांत, पहिले स्वतः सत्य बोलण्याचा अभ्यास करा. स्पष्ट सत्य. सत्यच बोला. मी आधींच सांगून ठेवलें आहे कीं फक्त सत्य बोलण्याची संवय स्वतः एक शक्ति आहे जिच्यामुळें तुम्हीं इतरांहून अधिक शक्तिमान आहांत असा अनुभव घ्याल.

जेव्हां सत्यच बोलण्याची संवय करून घेण्यांत तुम्हीं यशस्वी व्हाल आणि तुम्हालाही खात्री होईल की आयुष्यांतील कोणत्याही क्षणीं जें कांहीं तुम्हीं बोलाल तें सत्यच असणार आणि सत्याशिवाय तुम्ही कांहीच बोलत नाहीं, तेव्हां पुढचे पाऊल असत्यापासून दूरच असण्याचें आहे. आपल्या वाणींतून असत्यास दूर केल्यानंतर, असत्या-पासून दूर होणे अवघड जाणार नाहीं, जरी ते तेवढें सोपेंही नव्हे, असत्यापासून दूर होण्याचा माझा आशय हाच आहे की त्या जागा. वस्तू व लोकांपासून लांबच असावें, जेथे असत्याचा धूर आहें. जर तुम्हास पुस्तकें वाचण्याचा नाद आहे, तर कादंबऱ्यांपासून लांबच असा की ज्यांच्यांत सुरुवातीपासून शेवटपर्यंत कल्पित अर्थात् असत्य गोष्टीच असतात. वांचावयास कित्येक अन्य आणि उत्तम पुस्तके आहेत. तुम्हांस चित्रपटगृहापासूनही दूर रहावयाचे आहे कारण की तेथें कथा कादंबऱ्यांवर आधारित, असल्याने पुरेपूर, फिलमस्चेच प्रदर्शन होतें. मनोरंजनाकरितां आणखीही इतर व चांगलीं साधनें आहेत. अशा-प्रकारें, असत्यापासून हळूहळू दूर होणें सुरू केलें पाहिजे आणि झालें पाहिजे.

जेव्हां हें करून घ्याल तेव्हां असत्य ऐकण्यास नकार देण्याचा अभ्यास करावा. अशा व्यक्ति किंवा व्यक्तींशी बोलू नये ज्यांच्या-बिषयी तुम्हास माहीत आहे की ते खोटे बोलण्याचे अभ्यस्त आहेत. याप्रमाणें त्यांच्या गोष्टींस आपल्या कानांवर पडूं देऊं नये.

थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे आपल्या डोळ्यानें सत्य पाहिले, पाहिजे, कानानें सत्य ऐकलें पाहिजे, वाचेनें सत्य बोलले पाहिजे. नासिकेनें सत्य हुंगले पाहिजे, शरीरानें सत्यमय असलें पाहिजे. हें आहे सत्य, केवळ सत्य आणि हे तर मुळींच अवघड नाहीं. जर तुम्ही हे करूं शकाल तर मी तुम्हास वचन देतो कि तुमच्यांत शांति, आनंद आणि आंतरिक सामर्थ्याची वृद्धी होईल. लोकांत तुमच्याविषयीं पूज्यभाव निर्माण होईल.

सत्याचे पूर्णपणें आचरण केल्यानें सुखाच्या शोधांत तुम्हीं पुढे निघून गेलेले असणार. परमात्मा स्वतः सत्य आहे. तो सत्य प्रिय आहे आणि सत्याचे आचरण करणारे पण त्यास प्रिय आहेत. सत्याचा नैष्ठिक पुजारी, परमात्म्याचा कृपा–पात्र बनतो. काय याहूनही अधिक कोणता आनंद असू शकतो ?

अहिंसा

अहिंसेचे आचरण करा. प्रत्याघात करूं नये. थप्पडाच्या उत्तरा-दाखल थप्पड मारूं नका. दुसऱ्या गालावर दुसरी थप्पड घेण्याची आपली तयारी दाखवा. आघात होणें बंद पडेल. आणि नेहमींसाठी कोणताही गैरसमज शिल्लक उरणार नाहीं. जर कोणी बलपूर्वक तुम्हांस एक फर्लांगपर्यंत ओढीत नेतें तर एक मैलापर्यंत तसें जाण्याची आपली तयारी दाखवा. पराजय त्याचा होईल, तुमचा नाहीं. अहिं-सेचे आचरण करणाऱ्यांना विजय मिळत असतो. हा विजय आनंदाने भुरेपूर असतो. हें तर अनुभवच सांगू शकेल. याचें वर्णन होऊं शकत नाहीं. अनिष्टास दंडित करण्यासाठी कायदा आपल्या हातीं घेऊं नका. दंड देण्याचे कार्य परमात्म्यावर सोडा, जो सर्व कांही पाहात आणि जाणीत आहे. तो सर्व कांही पाहातो आणि जाणतो म्हणूनच तर मानवजातीने अहिंसेचे आचरण केले पाहिजे.

अहिंसेनें तुमच्यांत दयाभाव उदित होतो. फक्त दुसऱ्यांच्या शरीरावर आघात न करणें म्हणजेच पूर्ण अहिंसा नव्हे. तुमच्या वाईट व्यवहारानें कोणाची भावना दुखवली न पाहिजे. कठोर आणि कटु वचनांने कोणाचें हृदय दुखविलें न पाहिजे. अहिंसेच्या आचरणानें तुम्हास दयाळू, कृपाळू व करुणामय बनलेच पाहिजे, म्हणजे कोणासही तुमच्यापासून भय न राहो. ही अहिंसा होय.

ज्याप्रमाणें सत्य तुमचें चारित्र्यबल वाढविते त्याचप्रमाणें अहिंसेने तुमचे हृदय पवित्र होते

ब्रह्मचर्य

आपल्या विषय-भोगाच्या वासनेवर नियंत्रण, हेच स्वास्थ्यप्रद जीवनाचे गुपित आहे. ब्रह्मचर्य कोणच्या विशेष वयोमानाच्याच लोकांनी आचरण करावें, अशांतला भाग नव्हे. याचे आचरण तर सगळ्या मानव-जातीने, प्रत्येकच माणसाने केलें पाहिजे. नैतिक पतन, दुराचरण, चारित्र्य-ऱ्हास व बलहीनतेची औषधि ब्रह्मचर्यच ोय. याचा अर्थ हा नसतो की तुम्हीं विवाहच करूं नये किंवा विवाहित असाल तर संतानोत्पत्ति करूं नये. असें कांही नाही. वेदांनेच या कर्माचा उपदेश दिला आहे. तेव्हां ते तर असा कोणताच उपदेश देणार नाहीं जो शास्त्रीय प्रकाराने न्यायोचित आणि स्वीकृत नसेल.

ब्रह्मचर्याचें आचरण निसर्गतःच तुम्हांस स्वास्थ्य प्रदान करते. विवाहापूर्वी तारुण्यांत याचे नैष्ठिक आचरण करणारे स्त्री व पुरुष, प्रबल व निरोगी बनतात. ज्यास विवाह करावयाचा आहे त्याची प्रथम आणि आदर्श योग्यता आहे बलवान आणि निरोगी असणें. फक्त ब्रह्मचर्यानेंच ही योग्यता मिळविली जाऊं शकते. सशक्त आणि रोगरहित दांपत्य निसर्गतःच सशक्त आणि निरोगी संततिची उत्पत्ति करतील. आपोआप बालमृत्यूचे प्रमाण नियंत्रित राहील.

विवाहोत्तर पण ब्रह्मचर्याचे आचरण पहिल्या सारखेच दृढतेनें केलें गेलें पाहिजे. यांत अपवाद तेव्हांच होईल जेव्हां दांपत्याची इच्छा संतानोत्पत्तिची असेल. याखेरीज आणखी कोणत्याही कारणानें ब्रह्मचर्याच्या आचरणांत खंड पडूं नये. कोणतेही दांपत्य तितक्याच संततीची कामना करणार, जितक्यांचा निर्वाह करूं शकण्याची त्यांची क्षमता असेल. आपोआप जन्म–संख्येवर नियंत्रण होईल.

ब्रह्मचर्याच्या आचरणाचा हाच अर्थ आहे. याने तुम्हास शारीरिक स्वास्थ्याचा फायदा होतो आणि शरीर व चेहऱ्यावर तेज आढळून येते. प्रत्येक माणसाची इच्छा असते की त्याने शक्तिमान व्हावे आणि त्याच्या शरीर व चेहऱ्यावर तेज असावे. परंतु हें विसरून की ब्रह्मचर्याच्या आचरणानें या दोन्हींही गोष्टी परमात्म्याकडून त्यास (माणसास) विनामूल्य मिळालेल्या आहेत, तो शक्तिमान होण्याकरिता पेटंट औषधिचे सेवन करितो आणि तेजाकरिता सौन्दर्य–प्रसाधनें चेहरा आणि शरीरावर चोळीत असतो. परंतु या औषधि आणि हें प्रसाधन अल्पजीवी असल्याने निरर्थक आहेत. मी पूर्वीच सांगितले आहे की हें मानव–शरीर स्वयंपूर्ण आहे आणि यास सक्षम ठेवण्याकरितां कोणत्याही बाहेरील वस्तूंच्या मदतीची जरूर नाहीं. हें शरीर तर परमात्म्याची स्वाभिमानपूर्ण उत्पत्ति आहे.

आपल्या पति किंवा पत्नीखेरीज इतर कोणाच्या प्रतिही आपल्या आकर्षणाचे उन्मूलन करणें, हेंच आदर्श आहे. इतरांकडे आकर्षित होण्याची इच्छासुद्धां तुम्हास ब्रह्मचर्यापासून दूर नेते. त्याच्या नैष्ठिक आचरणानेंच शारीरिक स्वास्थ्य आणि आवश्यक सशक्ततेची प्राप्ती होते व तुम्हांसही जाणीव होऊं लागतें कि तुम्हीं शक्तिमान आहात. स्वास्थ्यविषयक कोणत्याही प्रमाणपत्राची गरज नाहीं. तुम्ही स्वास्थ्ययुक्त आहात हें तुम्ही स्वतःच, पूर्ण समाधानानें व कोणत्याही संशयाविना जाणताच.

लक्षांत ठेवा की विवाहसमयीं पुरोहित आणि नातेवाइकांच्या समक्ष पतिपत्नींने एकमेकांस दिल्या घेतलेल्या वचनांस निभवून नेण्यास

फक्त दृढ ब्रह्मचर्याचे आचरण पुरें आहे. इतर कोणताही प्रयत्न किंवा उद्योगाची आवश्यकता नाहीं. म्हणून ब्रह्मचर्याच्या आचरणांत हें आवश्यक आहे कि आपल्या पत्नीखेरीज इतर सर्व स्त्री-जातीस माता व गिनी मानून त्यांना तसाच आदर व प्रेम द्या. ब्रह्मचर्य पालनाचा हाच सोप्यांत सोपा मार्ग आहे.

अस्तेय

यांत समजावण्यास फार असे कांहीच नाहीं. पण या उपदेशांत हे अन्तर्भूत आहे की तुमच्यांत संतोष वृत्तिचा गुण असावा. जे कांही तुमचे आहे त्यांतच समाधान ठेवा. चोरी करूं नका. कठिण परिश्रम करा आणि इमानानें केलेल्या मिळकतींत, मग ती कमी असो वा जास्त, तींतच आपला निर्वाह करा. नाहीं तरी तुमची संपत्ति सुखाचें नुसतें साधनच तर आहे, सुख नव्हे. म्हणूनच दुसऱ्याचें साधन कां चोरले जावो ? तुम्हांस असा कांहीच हक्क नाहीं. दुसऱ्याच्या वस्तु चोरून हस्तगत करणें इतकाच चोरीचा अर्थ नाहीं. जर दुसऱ्याच्या वस्तूंवर तुम्ही अर्थपूर्ण चक्षूंनी पाहिले आणि तुमच्या मनांत त्या वस्तू हस्तगत करण्याची इच्छा जागृत झाली, तर, ही देखील चोरी आहे. म्हणून चोरी करूं नकाचा अर्थ आहे की दुसऱ्यांच्या लौकिक संपत्तिस प्राप्त करून घेण्याची इच्छा सुद्धा करूं नये. जे कांही तुमच्या जवळ आहे, जितके कांही तुम्हांस दिलें गेलें आहे आणि जितकें तुम्हांस दिलें जाणार आहे, तितक्यांतच संतुष्ट आणि आनंदित असा.

अपरिग्रह

याचा अर्थ आहे की कोणाकडूनही कोणतीही वस्तु मोफत घेऊं नका, कोणतीही भेट किंवा उपहार स्वीकार करूं नका, जोंपर्यंत त्या

वस्तूच्या मोबदल्यांत कोणतीही वस्तु तेव्हाच किंवा नंतर केव्हांही देण्याची तुमची क्षमता नसेल. जर कोणत्या वस्तूच्या मोबदल्यांत त्याच वेळी किंवा पुढे कधीही कांहीही देऊं शकण्यांत तुम्ही असमर्थ आहांत, तर कोणत्याही वस्तूचा स्वीकार करूं नका. कोणतीही वस्तु किंवा सेवा कोणाही कडून विनामूल्य घेऊं नका. हेच अपरिग्रह होय.

आज्ञापालन

सर्व पितांच्या पिताचा हा आदेश आहे. याने तुमच्यांत आज्ञा-पालन करण्याची संवय निर्माण होईल. परमात्म्याकडून नियुक्त बाल-काचे प्रथम संरक्षक, त्याचे मातापिता असतात. त्यांच्याच तर्फे पर-मात्मा बालकाचे संगोपन करतो. माता–पिताच सर्वप्रथम माणसें आहेत, ज्यांना बालक जन्मोपरांत पाहतो आणि ज्यांच्याजवळ तो कांही वर्षापर्यंत राहतो. म्हणून याच अवस्थेत तो आज्ञाधारक बनणें शिकूं शकतो, ज्याच्याने मोठें झाल्यावर तो परमात्म्याचे आदेश पालन करण्यास पात्र होऊं शकेल. मातृदेवो भव। पितृदेवो भव। या आदे-शांचे सर्वदा पालन करा. श्रेष्ठतेसमोर नेहमी नतमस्तक व्हा. याने तुमच्यांत आज्ञाधारकतेचा गुण वाढतो, जो तुम्हास या योग्य बनवितो की तुम्ही परमात्म्याच्या आदेशांचे पालन करूं शकाल.

संतोष

जी कांही सेवा तुम्हा प्रति अर्पित केली जाईल, तींतच समा-धान ठेवा. किंवा आपल्या दैनंदिन जीवन–क्रमांत ज्या कोणत्या परि-स्थतीस तुम्हास तोंड द्यावें लागेल, तींतही संतोष असूं द्या. गांगरून जाऊं नका.

शौच

पवित्र बना. आणि शुद्धतेनें वागा. शरीर, मन आणि आत्म्यास पवित्र बनवून ठेवण्याचें प्रत्येक प्रयत्न करीत असावे.

कर्म या विषयावर लिहीत असतां मी कर्माच्या फारच थोड्या अंगांचे विवरण केलें आहे. वेदांच्या कर्मकाण्डाचेंच हें सर्व एक लहानसें अंग आहे. हें वर्णन स्वयंपूर्ण व पर्याप्त नव्हे. कोणा एका कर्माचा काय अर्थ आहे याचा परिचय मात्र मी देऊं शकलो आहे. प्रत्येक कर्माच्या अंगाचे विस्तृत विवरण अनेक पानें व ग्रंथांत केल्यावरही तें अपूर्णच राहील. अर्थ तर इतका विस्तीर्ण व सर्वव्यापी आहे. कांही निवडक कर्मांविषयी सर्वसाधारणास परिचय व्हावा, या उद्देशानेंच मी हे थोडेसे विवरण केलें आहे.

मानवाकरितां वेदांनी दैनंदिन जीवन व्यतीत करण्यास विधि--निषेध सांगितले आहेत. काय विहित आहे याचे वर्णन केलें गेलें आहे. तें कर्म आहे. काय अविहित आहे याचेही वर्णन केलें गेलें आहे. यावरून वाचक हे अंदाज करूं शकतात की हे विधि-निषेध कित्येक असूं शकतील आणि यांतून प्रत्येकाचे वेगवेगळे विवरण किती तरी लांबले जाऊं शकतें. तरी पण विवरण करणाऱ्यास हे समाधान मिळूं शकणार नाहीं की त्याच्याकडून केले गेलेले वर्णन पूर्ण आहे. वेदांनें जे कर्म प्रतिपादित केले आहे त्यांचे प्रत्यक्ष आचरण केल्याने व जे निषेध केले आहेत ते न केल्याने तुम्ही सुखाच्या एका महत्त्वपूर्ण साधन-मार्गांवर अग्रेसर होत आहांत. यामुळें तुम्हांस सुखाच्या फारच जवळ असलें पाहिजे. इतकेंच सांगावयाचें आहे.

स्वाध्याय

तप आणि कर्माप्रमाणेंच स्वाध्यायही सुखाकडे तुमच्या व्यक्तिगत प्रगतिचा साधनमार्ग आहे. स्वाध्यायविषयक गोष्टींवर चर्चा व

वाद–विवाद पण केला जाऊं शकतो. तसें केल्यास, अशांशीच चर्चा करा जे तुमच्याहून अधिक ज्ञानी असतील. यानें स्वाध्यायांत ज्या प्रश्नांवर तुम्ही चिंतन करीत असतां त्यांची बरोबर उत्तरें मिळतील.

हें जाणण्याचा प्रयत्न करणें की तुम्ही कोण आहांत आणि काय आहांत ? हे जगत् काय आहे ? कोणी यास उत्पन्न केलें ? याचें संचलन कसे होतें ? आणि कोण करतो ? जन्म व मृत्यु काय आहे ? परमात्मा कोण आहे ? तो सर्वशक्तिमान कां आहे ? परामात्म्याविषयक जितके शक्य होईल तितके ज्ञान प्राप्त करणे, त्याचे शब्द अर्थात वेदांचे अध्ययन करणें, वेदांवर आधारित ग्रंथांचें अध्ययन आणि त्यांवर चिंतन तथा त्याही पुस्तकांचे अध्ययन आणि त्यांवर चिंतन ज्यांच्यामुळें हे सर्व ज्ञान प्राप्त केले जाऊं शकते. हे सर्व प्रश्न आणि विषय मिळून स्वाध्यायाचे आचरण होय.

जेव्हां कधीं कमी किंवा जास्त अवकाश मिळेल तेव्हां जर तुम्हीं आपल्या विचारांना या प्रश्नांत आणि विषयांत गुंतवाल तर तुम्हीं स्वाध्याय करीत आहांत आणि तपासमान स्वाध्यायानेंही ज्ञानप्राप्तीमध्यें साहाय्य मिळतें. शक्य आहे की तुमच्या व्यवसाय, धंदा किंवा नोकरीनंतर आतां तुम्हास पुरेसा अवकाश मिळत असेल. पूर्वीही अवकाशाची वेळ, सांसारिक चिंता आणि त्यांच्या निवारणाच्या उपायांत तुम्हीच नष्ट करीत होता. पण या आधीं सांगितलेल्या सुखाच्या चार साधन–मार्गांनी तुमच्यांत पुष्कळ आत्मविश्वास निर्माण झाला असावा आणि तथाकथित चिंतेत लीन राहण्यापासून तुमची सुटका झाली असावी. तर हा सर्व अवकाशाचा वेळ स्वाध्यायांत खर्च करा. स्वाध्यायानें सुख जवळजवळ हातभर लांबीवरच आहे. तुमचें स्थिर चिंतन स्वाध्यायांतील सर्व कोड्यास सोडवील आणि योग्य वेळीं एक एक करून प्रत्येक प्रश्नाचें खरें उत्तर तुम्हास मिळत जाईल. जेव्हां सर्वच प्रश्नांची उत्तरें मिळतील तेव्हां तुम्हांस परमात्म्या विषयक संपूर्ण ज्ञान मिळालेलें असेल. स्वाभाविकच, सुखाच्या अधिकाराचा उपयोग करण्यांत अडथळा टाकणारें अज्ञान नाश पावेल आणि आतां

तुमच्या आणि सुखाच्यामध्यें कांहींच बाधा उरणार नाहीं. परंतु सर्व प्रश्नांचे उत्तर आणि पूर्ण ज्ञान मिळणें इतकें सोपें नव्हे. तरीही, पूर्ण परमात्मज्ञान होईपर्यंत स्वाध्याय तर सारखा चालूच असावा.

मी आत्तांपावेतों तुम्हास वेदांच्या त्या पांच शब्दांच्या अर्थाची कल्पना दिली आहे, की ज्या पांच संस्कृत शब्दांना मी वेदांचे सार म्हणतो ते यज्ञ, दान, तप, कर्म, स्वाध्याय हे होत. बाह्य व आंतरिक आणि लौकिक व अलौकिक सुखाच्या प्राप्तीचे मी यांना पांच साधन-मार्ग म्हणतो. यांचे आचरण तुम्हास सदृढ, धनवान आणि बुद्धिमान बनविते. तुम्ही सुखाच्या शोधास पूर्ण करण्यांस योग्य होता. या पांचांपैकीं कोणतेही साधन–मार्ग कोणा एकावर किंवा एकमेकांवर अवलम्बित नव्हे. प्रत्येक स्वतंत्र आहेत. प्रत्येक स्वतःच फार शक्ति–संपन्न आहेत. प्रत्येकाचे जे जे परिणाम सांगितले आहेत, त्याचा सत्य आणि पुरेपूर अनुभव तुम्हांस मिळेलच, यांत संशय नाहीं.

हें पुस्तक सुरू केल्यानंतर मी आतां पहिल्यादांच अलौकिक सुख या शब्दांचा प्रयोग केला आहे. तो फक्त याकरितांच की वाचकांनी समजावें की लौकिक सुख (अर्थात सांसारिक इच्छेची पूर्ति) यांत अलौकिक सुखाचा समावेश नाही. पण अलौकिक सुखात लौकिक सुख किंवा संतोष सम्मिलित आहे. यज्ञ आणि दानानें तुम्ही लौकिक सुख प्राप्त करून घेतां. पण तो सुखाचा वास्तविक अर्थ नव्हे म्हणूनच तप कर्म आणि स्वाध्याय हे तीन साधन–मार्ग सांगितलेले आहेत. यांच्यामुळें तुम्ही परमात्म्याच्या अलौकिक राज्यांत प्रवेश घेतां आणि तुम्हांस अलौकिक सुखाची प्राप्ती करण्याची संधि दिली जाते. लौकिक सुख व अलौकिक सुख, दोहोंच्या प्राप्तीनंतर तुम्हांला या दोहोंतील अंतर विसरायचें आहे किंवा तुम्ही निश्चितच विसराल. आतां कांही लौकिकही उरणार नाही आणि अलौकिक ही नाही. फक्त नुसती सुखाची जाणीव तुम्हास राहील आणि तें सुख आतां शाश्वत आणि स्थायी करून घेण्याचें काम उरेल, जें मुळींच कठीण नव्हे. आतां

तुम्हीं दुःखास तर अगदींच विस्मृत केलें असेल. तें तर आतां कधींच एका क्षणाकरितांही तुम्हांस त्रास देणार नाहीं.

वेदांकडून मानवजातीस आचरण्यासाठीं मिळालेल्या सत्य सनातन धर्माचे पांच उपदेश यज्ञ, दान, तप, कर्म, स्वाध्याय यांनी सुख प्राप्त होते. या धर्माचे क्षेत्र प्रत्येक माणसाकरितां मोकळे आहे. कीं, ज्याच्यांत त्यानें यावे, ज्ञानप्राप्ती करावी आणि जे अज्ञान, मनुष्य आणि सुखाच्यामध्यें अडथळा बनून आहे, त्यास पार झुगारून द्यावे.

तुम्ही स्वतःच मान्य करू शकतां कीं हा धर्म किती सरळ आहे कारण की याची सुरुवात कोणत्याही दिवशीं वाटेल त्या क्षणीं करतां येते. या गोष्टीची पर्वा करण्याची गरज नाही की आजपर्यंत म्हणजे हें सर्व जाणून घेण्यापूर्वी तुम्ही काय बरें करीत होतां. या धर्माच्या सरळतेंत व विश्वव्यापकतेंत कांहीच प्रतिबंध किंवा अडचण नाही, हीच सरळता यास मानव-जातीकरितां आदर्श रुपानें बनविते.

जर तुम्ही यज्ञ, दान, तप, कर्म आणि स्वाध्याय सर्वांचेंच एकाच वेळी आचरण करूं शकाल तर फारच उत्तम आहे. परंतु, असे करूं शकत नसल्यास, यापैकीं एक किंवा दोन जे कांही तुम्ही लगेच सुरू करूं शकतां त्यांना तर सुरू कराच आणि भविष्यांत जेव्हां पण साध्य होईल तेव्हां आचरणांत आणण्याकरितां उरलेल्या साधनमार्गाकडे लक्ष असू द्या. यापैकीं एका किंवा त्याहून अधिकांचे आचरण केल्यानें, इतरांच्या विषयींचा पण तुम्हांस खरेपणा कळेल व त्यांच्याविषयीं तुमच्यांत विश्वास जागृत होईल. कोणाच्याही आज्ञे-विना त्या बाकीच्या साधन-मार्गांचे तुम्ही आपण होऊनच आचरण कराल. हा आहे धर्म आणि त्याची तुमच्यावरील पकड. याच्या सर-ळते आणि उपयुक्ततेमुळेंच व अपवादाशिवाय प्रत्येक मनुष्य याचें आचरण करू शकतो.

...५

या पुस्तकाचा प्रत्येक वाचक, आयुष्यांतील वाटेल त्या मार्गावर असो, पण यज्ञ अगर दान अगर तप अगर कर्म अगर स्वाध्याय तत्काल आचरूं शकतो. कोणाही एकाचे पूर्ण आचरण किंवा एकाच्या अंशमात्राचे आचरण वाचकास सर्वच राज्यांचे जे राज्य म्हणजेच परमात्म्याचे अलौकिक साम्राज्यांत प्रवेश करू शकण्यास अधिकारी करून देतें, जेथें शाश्वत आणि स्थायी सुख स्वत: इच्छुक बनून, वाचकाची वाट पाहात असतें. पांची साधनमार्गांचे आणि त्यांच्या अर्थाचे याहून अधिक महत्व वर्णन करणें शक्य नाहीं.

सुखाच्या या पांची साधन–मार्गांना जितकें कांहीं मला जमलें तेवढ्या विस्तारपूर्वक मी समजावलें आहे. त्याबरोबरच, पुन: पुन: क्षमा मागितली आहे की यांचे संपूर्ण वर्णन करतांच येत नाहीं. कारण की प्रत्येक शब्द अतिशयच व्यापक अर्थाचा आहे, ज्यास मानवीय भाषेंत सीमित करणें अशक्य आहे. तरीही मी प्रयत्न केलेलाच आहे आणि म्हणूनच आतां थोडक्यांत पुनरावृत्ति करून सांगत आहे कीं प्रत्येक साधन–मार्ग सुखाच्या ध्येय–ध्रुवाकडे कोठपर्यंत पोंचवितो.

तुम्हास सुखी होण्याचा अधिकार आहे हे जाणून घेतल्यावर आणि सुखी बनण्याचा निर्णय घेतल्यावर, तुम्ही आपल्या सर्व सांसारिक इच्छेस पूर्ण करण्याकरितां यज्ञाचे सोप्यांत सोपें स्वरूप, अग्निहोत्र ग्रहण करता. सुखाचा हक्क परमात्म्यानें प्रत्येक माणसास दिलेला आहे. म्हणूनच तुम्ही, जे परमात्म्याची स्वाभिमानपूर्ण उत्पत्ति आहांत, ही इच्छा करता की तुमच्या सभोंवतीचे लोकही सुखी व्हावे. तुम्हांस माहीत आहे की याच्याकरिता प्रथम आवश्यकता ही वायुमण्डलाची शुद्धतेची आहे. म्हणून तुमची दृष्टि कोणा मोठ्या यज्ञाच्या आयोजनाकडे जाते. तुम्हीं विचार करतां की कोणी असें धनसंपन्न मनुष्य तरी मिळावे, जे यज्ञाचा खर्च उचलू शकोत किंवा मग हा यज्ञ सहकार्यानें आपसांत लोकांपासून वर्गणी गोळा करून केला जावो. याप्रकारें तुम्हीं ही व्यवस्था करून घेतां की जेव्हां तुम्हीं

सुखी व्हाल तेव्हां तुमच्या आजूबाजूचे लोक देखील सुख–समृद्ध असावे. ही तुमच्या विचारांत पवित्रतेची प्राप्ती आहे.

जेव्हां तुम्ही दान करतां तेव्हां हे दिसतें की दानाने गरीबांस आणि गरजूंस साहाय्य होतें. हें तुम्हांस आवडतें. दानानें तुमच्या धन–वैभवांत वाढ होते. तुम्ही पूर्वीपेक्षां बहुसंख्य गरीबांस आणि गरजूंस दर वेळीं दानानें मदत देतां. त्याबरोबरच संपत्तिची प्राप्ती आणि तीस दान करून टाकण्याची तुम्हांस संवय पडून जाते. यानें तुमच्या भावनांवर कांही परिणाम होत नाहीं. लौकिंक तत्वांविषयक तुमची आसक्ति क्षीण होतां होतां लुप्तच होते. तुम्हीं जाणून घेतलें आहे की लौकिक संपत्ति फक्त साधनच आहे, सुख नाहीं, आणि सुखी माणूस धनाकरितां कोणाचा दास बनत नाहीं किंवा धन-संग्रहाची चिन्ता करीत नाहीं. उलटपक्षीं तो तर संसारांतील सर्व संपत्तिस आपल्या ताब्यांत ठेवून तीव्र शासन करतो. सांसारिक संपन्नतेविषयी संतोष आणि सांसारिक प्राप्तीविषयी वैराग्य दानाच्या आचरणानें होतें.

आतां तपाचरणानें परमात्म्याच्या अलौकिक साम्राज्यांत प्रवेश मिळविण्याचा तुम्ही प्रयत्न करतां. तपानें आपल्या उन्मत्त शरीर व मनावर प्रभुत्वच नव्हे, पूर्ण प्रभुत्व प्राप्त करतां. तुम्ही त्याच्या ल्हानसहान गरजा जसे भूक, तहान, वा झोपेची पूर्ति करा अगर नका करूं. तुम्हीं त्यांना नियंत्रणांत आणून आज्ञाधारकतेचा धडा गिरवून दिला आहे. आता तुम्हीं त्यांच्या आज्ञा मानीत नाहीं. आतां तुम्ही आपले स्वत्व सिद्ध केले आहे. यानें तुम्हांस आपल्या स्वतःच्याच परंतु आजतागायत अज्ञात अशा शक्तींचे रहस्योद्घाटन झालेलें आहे.

कर्म आचरणानें परमात्म्याकडून सुखाकरितां तुम्ही निवडले जातां कारण की त्याच्या विधिनिषेधांचे श्रद्धापूर्वक पालन करण्या-साठीं तुम्ही आपल्या स्वतःला बंधन केलेले आहे. याप्रमाणें सुख प्राप्त झाल्यावर त्याचा दुरुपयोग न होण्याचें तुम्ही आश्वासन देतां.

स्वाध्यायानं तुम्ही परमात्म्यास जाणून घेण्याचा प्रयत्न हातीं घेतां आणि मग त्यास जाणूनच घेतां. त्यास चांगल्या प्रकारें जाणल्या शिवाय पूर्णत्व, परमात्म्यासमान पूर्णत्व,तुम्ही कसे प्राप्त करूं शकाल ? परमात्म्यासमान पूर्ण होणेंच तर सुख आहे.

सत्य सनातन धर्म आणि त्याचे पांच उपदेश तुम्हास सुखा-पर्यन्त पोंचवून देतात. आतां फक्त सद्‌गुरुविषयीं थोडेसें जाणून घेण्याव्यतिरिक्त, सुखाचा शोध जवळजवळ पूर्णच झालेला आहे.

• • •

अध्याय ६

मार्गदर्शक सद्गुरु

सत्य सनातन धर्माचे उपदेश आणि सुखाचे साधन–मार्ग जे यज्ञ, दान, तप, कर्म आणि स्वाध्याय, यांचे वर्णन मी मागील अध्यायांत केले आहे. मला या पांचही शब्दांना वारंवार पुनरूच्चारण करण्यांत आनंद होत असतो. याकरिताच की, त्यांच्या अर्थास जाणून तुम्ही चारही वेदांचे सार जाणून घेतां. अन्यथा वेद काय आहेत हे जाणण्यासाठी तुम्हांस त्यांचे वाचन केलें पाहिजे. फक्त वाचल्याने तर कांहीही होणार नाही. तुम्हांला त्यांचे अध्ययन करावें लागेल. मग वाचावयाचे असो किंवा अध्ययन असो, पहिले तर तुम्हांस संस्कृत शिकलें पाहिजे. संस्कृत भाषेंतूनच विश्वातील इतर सर्व भाषांचा उगम आहे. म्हणून ती अवघड भाषा होय, कारण सर्व भाषेंचें मूळ आहे. सृष्टिच्या सकल मानवजातीला आचरण्यास सत्य सनातन धर्माचा उपदेश देतेवेळीं, खुद्द परमात्म्यानेंच या भाषेचा उपयोग केला.

केवळ संस्कृत भाषा शिकल्यानेंच काम चालणार नाहीं. तुम्हीं वेदांस तर वाचू शकाल पण त्यांच्या शब्दांचा गूढ आणि गहन अर्थ समजूं शकणार नाहीं. तुम्हांस फक्त भाषिक अर्थ समजून येईल पण तो पुरेसा होणार नाहीं बरोबरच तुम्हांस हाही पत्ता लागणार नाहीं की वेदांच्या शब्दांचे शुद्ध उच्चारण आणि स्वरयुक्त वाचन कसें केलें पाहिजे. धर्मविषयक सर्वप्रथम आणि मूळ ग्रंथ असल्यानें वेदांना एका विशिष्ट प्रकारचा विशेष सन्मान दिला गेला आहे. त्यांच्या शब्दांचें उच्चारण आणि वाचन एका विशिष्ट स्वरांनें आरोह अवरोह युक्त असें असले पाहिजे. म्हणून तुम्हांस कोणत्या तरी वेदपाठीस धुंडावे लागेल जो स्वरयुक्त पाठ आणि उच्चारण शिकण्यांत तुमचें साहाय्य करेल. माझ्या या सर्व अडचणी या पांच शब्दांचा अलभ्य लाभ मिळाल्याने दूर झाल्या आहेत. यज्ञ, दान, तप, कर्म, स्वाध्याय, यांची म्हणूनच मला आवड आहे, म्हणूनच त्यांना पुन: पुन: उच्चारण्याकडे माझी प्रवृत्ति होते. मूळ ग्रंथाचे वाचणें आणि समजणें नि:संशय आश्चर्ययुक्त आनंद देईल आणि मी त्याकरिता उद्युक्त आहे पण त्याचें सार या पांच शब्दांत जाणून घेणें हाही कांही कमी आश्चर्यजनक आनंद नव्हे.

आम्हीं मागील अध्यायाचे अखेरीस हे पाहिलेंच आहे की या पांच उपदेशांच्या आचरणानें तुम्ही सुखाच्या प्राप्तीकरितां आणि त्याचा आनंद लुटण्याकरितां आवश्यक अशी पात्रता प्राप्त करून घेतां. जर का तुम्हीं अशा पात्रतेस संपादन केलें नसेल, तरी पण तुम्हास स्पष्टत: तिच्या प्राप्तीची निर्विवाद साधने सांगून दिलेलीं आहेत, सिद्धांत जाणलेला असल्यानें, आचरण सुरू करतां येते. परंतु या सिद्धांतांत किंवा आचरणांत कोठें कांही उणीव तुम्हांस भासत असेल आणि त्यामुळें सुखाच्या प्राप्तींत अडथळा येत असेल. कोठें आणि काय सुधारावें हें माहीत नसल्यानें तुम्हांस मार्गदर्शनाची गरज पडेल आणि याकरितांच मार्गदर्शक सद्गुरु असतात, जे पूर्ण पुरुष असतात. सुखाच्या शोधांत येणाऱ्या कांहीं पण किंवा सर्वच अडथ-

ळयांस सद्गुरु सरळ प्रकारें सोडवून घेतात. पूर्ण पुरुष असल्यामुळें ते स्वत: सुखी असतातच, पण त्यापेक्षांही कांही अधिकच असतात. म्हणून फक्त तेच तुमचे योग्य मार्गदर्शन करूं शकतात, चुका दुरुस्त करूं शकतात आणि सुखापर्यन्त पोंचवून देतात. मग तुमच्या या पांचही उपदेशांच्या आचरणांत लहान मोठ्या उणीवा देखील कां न असोत

ते सद्गुरु याचकरिता म्हणविले जातात. ते तुम्हास त्या 'सत्' अवस्थेपर्यंत पोंचवून देण्याचे सामर्थ्य ठेवतात की जी अवस्था सुखाची सत्य आणि अंतिम अवस्था आहे. या अवस्थेस तुम्हांस घेऊन जाण्यापूर्वी ते पूर्णपणें परीक्षा करून घेतात कीं यज्ञ, दान, तप, कर्म, स्वाध्याय या पांच उपदेशांच्या आचरणाचे अभ्यस्त होऊन तुम्हीं त्या अंतिम अवस्थेकरितां योग्य पात्रता प्राप्त केलेली आहे किंवा नाहीं. जर ते तुम्हांस योग्य लक्षतात तर ते आपली अल्पशी कृपा तुम्हांस प्रदान करतात, जिच्या योगानें अज्ञानाचा पडदा फाटून जाऊन सुख तुमच्या हातीं येणार. या कृपेकरिता कांहीही दक्षिणा द्यावयाची नसते, आणि यापूर्वी किंवा नंतर पूर्ण करण्याकरिता कांहीही अटी नसतात. म्हणूनच मी त्यांना मार्गदर्शक सद्गुरु म्हणतो. ते तुम्हास सुखाचे दर्शन घडवून देतात. त्याच्यापासून तुम्ही किती जवळ किंवा लांब आहांत किंवा तुमच्यांत काय उणीव आहे याचे आकलन करवून देतात. शेवटीं सुखप्राप्ती व्हावी आणि उरलेल्या आयुष्यांत तुम्ही त्याचा आनंद उपभोगावा या करितांच ते तुमचे मार्गदर्शन करतात.

पांची उपदेशांचे योग्य प्रकारें पालन केल्यानें तुम्ही सुखाजवळ किंवा अतिशयच जवळ आहांतच. तुम्हांस त्याचे ओझरते दर्शन दिसूं लागते. तुम्हीं त्याचे अंशत: आनंद सुद्धां उपभोगता. पण सुखाची शेवटची आणि पूर्ण प्राप्ति तर तेव्हांच शक्य होतें, जेव्हां तुम्हांस एक पूर्ण पुरुष भेटतात आणि त्यांचेकडून तुम्हीं संरक्षण आणि मार्ग-

दर्शन प्राप्त करतां. म्हणून सुखाच्या शोधात सद्गुरुंचे भेटणे अनिवार्य आहे, ही भेट टाळतां येणार नाहीं.

स्वाभाविक असा प्रश्न उपस्थित होतो कीं सद्गुरुंना कोठें आणि कसे भेटावे ? मागील अध्यायांत सांगितलेल्या साधन मार्गानें सुखाचा शोध करीत असतां, परमात्मा आणि त्याच्या सर्वव्यापकतेविषयीं तुम्ही बरेच कांही जाणलेले आहे आणि त्याच्या आज्ञेचे पालन करीत आहांत. या प्रकारें तुम्हीं परमात्म्याची कृपा संपादन केलीच आहे. याच कृपेमुळे सद्गुरु भेटतात. परमात्म्याची कृपा प्राप्त करण्याची योग्यता तुमच्यांत आलेलीच असल्यानें सद्गुरु अवश्यच भेटतील. याबाबत तुम्हास कोणताही संशय घेतला न पाहिजे. कोणच्या स्थळीं तुमचे सद्गुरु आहेत याचा निर्णय तुम्हीं स्वत: घेऊं शकता. तुम्हांस त्या स्थानीं अशी निर्दोषपूर्ण शांति लाभली पाहिजे जितकी पूर्वी कधींही कुठेंही मिळालेली नसते. ही सर्वांत सोपी आणि सर्वोत्तम खूण आहे. ते स्थान लांब असो किंवा जवळ याचा कांहीच संबंध नाहीं. परमात्म्याच्या अलौकिक राज्यांत लौकिक दृष्टिच्या अंतरास कांहीच अर्थ नाहीं. तर अशा स्थळीं तुमच्या सद्गुरुंचा सदेह निवास असतो, जेथें उपरोक्त शांतिचा तुम्हांस अनभव आलेला असेल. ज्या व्यक्तीच्या प्रथम संपर्कात येताच, तुमच्या हृदयांत त्याच्या प्रति पूज्य भाव जागृत होईल आणि ही खात्रीहि उत्पन्न होईल की तुम्हांस त्याचे संरक्षण आणि दायित्व त्याच प्रकारें प्राप्त आहे जसें तुमच्या माता पिताकडून होतें किंवा आहे, तीच व्यक्ति तुमचे सद्गुरु होय. सर्वप्रथम संपर्कातच हा भाव उदित होतो आणि झालाच पाहिजे, कोणत्याही वार्तालापाशिवाय अगर तुमच्या आणि त्यांच्या वयांतील अंतराकडे लक्ष दिल्याशिवाय लक्षांत असावें की परमात्मा स्वत:च्या योजनेप्रमाणें ही भेट घडवून आणीत असतो, कारण की त्यांची तुमच्यावर कृपा आहे. सद्गुरुंचे स्थान आणि व्यक्तित्व ओळखण्याचे मी फक्त संकेत दिलेले आहेत ही प्रथम भेट घडवून आणल्यानंतर, परमात्म्यास समाधान लाभते. की आता

त्याने आपल्या विश्वस्त प्रतिनिधिचे हातीं तुम्हास सोंपविले आहे. यानंतर आतां तुम्हीं आणि तुमचे सद्गुरुच मैदानांत आहांत. तुम्ही पूर्णत: सुखास हुडकून काढण्याच्या प्रयत्नांत तल्लीन आहांत आणि सद्गुरु आपल्या स्नेहमय, पितृतुल्य स्वभावाने तुमचें मार्गदर्शन करीत आहेत. सद्गुरु संसाराच्या कोणत्याही क्षेत्रांतील असूं शकतात, नोकरीत, धंद्यांत किंवा आणखी कोणत्याही व्यवसायांत, सद्गुरुस शोधून काढण्याचे किंवा त्यांचे सद्गुरु असल्याचे निर्णय घेण्याचें लक्षण, त्यांचे शारीरिक रूप किंवा तेथील वातावरण नव्हे.

हें जाणून घेतल्यावर की सद्गुरु कोठें आणि कसे भेटतात, तुम्ही विचाराल की सद्गुरु काय आहेत ? या प्रश्नाचें उत्तर देण कठीण आहे. वेदांने देखील सद्गुरुंचे वर्णन आणि त्यांची मुक्त कंठानें प्रशंसा केल्यानंतर, अध्याय समाप्ति ‘ नेति नेति ’ शब्दांच्या प्रयोगानें केली आहे. तेव्हां मग मी कसा बरे यशस्वी होईन ? मी तर फक्त तुम्हांस कल्पना करवून देतो की सद्गुरु काय आहेत. फक्त कल्पना देण्याचें कार्यही योग्य प्रकारें पूर्ण करण्यास जमणार नाही. म्हणून ते काय आहेत याचे वर्णन तेवढेच मर्यादित ठेवीन, जेवढें की सुखाचे शोधक या नात्याने तुम्हांस जाणलें पाहिजे.

परमात्म्यासारखेंच पूर्णत्व प्राप्त केलेले पूर्ण पुरुष सद्गुरु होत. स्वाध्यायांत जें परमात्म्याचे पूर्ण ज्ञान प्राप्त करावयाचे असतें तें आपल्या सद्गुरुस जाणूं शकल्यानें होऊ शकतें. सद्गुरु सर्वज्ञ आहेत. सुखाच्या आणि तुमच्यामध्यें मध्यस्थी करण्याकरितां आपल्याला सद्-गुरु भेटो, या तुमच्या उत्कट इच्छेच्या फलस्वरूप जी तुमची त्यांची प्रथम भेट होते, त्याच वेळीं ते तुमच्याविषयीं वर्तमान, भूत आणि भविष्याबाबत प्रत्येक आणि सर्वच गोष्टी जाणतात. तुम्हीं त्यांना कांहीही सांगणें जरुरी नाही. परमात्म्याशीं त्यांचा संपर्क असल्यामुळें त्यांना तुमच्याविषयीं सर्व कांही माहीत असतें. प्रथम भेटीपूर्वी देखील त्यांनी सर्व कांहीं जाणलेले असतें. कारण कीं परमात्म्याच्या कृपे–

खरीज तुम्ही त्यांच्याशी भेटूच शकत नाही. ते हेंही जाणतात की सुखाच्या शोधांत तुम्ही किती प्रगति केली आहे आणि काय करणें शिल्लक आहे. तुमच्या योग्यतेचे त्यांना पूर्ण ज्ञान असल्यामुळें, ते आतां तुमच्या बाबतींत आपली योजना आंखतात. अलौकिक क्षेत्रांत तुमची प्रगति आणि मुख्य म्हणजे तुमच्या तपाचरणावर त्यांची सारखी नजर असते. जर त्यांना आवश्यक वाटले तर मानसिक तपाकरितां तुम्हांस दीक्षा देतात. मनाच्या एकाग्रतेच्या अभ्यासांत त्यांच्या दीक्षेनें लौकर आणि चांगले परिणाम दिसू लागतील. या दीक्षेनें तुम्ही त्यांचे शिष्य झाल्याची औपचारिक मान्यता मिळते. सद्‌गुरु सर्व समर्थ आहेत. त्यांचे अलौकिक सामर्थ्य अनंत आहे. हे सामर्थ्य परमात्म-शक्ति समान असते. या सामर्थ्यास आपले शिष्य किंवा शिष्यांस देऊन टाकण्याची त्यांची उदारता आणि महानुभावता अद्वितीय आहे. ती आश्चर्यकारक प्रकाराची ही आहे. कारण की आपल्या एक किंवा अधिक शिष्यांस सर्वचे सर्व सामर्थ्य प्रदान केल्यानंतरही ते सामर्थ्य जसेच्या तसे सद्‌गुरुजवळच असते. ही गोष्ट मानवी कल्पनेपलीकडे आहे. तरी पण हें एक कटु सत्य आहे. याप्रमाणें आपल्या अनुयायां-मधून जो पण योग्य असेल, त्यास ते आपल्यासारखे सद्‌गुरु करून देतात. जर तुम्ही मातीच्या एका दीपांत तेल भरून त्यास प्रकाशित कराल आणि त्या दीपाच्या ज्योतिने इतर दीप प्रकाशाल व सर्वंच प्रकाशित दीपांस एका रांगेत ठेवाल, तर ते एकसारखा प्रकाश देतील आणि एकसमानच पेटलेले दिसतील. कोणीही माणूस हे सांगू शकणार नाही की त्यापैकीं कोणता दीप सर्वांच्या आधी पेटविला गेला होता आणि कोणाच्या ज्योतिने इतरांना पेटविले गेले. हाच सिद्धांत येथेही लागू होतो. सद्‌गुरु आणि त्याने निवडलेल्या त्या शिष्यास ज्याला त्यानीं आपले सर्व सामर्थ्य प्रदान करून आपल्या समान सद्‌गुरु केलेले असते, इतकी एकरुपता असते की त्या दोहों-पैकी कोण कोणाचा अनुयायी होता, हें सांगणे अवघड होईल. दोघेही आपल्या सर्व शक्तिमान विभूतींत एकसमान असतात.

या तऱ्हेची कृपा जर का सद्गुरुनें तुम्हांवर केली, तर तुमचा सुखाचा शोध पूर्ण झाला. तुम्ही सुखी पेक्षाही अधिकच कांही झालांत, सद्गुरु तुम्हांला आपल्या अंतरांतील प्रकाश दाखवितात आणि इतके-ही की ते तुम्हांसही प्रकाशित करून सोडतात. अशा तऱ्हेचे ते दाता आहेत जे तुम्हांस ज्ञानाचे दान देतात. असे ज्ञान त्यांच्यापासून मिळाल्यानंतर कांहीही शिकणें, जाणणें शिल्लक उरत नाहीं. ज्ञानाची इच्छा पूर्णतया शांत होते आणि तुम्हीं सुखी होता. इतकें सर्व सामर्थ्य, ज्ञान आणि पूर्णत्व नांदत असतांना देखील सद्गुरु चमत्कार प्रदर्शन करीत नाहींत. त्यांना तथा त्यांचेकरिता कोणती ही गोष्ट अशक्य नसल्यानें चमत्कारांचे अस्तित्वच नव्हे. ही गोष्ट निराळी आहे की कोणत्याही स्थानीं त्यांची उपस्थिति किंवा त्यांची वचनें अगर कृती अज्ञानी जनांस चमत्कारकारक सिद्ध होवोत.

मला वाटतें कीं सद्गुरु काय आहेत, या प्रश्नाचे अद्यापपर्यंत दिलेले उत्तर त्या लोकांकरितां पुरेसें आहे जे सुखाच्या शोधांत आहेत. याहून अधिक ज्ञान त्यांनीं स्वतःच अनुभवांनी प्राप्त करून घ्यावे.

पुढील प्रश्न हा होऊं शकतो की सद्गुरु कोण आहेत ? सगळचा सद्गुरु जनांचे सद्गुरु, परमात्मा स्वतः आहेत जे या सद्गुरु-संस्थेचे निर्माता आहेत की जिच्यानें तुम्हांस सुख प्राप्त करण्यांत मार्गदर्शन होवो. म्हणून समकालीन सद्गुरु, जन्मतः परमात्म्याचे अवतार आहेत किंवा ते व्यक्ति आहेत जे की सद्गुरुंचे योग्य शिष्य असलेमुळें या अवस्थेस (सद्गुरु पदास) प्राप्त करू शकले आहेत, जसे की विस्तृत विवरणाने वर सांगितले आहे. अवतार असोत किंवा या पदास पोंचलेले असोत, सद्गुरुचा परमात्म्याशी सरळ संपर्क असतोच असतो. ते परमात्म्यास पाहतात आणि तुम्हांसही दर्शन घडवूं शकतात, जर तुम्ही अलौकिक क्षेत्रांत तेवढी पात्रता मिळवून घेतलेली असेल तर. याप्रमाणें सद्गुरु मानवदेहांत परमात्म्याचे प्रतिनिधि किंवा संदेश-

उद्देश किंवा उद्देशांची पूर्ति त्यांचे (सद्‌गुरुंचे) कडून करवून घेतात.

सद्‌गुरूंची जीवन–चर्या काय असते हा पुढील प्रश्न असू शकेल. उत्तर हेंच की सत्य सनातन धर्मच त्यांची जीवन–चर्या आहे. ते या धर्माचे मूर्तिमंत स्वरूप आहेत. मागील अध्यायांत सांगितलेल्या पांचही साधन–मार्गांबद्दल सर्वोत्तम आणि प्रत्यक्ष ज्ञान सद्‌गुरुंची दिनचर्या पाहून मिळू शकते आणि प्रत्येक साधन–मार्गाचे उच्चतम पातळीवर होत असणारे आचरण तुम्हीं पाहूं शकता, म्हणून परमात्म्याच्या कृपेनें जर तुम्हांस सद्‌गुरु लौकरच भेटले आणि त्यांची जीवनचर्या पाहून तुम्ही धर्म–ज्ञान करून घेतलेंत, तर सुखप्राप्तींत तुमची प्रगति त्या लोकांपेक्षां चांगली होईल हे सिद्धांतानुसार शोध करीत आहेत. सद्‌गुरु आपल्या जीवनांतील लौकिक व अलौकिक कार्यांत व्यस्त असतात. ते आपलें कुटुंब व मुलांचा सांभाळ करीत असतात आणि त्याबरोबरच इतस्तत: फारच लांब लांब पसरलेल्या आपल्या शिष्य–भक्त–अनुयायी परिवारांच्या प्रत्येक सदस्यावर आपली शोधक दृष्टि ठेवून असतात. त्यांचा शिष्य त्यांच्यातच आपले सर्वच नाते-वाईकांचा संयोग सिद्ध असलेलासा पाहतो. सद्‌गुरुंचे संपूर्ण प्रेम, ममता, काळजी, आणि संरक्षण शिष्यास मिळालेलेंच असते आणि प्रत्येक शिष्य स्वत:स त्यांचा विशेष लाडका समजत असतो. स्वभावानें सद्‌गुरु, दयाळू, कृपाळू, स्नेहमय आणि ममताळू असतात. या उलट ते कांही असूंच शकत नाहीत. कठोर शब्द आणि रोषप्रदर्शन त्यांच्या स्वभावांतच नसते. ते जे कांहीं बोलतात, सांगतात ते तेंच असतें जें वेद सांगतात. ते कोणास कोणत्याही प्रकाराचे श्राप किंवा दंड देत नाहींत. असे ते कधींच करणार नाहींत. म्हणून तर शिष्य त्यांचे पूर्ण संरक्षण अनुभव करीत असतो. ते कोणत्याही वस्तूंत किंवा माणसांत, कोणत्याहि पंथ, मत, जाति, अथवा संप्रदायांत दोषदृष्टि ठेवीत नाहींत. यांत त्यांची दृष्टि चांगल्या गोष्टींवरच असते, ज्यांची चर्चा ते आपल्या लोकांत करीत असतात.

सर्वांत महत्वपूर्ण गोष्ट जिची याचना आणि प्रार्थना सुख शोधणाऱ्यानें परमात्म्यापाशीं करीत असलें पाहिजे, ती आहे सद्गुरुंचें भेटणें आणि त्यांचे संरक्षण आणि दायित्वांत प्रवेश मिळणें. या भेटीनें त्यांच्याकरिता लौकिक व अलौकिक प्राप्तींचे क्षेत्र मोकळे होते. जे की सुखाचे साधन तथा साध्य आहे. अनुमानाने अवघड आणि अंतरहित वाटणारा शोध, सद्गुरुंच्या भेटीनंतर लौकरच किंवा कांही काळानें पूर्ण होतो.

सद्गुरुंच्या भेटीनंतर व त्यांच्या छत्रछायेंत शिष्य किंवा अनुयायी रुपांत प्रवेश मिळाल्यानंतर ज्या गोष्टींचे एकसारखे प्रयत्न व आशा केली पाहिजे ती आहे गुरु–कृपा. हाच खरा लाभ आहे आणि हेंच तुमचें ध्येय असलें पाहिजे. आणि फक्त यासाठींच तर परमात्म्याने तुम्हांस सद्गुरुंच्या दैवी उपस्थितींत आणलेले असतें.

सद्गुरु कृपाळू असतातच. म्हणून तुमच्या योग्यतेचे त्यांस समाधान झाल्यावर ते तुमच्यावर तुमच्या अपेक्षेहून किती तरी अधिकच कृपा करतात. त्यांच्या याच कृपेनें तुमच्या सांसारिक समस्या सोडविल्या जातात आणि अलौकिक प्रगतीत येणारे अडथळे बाजूस सारले जातात. या कृपेचा चमत्कार हाच आहे की एकदां तिची प्राप्ती आणि तिच्या अबाधित निरंतरतेविषयीं आश्वस्त झाल्यावर, सद्गुरुंचे सदेह तुमच्या समीप असणें वा नसणें किंवा तुमचें त्यांच्याजवळ जाणें, या सर्वाची आवश्यकता उरत नसते. इतकेंच नव्हे तर त्यांचे या संसारांत मानवदेही असणें वा नसणें याचा कांहीं संबंध उरत नाही. जर त्यांनीं महासमाधिही घेतलेली असेल तरी त्यांची कृपा तुमच्याच कल्याणाकरितां कार्य करीत असते आणि तुम्हांस अलौकिक क्षेत्रांत नवनव्या क्षितिजांचे रहस्योद्घाटन करीत राहते. सद्गुरुंचा अदृश्य हात शिष्याचे कार्य करीत असतांना व त्यास मार्गदर्शन करीत असतांना दिसून येतो. पूर्वीसारखेच सद्गुरुंचे संरक्षण शिष्याचे भांडवल बनून राहील. सद्गुरुंचे मानव–देहानें अस्तित्व

असणें किंवा या पृथ्वीवरून अगदीं अदृष्य होणे, यामुळें त्यांच्या कृपेत कांही परिवर्तन होणार नाहीं. त्यांची कृपा तर तुमच्या प्रगतिकरितां आहे. अधिक प्रगतिनें त्या कृपेचें अधिकच प्रभावशाली असण्याचें अनुभवास येतें. हें तोंवर चालू असतें जोपर्यंत तुम्ही स्वतःच सत् आवस्थेस पोहचत नाहीं किंवा सुखी होत नाहीं. त्यानंतर तर तुम्हांस कोणाच्याही मार्गदर्शनाची जरूरच उरत नाहीं, तसेंच संरक्षणाचीही कारण की तुम्ही स्वतःच आता पूर्ण पुरुष झालेले असतां.

हेच कारण आहे की मी सद्गुरुंच्या कृपेस अद्वितीय महत्वपूर्ण लाभ म्हणतो. फक्त याकडे तुमचे सारखे ध्यान असले पाहिजे. सद्-गुरुविषयक ज्या लौकिक आणि बाह्य बाबी आहेत जसे नांव, वय व्यवसाय, पत्ता, घर इत्यादि, त्यांस कांही विशेष महत्व नसते. तुमचा या सर्व गोष्टींशी कांही विशेष किंवा मुळींच संबंध नसतो जे सर्व कांही तुम्हांस सद्गुरुकडून मिळवावयाचे आहे, ते आहे त्याची कृपा फक्त त्या कृपेशीच तुमचा संबंध आहे आणि असलाच पाहिजे. म्हणून कोणी समंजस शिष्य आपले मुखांतून सद्गुरुंचे नांव उच्चारित नाहीं कारण की नांवाने तर सद्गुरुंची सर्वव्यापकता आणि सर्वमयता सीमित होते. म्हणूनचं तर सद्गुरु जनांचे सद्गुरु किंवा आदि सद्गुरु जे परमात्मा स्वतः आहेत, त्यांचे कांहींच नांव नाहीं. नांवानें तर त्यांचे कार्यक्षेत्र संकुचित होईल. परमात्मा फक्त परमात्माच आहे. त्यांचेविषयी लिहिते बोलते वेळीं आंतरिक आदर-भाव व्यक्त होत असतो. सद्गुरु देखील आपले शिष्य आणि अनु-यायी करितां केवळ सद्गुरुच आहेत. त्यांचे नांव तर त्या लोकां-करितां आहे जे आपल्या दुःखमय परिस्थितीतच जग इच्छितात आणि सुखाच्या शोधांत नसतात.

सद्गुरुकृपेचे इतके महत्व जाणून घेतल्यावर कोणीही हेंच समजेल की ती प्राप्त करणें फारच अवघड असले पाहिजे. पण तुम्हांस हें जाणून आनंदाश्चर्य होईल की सद्गुरु कृपेस प्राप्त करण्या-

समान सोपे आणखी कांहीच नाही, कारण की जे कांही तुम्हांस करावयाचे आहे, ते फक्त आज्ञाकारक बनून असणें होय. सत्य सनातन धर्माचे आचरण-कर्ता असल्यानें, हा आज्ञापालनाचा गुण तुमच्यांत आहेच. परमात्म्याच्या आदेशानुसार तुम्हीं आपल्या माता पिता आणि गुरुजनांच्या आज्ञा पाळीत आले आहांत. कर्म आचरणानें तुम्ही परमात्म्यास दाखवून दिलें आहे की त्यांचे आदेशित विधि–निषेधांचे तुम्ही पालन करीत आहांत.

सद्गुरुंची भेट घडवून दिल्यानतर आतां परमात्माच तुमचे आज्ञापालन-गुणाची व्यावहारिक परीक्षा घेत आहेत. सद्गुरुंच्या कृपेचें महत्त्व तुम्ही जाणून घेतलें आहे. हें पण जाणलें आहे की फक्त त्यांचे आज्ञाधारक सेवक बनल्यानें त्यांची कृपा जास्तीत जास्त प्रमाणांत तुम्हांस मिळूं लागते. आज्ञापालन सोपे आहे जर का तुमच्यांत श्रद्धा असेल. पाहा की परमात्म्याची तऱ्हा किती विलक्षण आणि अद्वितीय असते. वस्तुतः पांचही साधन–मार्गांने व विशेषें करून कर्म आचरणाने तुम्हीं परमात्म्यास दाखवून दिलें आहे आणि सिद्ध केले आहे की तुमची त्यांचेविषयी श्रद्धा आहे, विश्वास आहे आणि तुम्हीं त्यांच्या आदेशांचे पालन करीत आहांत. पण परमात्मा तुम्हांस सुख देण्याचे अगोदर किंवा पूर्णत्व द्यावयाचे आधीं, तुमची श्रद्धा आणि आज्ञापालन विषयीं पुन्हां एकदां खात्री करूं इच्छितात. म्हणून सुख आणि तुमच्यामध्यें एक मध्यस्थ नियुक्त करून देतात. हा मध्यस्थ पूर्वी कधींही तुम्ही पाहिलेला किंवा जाणलेला नसतो. जर तुमचे म्हणणें आहे की माता–पिता, गुरुजन आणि परमात्म्याचे आदेश पालनाचे तुम्ही अभ्यस्त झालेले आहांत तर, आता परमात्मा तुमच्याकडून अपेक्षा करतात की तुम्हीं त्यांना हे दाखवावें की आज्ञापालनाच्या अभ्यासामुळें तुम्हीं अशा सज्जनांचे पण आज्ञाकारी आहांत ज्यांना तुम्हीं पूर्वीं कधीहि जाणत नव्हता आणि ज्यांचा तुमच्याशी आतां परिचय करविला जात आहे. परमात्म्यांत तुमची श्रद्धा आणि आज्ञापालनाचे परिणामीं ते तुमचा सद्गुरुंशी परिचय करवून

देतात, जे तुमच्या समानच एक लौकिक माणूस दिसतात. तेव्हां तुम्हांस हें ज्ञान दिलें जातें की सद्गुरुंची कृपाच सुख आहे. तुम्हांस ही कृपा जिंकून घेणें आहे आणि फक्त इतक्यानेंच सुखाचा शोध पूर्ण करणें आहे. तुम्हांस हेही सांगितले जाते की ही कृपा अशी कोणती वस्तु नव्हे जी द्रव्यानें विकत घेतली जावो किंवा प्रयत्नांनें साध्य होऊं शको. फक्त आवश्यकता आहे आज्ञापालनाची आणि आज्ञापालन सोपे आहे, जर तुमच्यांत श्रद्धा असेल. अशी होत असते परमात्म्याकडून तुमची व्यावहारिक परीक्षा, जिच्यानें त्यांना तुमची पूर्ण तयारी आणि तुमची त्यांच्यांतील अनन्य श्रद्धा याबद्दल समाधान प्राप्त होतें.

इतके जाणून घेतल्यानें तुम्हाला परीक्षेंत यशस्वी होण्यास मदत झाली पाहिजे. सद्गुरुचे आज्ञाधारक, पूर्ण आज्ञाधारक सेवक बना. त्यांवर श्रद्धा ठेवा. परंतु असे पूर्वीपासूनच सावधान आणि तयार असल्यावरही तुम्हांस हे आढळू शकते की ते तर कांहींही आज्ञा किंवा आदेश देतच नाहींत. तर काय नि कसे आज्ञापालन करावे ही स्थिति फारच द्विधावृत्ति करते. स्वभावानें परम् दयाळू असल्यानें सद्गुरु कधींही प्रत्यक्ष आदेश, तशा तऱ्हेच्या भाषेंत वा हालचालीने देतच नसतात. वस्तुत: त्यांची स्वत:ची दिनचर्या तुमचे करितां आदेश आहेत. त्यांचे भेटीनंतर तुमचे आयुष्यांत घडणाऱ्या घटना या त्यांचेच आदेश आहेत. कारण की परमात्म्याने त्यांचेवर तोपर्यंत तुमचे पूर्ण रक्षण सोपविले आहे. जोंवर तुम्ही त्यांचे समान पूर्ण सुखी होत नाहीं. स्वप्न. दृश्य, रहस्य–ज्ञान, सर्व त्यांचे आदेश होय. परंतु लहानपणापासून स्पष्ट, रागें भरून आणि ओरडून दिलेल्या आदेशांचेच तुम्हीं अभ्यस्त असता. तुम्ही हे जाणतच नाही की आज्ञा तर इतरही कोणत्याही प्रकारें दिली जात असते. तुमचे हे अज्ञान सद्गुरुंपासून लपून राहात नाही. जेव्हां ते पाहातात की त्यांच्या मूक आदेशांना तुम्ही समजू शकत नाहीं. रुप तेव्हां ते त्या आदेशांत थोडीशी सुधारणा करतील. त्या सुधारणाचें रुप हें होईल की ते कधीं काळीं

तुम्हांस क्षणिक सूचना देतील. कधीं कधीं मृदु उपदेशही आणि कधीं तुमच्या उपस्थितींत दुसऱ्याशीं वार्तालाप करतांना परोक्ष आदेश दिले जातील. म्हणून वर्षांतून एक अगर अधिक वेळां किंवा अल्प अगर अधिक काळासाठीं, जेव्हां जेव्हां तुम्ही त्यांचे समक्ष असाल तर सतर्क असावे. या सूचना, उपदेश आणि परोक्ष आदेशांना लक्षांत ठेवावे. आणि हें सर्व स्पष्ट आणि प्रत्यक्ष आदेश आहेत असेंच मानावे. तर परिस्थिती ही आहे की आदेश मिळत नाही, तरी आज्ञापालन झालेंच पाहिजे, अर्थात आदेश समजून घ्यायचे आहे, आणि त्यांचे पालन करावयाचे आहेत, तुम्ही मान्य कराल की आज्ञापालन करण्याकरितां किती असीम श्रद्धेची आवश्यकता आहे, यामुळें आज्ञापालनांत रोजच आणि पुन्हां पुन्हां चुका होण्याचा संभव अधिकच राहील. या चुकां-विषयीं पुढील कोणत्या भेटीत शांत आणि सौम्य प्रकारानें तुम्हांस सांगण्यांत येईल. पश्चात्तापच तुमच्या पदरीं पडेल.

सद्‌गुरु देखील तुमच्या परीक्षा घेत असतात, पण तुम्हास मुळीच जाणीव नसते की परीक्षा चालू आहे. सद्‌गुरुकडून या परीक्षा याकरितां होत नाहीं की नापास झाल्यास तुम्हांस कांही दंड मिळेल किंवा तुमची अवनति केली जाईल. ते तर फक्त या गोष्टींचे परीक्षक आहेत की सद्‌गुरुचे प्रति तुमची श्रद्धा किती प्रचण्ड आहे आणि आज्ञापालनाची तयारी कोठवर आहे. तुम्हांस या परीक्षांचा पत्ता आपोआपच लागतो, कोणीही सांगितल्या शिवाय, परंतु बरेच काळानंतर. सद्‌गुरूंच्या परीक्षांमध्यें यशस्वी आणि अयशस्वी होणें दोन्ही एकसमानच आहे, कारण की त्या तर श्रद्धा आणि आज्ञा पालनाचे मापदंड असतात.

या परीक्षा एका प्रकारें शिष्याची बुद्धि आणि सद्‌गुरुंच्या पराबुद्धि मध्यें लपंडावाचा खेळच होय. दोघेही या खेळांत आनंद अनुभवितात. अखेरीस एक अशी स्थिति येते जेव्हां सद्‌गुरुंच्या श्रेष्ठ-

तेची दर वेळीं ओळख पटल्यामुळें त्यांना शरण जाणे हेंच शिष्यास स्वतःचा जय होण्याचा एकमात्र उपाय दिसून येतो. पूर्ण पुरुष सद्गुरुच्या इच्छेप्रमाणे शिष्य पूर्ण शरणागतिचें अवलम्बन करतो. या प्रकारेंच सद्गुरुंचे प्रति, शिष्य पूर्ण श्रद्धावान बनतो आणि आतां आज्ञापालन निर्दोष होत असणार. शिष्याचा 'मी' पणाचा भाव आता पूर्णपणें समाप्त होतो आणि त्यास सुख सिद्ध होतें. आतां याच अवस्थेनंतर सद्गुरु आपले स्वतःस पूर्णपणें शिष्याचे समक्ष प्रत्यक्ष प्रकट करतील आणि तेव्हांच शिष्यास प्रत्यक्ष ज्ञान होईल की सद्गुरु काय आहेत आणि ते कोण आहेत. सद्गुरुंचे पूर्ण कृपेनें अज्ञानाची बाधा पूर्ण रूपानें जिंकलेली असते, आणि शाश्वत् व स्थायी सुख पूर्ण रूपाने प्राप्त झालेलें असतें. शिष्य स्वतःच आपले सद्गुरु समानच पूर्ण पुरुष झालेला असतो व कोणी अन्य माणूस कधीच हे ओळखूं शकणार नाहीं की या दोहोंपैकी कोण सद्गुरु आहेत व कोण शिष्य. एका प्रकाशित दीपाने दुसरा दीप प्रकाशित केलेला असतो आणि या रीत्या परमात्म्याने स्थापिलेली सद्गुरु-संस्था, पिढ्या न् पिढ्या, युग युगांतर, सृष्टिच्या सुरुवातीपासून शेवट-पर्यंत, आपले कार्य करीत असते. वेद तुम्हास हेच सांगतात.

मी अगोदर सांगितलेले आहे की जन्मतः सद्गुरु परमात्म्याचे अवतार असूं शकतात. असे जन्मतः अवतारी पुरुष, यांना ही सत् अवस्था किंवा सुखापर्यंत पोंचण्यासाठी तेच सर्व कांही करावे लागेल. जे या अध्यायांत लिहिले आहे. त्यांनाही सद्गुरु भेटले पाहिजेत, दीक्षा मिळवून शिष्य बनले पाहिजे, श्रद्धा असली पाहिजे. आज्ञा-पालन केले पाहिजे आणि आपल्या सद्गुरुंची कृपा संपादन करून पूर्णत्व प्राप्त केले पाहिजे. इतकेंच आहे की त्यांना हे सर्व करणे सोपें जात असतें आणि शीघ्रतेने होऊन जातें.

मला आशा आहे की मी उत्तमाहून उत्तम प्रयत्नाने समजावून दिलें आहे की सद्गुरु काय आहेत आणि त्यांची कृपा काय आहे

त्यांची ती कृपाच सुखाच्या शोधांत अंतिम अवस्था आहे. निर्धास्त असा, सुखाचा शोध आता पूर्ण झालेला आहे. आतां अधिक कांहीही शोधावयाचे नाहीं. सुख प्रत्येक आणि सर्वच प्रकाराने प्राप्त झालेलें आहे. जीवन आतां जगण्या योग्य बनलें आहे, सुखाने परिपूर्ण आहे, त्याचा आनंद आतां कित्येक पटीनें वाढतच असणार.

सद्गुरुंचे जे वर्णन मी या अध्यायांत केले आहे त्यामुळे कोणा वाचकाच्या मनांत हा विचार येऊं शकतो की पांचही साधन–मार्गांचे आचरण न करतां देखील सद्गुरू आपली कृपा करून सुख प्रदान करूं शकतात. मी या निष्कर्षास चूक समजत नाहीं. उलटपक्षी मी हेंच सांगेन की वाचकानें असा विचार करणें ठीक आहे, जर का त्याने माझा हा सल्ला समजून घेतलेला असेल की सद्गुरुंचे प्रति अनन्य श्रद्धा आणि त्यांचे आदेशांचे पालन करणें आवश्यक आहे.

अध्याय ७

सुख मिळविलें

आता आपण पुस्तकाच्या शेवटच्या अध्यायांत प्रवेश करीत आहोंत. अर्थात् आपणांस हें जाणलें पाहिज की सुखाचा शोध पूर्ण झाल्यावर आम्हांस काय आनंद प्राप्त होतो.

सुखाचा शोध सुरू होण्यापूर्वी आम्हांस हें कळलेलें असतें की ज्यास आम्हीं या वेळेपावेतों निर्विवाद निश्चयानें सुख मानलेलें होतें, तें सुख नव्हतें. आम्हीं तर स्वतःच किंवा अन्य कोणाचे तरी प्रभावामुळें सुखाची एक भ्रामक व्याख्या करून ठेवलेली होती. कल्पित व्याख्येला कांहीच अर्थ नसतो. त्यामुळे आम्हीं समजून जातों की आतापर्यंत केलेला शोध आणि सर्वच प्रयत्न फुकट गेले. आपले आयुष्याचा बराच भाग निघून गेल्यानें या प्रयत्नांचे निरर्थकतेबाबत माहिती आम्हांस हाणून पाडते. कारण की जेव्हां आम्ही आपले स्वतःलाच प्रश्न करतो की आम्ही सुखी आहोंत काय ? तर आपल्याच अंतरांतून एक ठराविक आवाज निघतो— “ नाहीं ” त्याबरोबरच हाही भाव हृदयांत येतो की अजून तर एक विशेष कार्य

होणें शिल्लकच आहे. प्रत्येक वेळीं असेच उत्तर मिळतें. यामुळे आम्हीं समजून घेतों की सुखी होणें सोपे नव्हे तर अशक्यही आहे आणि आम्ही ठरवितों की पुढें आतां इतक्या हिरीरीने प्रयत्न करणार नाहीं. तरी पण आमचे प्रयत्न बंद होत नाहीत. यद्यपि आतां त्यांत पूर्वी-प्रमाणें उत्साह आणि शक्ति नसतात. याखेरीज अगर याहून चांगलें कांहीही ज्ञान नसल्यानें आम्ही या प्रकारेंच आपलें जीवन व्यतीत करीत असतो.

आम्हीं भाग्यशाली आहोंत जर का कोणा एके दिवशी कोणीं सज्जन आम्हांस सुखाची व्याख्या समजावून सांगतील. ही व्याख्या निर्विवाद, जोरदार आणि सत्यपूर्ण शब्दांत केली जाते, आम्ही अर्थं जाणून घेतो आणि आम्हांस ही खात्री होते की हें सुख पुन्हां आयुष्य भर आम्हांस दुःखांत परतून जाऊं देणारे नाहीं. कारण की सुखाचा अर्थच आहे. स्थायी व शाश्वत सुख.

सुखाची केवळ खरी व्याख्याच माहीत होत नाही, 'आम्हीं हेंही जाणून घतों की मनुष्य या नात्यानें आम्हांस जन्मापासूनच सुख प्राप्तीचा अधिकार मिळालेला असतो. आम्हांस हें जाणून खरी प्रसन्नता होतें की हा अधिकार अद्यापही आमच्या जवळ आहे, जरी आजतागायत आम्ही कांहीही करीत आलेले असूं. आम्हांस हेंही कळविले जातें कीं या अधिकाराचा उपयोग करण्यांत, वय, पद, व्यवसाय, लिंग–भेद, जाति, मत, पंथ आणि संप्रदायांचीं कोणतीही बाधा येत नसते.

अशा प्रकारें आम्हास संतोष होतो की सुख शोधण्यांत आज-पर्यंत निराशा आणि विफलता मिळालेली असूनही अद्यापि देखील सुख आम्हांस मिळूं शकते आणि या वेळीं ते प्राप्त झालें की मग आयुष्यभर टिकूनच राहणार.

हें सर्व ज्ञान आम्हांस आनंदित करते आणि आजपर्यंतच्या निराशामय जीवनाचें रूपांतर शुद्ध आणि स्पष्ट प्रकाशावस्थेंत होते. आम्हांस वाटूं लागते की जर का सुखाची व्याख्या आणि ते प्राप्त करण्याचा आमचा निर्बाध हक्क, हेंच आमचे हृदयास इतका आनंद प्रदान करतें, तर निश्चितच सुखाची प्रत्यक्ष प्राप्ती अनमोल आनंदानें परिपूर्ण असणार. लगेच आमचा निश्चय होतो की वाटेल त्या मूल्यावर हें सुख तर प्राप्त करूनच घेणें आहे. हा निश्चय देखील आनंददायक असतो.

याविषयीं जें कांही करणें आहे ते केवळ अधिकाराचा उपयोग होय. हें काम इतकें सोपें असूनही, त्यास कसें करावयाचें हें आम्हास गोंधळांत टाकतें. आमचे अज्ञानच आमचे वाटेंत अडथळा बनतें. परंतु आम्हांस माहीतच आहे की ज्ञानानें अज्ञानास दूर केलें जाऊं शकते, आणि ज्ञान ग्रंथांच्या माध्यमानें प्राप्त करतां येते. यामुळें आम्हास ग्रंथ अध्ययनाचा छंद लागतो की ज्या योगें या अधिकार प्रयोग विषयक अज्ञानाचा नाश करतां येवो. परंतु ग्रंथ हे स्वतःचे असोत किंवा मागून आणलेले, याविषयी तर मौन किंवा संदिग्ध अगर समजण्यांत न येणारे असेंच असतात. फल हे होते की आम्ही काळोखांतच घुटमळत असतो.

आम्हांस त्या सज्जनांचे स्मरण होतें ज्यांनी सुखाची व्याख्या आणि आमचा हक्क, याविषयी आम्हास सांगितले होते तेच कदाचित् अधिकार प्रयोगाविषयींही सांगू शकतील. आम्ही त्यांना शोधून काढतो. ते आम्हास याविषयी सर्वच कांही चांगल्या प्रकारें समजवून देतात, ज्यामुळें अतिशय संतोष लाभतो.

आतां आम्हीं जाणतोच की परमात्म्याविषयक ज्ञान प्राप्त झाल्यानें अज्ञान नष्ट केलें जाऊं शकतें. हें ज्ञान परमात्म्यानें उच्चारि-लेल्या शब्दांत आहे. हे सर्वही शब्द परमात्म्याचे आदेश आहेत. या सर्व

कोणा एकाशींही संबंधित नाहीत ते आमच्या वर्णनास समजूं शकणार नाहींत, मान्यही करणार नाहींत तरी पण आम्हीं केलेल्या प्राप्तीस सार्वजनिक हितकरितां लिपिबद्ध करून ठेवीत आहोत. म्हणजे कोणीही या दैनंदिनीस वाचून लाभ घेऊं शकोत.

आमची अतिशय उत्कट इच्छा आहे की ज्या आनंदात आम्ही आहोत, तसाच आनंद दुसऱ्यानाहि मिळावा. या अधिकारापासून ते वंचित नाहीच. त्यांचेकरितां हेंच कल्याणकारक होईल की शरीर सदृढ व तारुण्यांत असतानांच त्यांनी या शोधास सुरुवात करावी. नंतर जेव्हां शरीरास सारखी वैद्यकीय किंवा डॉक्टरी चिकित्सेची जरूर पडूं लागेल, तेव्हां शोधात जो ताण त्यावर पडेल त्यास कदाचित् शरीर सोसूं शकणार नाहीं. आम्हीं त्यांना हेही सांगू इच्छितो की मरणानंतर स्वर्ग किंवा आणखी असेच कांहीं मिळण्याचे स्वप्न पाहूं नका. अशा सर्व कल्पनांचा त्याग करा. त्यांनी आमच्या अनुभवांपासून शिकावे कीं स्वर्ग वगैरे सर्व कांहीं सुखांतच आहे. सुखाबाहेर नाही. म्हणून त्यांचे ध्येय स्वर्गप्राप्तीचे असेल तर तेथें पोहचण्याची तयारी अर्थात् सुखाचा शोध, याच क्षणीं सुरू करून द्यावा आणि जीवित अवस्थेंतच तेथे पोहचवावे.

बरें तर, आमचा विचार होता की सुखाचे आपले अनुभवांस जनतेसाठीं लिपिबद्ध करून ठेवावेत, तर ते हे आहेत.

आमच्यांत आनंद, निस्सीम आनंद, पुष्कळच आनंद फारच भरलेला आहे. आम्हीं आपले स्वतःवर, आपले सभोंवतीचे वातावरणावर आणि सकल संसारावर खूष आहोंत. खरें विचारलें तर आम्हीं त्या सर्वच गोष्टींवर प्रसन्न होत असतो ज्यांना आम्ही पाहात, ऐकत आणि जाणत आहोंत, ज्यांच्याशीं आम्ही संबंध स्थापित करतो आणि ज्या आमचे समक्ष येतात, मग त्या गोष्टीचे अस्तित्व असो वा नसो. यामुळे आमचा पूर्वीचा संकुचित दृष्टिकोण बदलून, तो जास्त व्यापक

आणि सर्वदर्शी झालेला आहे. तो फक्त चांगल्या गोष्टींच ग्रहण करतो आणि अनिष्टांकडे लक्षच देत नाहीं. म्हणून आम्ही कोणाशीही घृणा करीत नाहीं. मत्सर ठेवीत नाहीं. आणि कोणाविषयींही वैमनस्य नसते. या सर्वांचा पूर्वी कळत असलेला अर्थच आतां आमच्याकरितां पार पालटून गेलेला आहे. सर्वच वस्तू आणि सर्वच जीव आतां प्रसन्न दिसतात. इतका निस्सीम आमचा आनंद आहे. प्रत्येक क्षणीं तो वाढतच असतो. कमी तर होतच नाहीं. मग त्यांचा अंत होण्याचा तर प्रश्नच उपस्थित होत नाहीं.

आमच्याजवळ इच्छा–शक्तीचे विपुल भांडार आहे. म्हणून आम्हीं वाटेल त्या प्रकारानें आपली जीवन–चर्या ठरवून घेतो. आपल्या अनुकूलतेसाठीं आम्हांस पाहिजे तसें वातावरण निर्माण करूं शकतो. इतरांस अडचणींत न टाकता आम्ही त्यांचेकडून आपल्या आवडीनुसार कार्य करवू शकतो. निसर्गावरही आमचे नियंत्रण आहे. आमच्या जीवन–प्रवाहांत नैसर्गिक घटना अडथळा टाकूं शकणार नाहींत.

व्याकुलता पूर्णत: विरून जाते. म्हणून फक्त सत्यतेशीच आमचा संबंध असतो. वस्तूंचा, उद्देश्यांचा, आणि माणसांचा बाहेरील देखावा आतां आम्हांस धोक्यांत ठेवू शकणार नाहीं. आमच्या भेदक दृष्टीनें बाहेरील देखाव्यास छिन्नभिन्न करून आम्ही सत्यता जाणून घेतो. यामुळें आम्हीं कोणत्याही विषयावर एका क्षणाचाही विचार केल्याशिवाय आपला निर्णय करीत असतो.

स्वाधीनता आपल्या प्रत्येक स्वरुपांत आम्हास मिळालेली आहे. चिंता आणि त्रासापासून आम्हीं मुक्त आहोंत. आम्हांस विचार स्वातंत्र्य आहे. बंधन, अडथळे, जबाबदाऱ्यांपासून आम्ही मुक्त आहोंत. सर्व प्रकारची स्वतंत्रता आणि पूर्ण निर्बाध मुक्तता आम्हांस प्राप्त आहे.

मानव-स्वभावाचा दुबळेपणा जसे पक्षपात, स्पर्धा, मत्सर, वैर लोभ, लालुच, निराशा इत्यादि एक एक करून अंतराळांत विरून गेलेला आहे. यांपैकी एकाचा अंश देखीलही आमचेजवळ शिल्लक नाहीं. विचार, मन आणि आत्मा यांची निर्दोष शुद्धि आम्हां सभों-वती असते.

प्रेम, अनुराग व करुणेचे आमचेजवळ विपुल भांडार आहे. घृणा निर्दयता, किंवा दुर्व्यवहार आम्हांस स्पर्श करूं शकत नाहीं.

पूर्वीच्या आमच्या सर्व कमकुवती आतां ताकती आहेत. म्हणून आता आम्हांस लज्जित व्हावें लागत नाहीं. कोणाचीही उपस्थिती आतां आमच्यांत मोठेपणा किंवा कमीपणाचा भाव उत्पन्न करीत नाहीं. कोणाचाही आता आमच्यावर प्रभाव पाडीत नाहीं. परंतु आम्ही जर का इच्छूं तर वाटेल त्यावर आपला प्रभाव पाडूं शकतो.

आम्हीं विजयी आहोंत. आमच्या दैनिक जीवन-क्रमांत आम-च्याशीं संबंधित सर्व आणि प्रत्येक बाबीवर आम्ही विजय मिळवलेल आहे. पराजयाचा अनुभव कधीही येणार नाहीं.

आमच्या शरीरांवर तर आता आम्हांस पूर्ण आणि एकछत्र प्रभुत्व आहे. शरीरांस आपल्या आज्ञेनुसार जसें आम्ही इच्छूं त्या प्रमाणें ठेवूं शकतों. शरीर आपल्या जरुरतीसाठी आता रडगाणें किंवा बंड करू शकत नाहीं मग भलेही त्या आवश्यकता अनिवार्य असोत. आम्ही त्यास आपल्या सेवेंतून मुक्त करून देण्याचे सामर्थ्य ठेवतो.

आमचे मनही आतां आमच्या नियंत्रणांत आहे. आमच्या आज्ञे-नुसार ज्या विषयांत आम्ही इच्छूं त्यांत मनास एकाग्र व्हावेंच लागते. परवानगीविना इतस्ततः भटकण्याची मनाई आहे. त्यास आपला व्यवहार

योग्य प्रकारेच ठेवावा लागतो. आम्हांस ते धोका देऊं शकत नाहीं. आमची शांति आता कधीही भंग होऊं शकत नाहीं. आवेगांवर आणि भावनांवर नियंत्रण केले गेले आहे. आश्चर्य व आघातांच्या आम्ही पलीकडे आहोंत.

सहजतेची जाणीव होत असते. या सहजतेचा स्वप्नांत पण विचार आला नव्हता. त्यामुळें परिवार आणि अश्रितांचे प्रति आमचे कर्तव्य व जबाबदाऱ्या निभविणें सोपें झाले आहे. प्रत्येक मनुष्य आतां आमच्या परिवारांतील सदस्य आहे. त्याच्याशीं आमचा व्यवहार आता तसाच असणार जसा परिवारांतील दुसऱ्या सदस्याशीं असतो.

आमचे स्वास्थ्य अजब आहे. आम्हीं इतके सुदृढ आणि सशक्त पूर्वीं कधीही नव्हतो. आजारानें आतां आमच्या तब्येतीस मुळींही नुकसान होऊं शकत नाहीं. तब्येतीकरतां आता कोणतीही काळजी घ्यावी लागत नाहीं. अनिद्रा किंवा अतिनिद्रा, उपास किंवा अतिभोजन, तहान किंवा अति पाणी पिणें, नियमितता किंवा अनियमितता, थंडी व उष्णता यांपैकी कांहीही आमच्या भव्य सुदृढतेस धक्का देखील बसवूं शकत नाहीं. खरें म्हटलें तर, आमच्याजवळ जरुरीपेक्षां जास्तच सुदृढता आहे.

आमची संपत्ति अमाप आहे. म्हणून कोणतीही इच्छा किंवा महत्वाकांक्षा असंतुष्ट असत नाहीं. आमचेजवळ ते सर्व कांहीं आहे जे आम्ही इच्छितों की आमचेजवळ असावे आणि आमचे स्वत:चे असावें. कोणतेही वेळीं इच्छा करूं तितके द्रव्य आकर्षित होऊन आमचेकडे येतें. म्हणून आमच्यात पूर्ण संतोष विद्यमान आहे.

आम्हीं कोणापासूनही भयभीत होत नाहीं. आमची निर्भयता प्रत्येक क्षणीं आम्हांस निर्धास्त ठेवते, कारण की आमचेजवळ सदा सर्वकाळ सत्याचे शासन असते.

आम्हीं शांत आणि संतुष्ट आहोत. क्रोध किंवा आवेश आमच्यांत उरलेंच नाहीं.

आमच्यांत सर्व प्रकारच्या लौकिक आणि अलौकिक प्रचंड अशा शक्ति भरपूर पडून आहेत. या इतरांना कधी कधीं चमत्कारिक भासतात. कोणाही सत्पात्राकरितां आम्ही यांपैकी कोणत्याही शक्तिचा कोणतेही वेळीं उपयोग करू शकतो. आमच्या स्वतःच्या उपयोग किंवा लाभाकरितां या सर्व शक्ती सर्व समयीं प्रस्तुत आहेतच आणि आमच्या आज्ञेत आहेत. म्हणून आतां आम्हांस कोणाच्याही साहाय्याची गरज नाहीं. आम्ही नेहमी दुसऱ्यास मदत करण्यास उद्युक्त असतो.

आमचे ज्ञान पूर्ण आहे. आम्हांस सर्वच कांहीं माहीत आहे. वस्तुतः आतां कांही जाणण्याचे उरलेंच नाहीं. परमात्माचे समान आम्ही पूर्ण आहोंत. म्हणून परमात्मा, जगत् जीव वा जड पदार्थीविषयीं आम्ही सर्व कांही जाणीत आहो. वस्तुतः सुखाच्या शोधानंतर, याच ज्ञान आणि पूर्णत्वानें तर आम्हांस सुखी केलें आहे..

आमच्या वर्तमान आंतरिक स्थितीच्या अनुभवांचे इतके वर्णन करतां बरोबरच आम्ही तुम्हांस हेंही सांगू इच्छितों की आम्हीही तेवढेच जिवंत आहोंत जेवढे की तुम्ही आणि म्हणूनच आम्हीही दैनंदिन जीवन तुमच्यासारखेंच व्यतीत करीत असतो. तुमच्यासारखेंच आम्हीही भोजन करतो, झोपतो, विश्रांति घेतो, कपडे घालतो, दिन-क्रम बनवून ठेवतो, हिंडतो, प्रवास करतो, आणि कोणत्याही सामान्य मनुष्या-

प्रमाणेंच आमचे सर्व व्यवहार चालतात. फक्त एकच अंतर आहे की हे सर्व व्यवहार चालू असता आम्ही सुखी असतो. आणि याचा आम्हास अभिमान आहे. आतां आमच्यांत कोणा विषयीही आदरभाव किंवा आसक्ति उरलेली नसते. एक मात्र अपवाद आहेत आमचे सद्‌गुरु. त्यांचेकरितां आमचेजवळ सर्व आदरभाव उपस्थित आहे, कारण की त्यांच्याच कृपेनें तर आम्हीं सुख मिळविले आहे. आणि प्रत्येक क्षणास त्याचा अनुभव घेत आहोत. सद्‌गुरु प्रति कृतज्ञतेमुळें आमच्यांत भक्ति आहे. त्यानी आम्हांस सुखाचे दान जे देऊन टाकलें आहे.

माझे प्रिय वाचकहो, मी प्रयत्न करून सुखी व्यक्तीचे अनेक अनुभवांची कल्पना त्यांचेच शब्दांत तुम्हांस दिली आहे. या तऱ्हेचे आणखीही पुष्कळ अनुभव आहेत. सुख मिळविलें, या शब्दांच्या अर्थास आणखीही अधिक स्पष्ट करण्यास मी एका पूर्ण पुरुषाचे चित्रण करतो.

पूर्ण पुरुष परमात्माचे समान पूर्ण असतात. ते परमात्म्याला जाणतात, पाहातात, भेटतात, बोलतात आणि सतत संपर्कात असतात. ते परमात्माचे संपूर्ण वर्णन करूं शकतात की ज्या वर्णनाने कोणासही समाधान व्हावे. स्वतःच्या इच्छा-पूर्ति करितां कोणत्याही क्षणीं ते असेच एक आपलेही जगत निर्माण करूं शकतात, त्यास जोपर्यंत वाटेल तोपर्यंत स्थित ठेवू शकतात. आणि शेवटीं त्यास नष्टही करतात. इतकेच आहे कीं सर्वच इच्छावर विजय मिळविल्यानें आणि इच्छामुक्त झालेले असल्यानें ते सहसा अशा प्रकारची, जगत् निर्माण पालन आणि नाशाची आवड करीत नाहीत.

पूर्ण पुरुष सर्वसमर्थ असतात. ते स्वेच्छेनुसार कोणत्याही जगतांत संचार करतात आणि इच्छा असेल तोपर्यंत तेथे निवास करतात. समस्त जगतावर त्यांचे पूर्ण प्रभुत्व असते. निसर्गावर पूर्ण नियंत्रण असते. त्यास त्यांचे आज्ञेप्रमाणें कार्य करावे लागते. त्यांचेकरितां

समस्त जगतांत मार्ग मोकळा आहे. ते चंद्र, मंगळ किंवा त्यांचे आवडीच्या कोणत्याहि ग्रहावर प्रवास करूं शकतात. त्यांचेकरितां स्वर्ग, नर्क, पृथ्वी एक समान आहेत. काळ आणि अंतर त्यांचेकरितां निरर्थक आहे. कोठेही केव्हांही हजर होण्याचे किंवा कोठेही कांहींही पाहण्याचे त्यांचे योजनेंत काळानें आणि अंतरानें कांहींही विघ्नें पडू शकत नाहींत. द्विधा प्रवृत्तिचे लोक त्यांजकरितां अर्थहीन असतात. ते चंद्राइतके शीतल आणि समुद्रासमान शांत आहेत. ते प्रेममय, दयाळू, आणि ममतामय असतात.

ते कृपेचे सागर आहेत. ही कृपा ते कोणासही कितीही मात्रेंत, घेणाऱ्याचे पात्रतेप्रमाणें देण्यास तयार असतात. त्यांचेजवळ त्यांचे कृपेसाठीं जाणें म्हणजे समुद्रांतून पाणी घेण्यास जाणें होय. जितके मोठें पात्र असेल तितके पाणी समुद्रांतून आणतां येते.

पूर्ण पुरुष आपल्या स्वत:विषयीं कोणाही बाबतीत काळजी करीत नाहीं. त्यांच्याविषयी सर्वच गोष्टीं ज्यांच्याशी ते संबंधित असतील, स्वत:च आपापली काळजी ठेवतात, आणि इतक्या सुरळीत पणें घटित होत असतात की जसें कांही तेच त्यांची खबरदारी ठेवून आहेत.

त्यांचे स्वत:चे मानवशरीर ते अशा 'प्रकारे धारण करून असतात जसे की ते एक ओझे असेल. त्यांचे या पृथ्वीवरील जन्म-हेतु आणि निज–कार्य पूर्ण होतांच ते या ओझ्यास काढून फेकतात किंवा जर शरीर सक्षम असण्यास बाह्य मदत घेऊं लागले तरी त्यास टाकून देतात. त्यांचे शरीर कार्य करते, कारण की त्यास ते करावेंच लागते. ते स्वत: त्याचेकडे लक्ष ठेवीत नाहींत. उलटपक्षी ते शरीरास कठिणहून कठिण कार्यांत गुंतवून ठेवतात. जेव्हां ही ते इच्छा करतील तेव्हा शरीरास भोजन, विश्राम, जल इत्यादि कित्येक दिवस

...७

देत नाहींत. त्यांची ज्ञानेंद्रियें कार्य करतात, कारण की त्यांना तें करावेंच लागतें. ते त्या इन्द्रियांकडे मुळींच लक्ष देत नाहीं, पण जेव्हां ते कितीही लांबचे किंवा जवळचे कांहीही पाहणें, ऐकणें, किंवा हुंगणे इच्छितात तर. सहजच हे सर्व कांही करून घेतात. शरीराचे अवयवांचा उपयोग ते असे करतात जणू ते अवयव लाकडी किंवा धातूचे बनलेले असतील. जर ते इच्छा करतील तर तासन् तास किंवा कांहीं दिवसांपर्यंत एकाच मुद्रेत बसलेले, उभे, झोंपलेले असू शकतात. त्याचे शरीर, अवयव आणि ज्ञानेंद्रियावर अशाप्रकारे त्यांचे प्रभूत्व असते. ते जगांतील सर्व संपत्तीस आपल्या अधिकारांत ठेवतात आणि जगांतील सगळे आनंद त्यांचेच आहेत. संसारांत असूनही त्याविषयीं ते अगदी अनासक्त असतात. त्यांची बुद्धि आणि स्मृति अद्वितीय आहे. ते सर्व विषयांवर सर्वच कांही जाणतात. आणि सर्वच स्वीकृत तत्त्व त्यांच्या श्रेष्ठ मस्तकांत टिकून असतात. अशा प्रकारें ते सर्वच बाबतींत सहजच सर्वश्रेष्ठ आहेत.

ही आहे कांही कल्पना 'सुख मिळविलें' या शब्दांच्या अर्थाची. एक श्रेष्ठ आणि चमत्कारिक प्राप्ती, जिच्यासाठीं प्रत्येक मनुष्य अधिकारी आहे. याचा शोधच तुमच्या सर्व दुःखांचा उपाय होय.

मी याहून उत्तम वर्णन करूं शकत नाहीं. कारण की शब्दच मला साथ देत नाही. पण माझ्या या असमर्थतेविषयी मला खेद नाही. कारण की मी चांगले प्रकारे जाणतो की एक पूर्ण पुरुष स्वतः देखील आपले वर्णन सामान्य जनास सुगम व्हावे, अशा शब्दांत करूं शकत नाहीं.

मी अगोदर हा प्रयत्न केला की सुखी मनुष्यांच्या शब्दांतच 'सुख मिळविले'चा अर्थ सामान्य वाचकांस समजण्यांत येईल असें सांगितले जावो. त्यानंतर मी एका पूर्ण पुरुषाचे वर्णन केलें ज्याच्यानें

वाचकांचे समक्ष एक आदर्श असो. तरीही ' सुख मिळविले 'चे वर्णन अद्याप शिल्लकच आहे. आतां थोड्या शब्दांत तें सांगतो, जरी या वर्णनास योग्य परिश्रम आणि विद्येशिवाय समजून घेणें अवघड होईल.

सुख मिळविलें म्हणजे आनंद, इच्छा-शक्ति, विजय, पूर्णता आणि कृपेचा अक्षय भांडार आहे. सुख मिळविलें म्हणजे काळ आणि अंतराचें अस्तित्व नाहीसे केलें. सुख मिळविलें म्हणजे व्याकुलता, निर्बलता, बंधन, आणि व्दिविधा मनावृत्तीतच अस्तित्व विहीन केले. सुख मिळविलेचा पर्याय ज्ञान आहे, सुख मिळविलेचा पर्याय सत्यही आहे.

सुख सर्वच आहे.

● ● ●

उपसंहार

पुस्तक तुम्ही वाचले. सहज सरळ सोपे आहे. जर तुम्ही शोध सुरू करीत आहांत तर मी खूष आहे. जर तुम्ही शोधांत कोठेही आहांतच, तर मी आणखीही खुष होतो. शोधाचे दरम्यान जर तुम्ही त्यास तीव्र करीत असाल, तर ते आदर्श होईल आणि माझ्या शुभेच्छा तुमचेबरोबर आहेत. पण हें पुस्तक वाचल्यानंतर, जर तुम्ही हाच निर्णय घ्याल की लौकिक व्यवसाय आणि जीवन चालू राहावे आणि फक्त चालू लौकिक व्यवसायातच मग्न असावे, तरीही मी 'निराश होत नाही. कारण की तुम्ही साधनाचे पाठीमागे पडला आहांत तर एके दिवशीं पुढे जाण्याचाही (म्हणजे साध्याचाही) विचार करालच या पुस्तकाचे फक्त वाचन केल्यानें जे विचार तुमच्या मनांत उदित होतील तेच पुष्कळ संतोषजनक आहेत आणि मी हेंच समजेन की माझें काम झालेलें आहे.